गुरुवार, २० एप्रिल २०२३
⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०२ ⊙ अंक -२२६
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) ●THURSDAY 20 APRIL 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ●YEAR-02 ●ISSUE-226 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-12 ●PRICE-5

## कुस्तीचा थरार...



अंबड : तालुक्यातील लोणार भायगाव येथे प्रती वर्षीप्रमाणे याही वर्षी भव्य कुस्त्याची दंगल ग्रामस्थांच्या वतीने भरविण्यात आली होती. कुस्तीच्या या आखाड्यात जालना जिल्ह्यातील मल्ल -पहेलवानांसह, बीड, छत्रपती संभाजीनगर, परभणी, नगर या जिल्ह्यातील पहेलवान मंडळींनी या कुस्त्यांत सहभाग घेतला.

# महाबळेश्वरात ढगफुटीसदृश पाऊस

## जनजीवन विस्कळीत ; शेतकऱ्यांना मोठा फटका

आधुनिक केसरी न्यूज

**सातारा : महाबळेश्वरमध्ये बुधवारी ढगफुटीसदृश पाऊस सुरू झाला. तुफान वाऱ्यासह मुसळधार पावसाने हजेरी लावल्याने जनजीवन विस्कळीत झाले आहे. महाबळेश्वरमध्ये फिरायला आलेल्या पर्यटकांना याचा मोठा फटका बसला आहे. राज्यातही अनेक ठिकाणी अवकाळी पावसाने हजेरी लावल्याने शेतकऱ्यांना मोठा फटका बसल्याचे चित्र आहे. सकाळपासूनच महाबळेश्वरमध्ये पावसाचे वातावरण दिसत होते. त्यात दुपारनंतर मुसळधार पावसाने हजेरी लावली. हा पाऊस ढगफुटीसदृश्य असल्याचे दिसून आले. अचानक आलेल्या या मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे.**

राज्यातील नागरिकांची उकाड्यापासून सुटका होणार आहे. उद्यापासून म्हणजे गुरुवारपासून पुढील चार दिवसात राज्यातील उष्णतेत मोठी घट होणार असून उन्हाळ्यामुळे हैराण झालेल्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. संपूर्ण राज्यातील कमाल तापमानात उद्यापासून पुढील चार दिवस घट होणार आहे. पुढील चार दिवस राज्यभरतील तापमानात मोठी घट होणार असल्याची माहिती पुणे वेध शाळेचे प्रमुख डॉ. के. एस. होसाळीकर यांनी दिली आहे. दुसऱ्या बाजूला, गेल्या काही दिवसात पुण्याचे तापमान 40 च्या वर जात आहे. पुण्यात एप्रिल किंवा मे महिन्यात 40 अंश तापमान बऱ्याचदा नोंदी झाल्या आहेत. 40 अंशापेक्षा जास्त तापमान गेल्यावर नागरिकांनी काळजी घ्यावी. दुपारी 12 ते 4 वाजेपर्यंत लोकांनी गरज नसेल तर बाहेर पडू नये असे देखील आवाहन हवामान विभागाने केले आहे.

**हिंगोलीत गारांसह पाऊस** : हिंगोली जिल्ह्यातील आनेक भागात मंगळवारी सायंकाळच्या सुमारास वादळी वाऱ्यासह जोरदार पावसाची हजेरी लावली आहे . काही भागात तर गारांचा सुद्धा पाऊस झाला आहे . या पावसाने शेतातील पिकांचेसुद्धा मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे . शेतातील भाजीपालावर्गीय फळबागांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे . यामुळे शेतकरी पुन्हा एकदा संकटात सापडला आहे .

**कोल्हापुरात उष्णतेचा पारा 39 अंशावर** : कोल्हापूरसारख्या हिरव्यागार जिल्ह्यात उन्हाचा पारा 39 अंशांवर पोहचला आहे . त्यामुळे नागरिकांच्या अंगाची अक्षरश: लाहीलाही होत आहे . गेल्या काही दिवसांपूर्वी कोल्हापुरात धुक्याची चादर पसरली होती . त्यानंतर चारच दिवसांपूर्वी करवीर तालुक्यातील काही गावात गारांचा पाऊस झाला . मात्र आता कोल्हापूरचे तापमान 39 अंशांवर पोहचले आहे .

# श्रद्धा हत्याकांड; न्यायालयाचे वृत्तवाहिन्यांना आदेश

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** श्रद्धा वालकर हत्याकांडामुळे सगळा देश हादरला होता. या प्रकरणात आफताब पूनावालाने त्याची प्रेयसी आणि लिव्ह इन पार्टनर श्रद्धाची हत्या केली. त्यानंतर तिच्या मृतदेहाचे ३५ तुकडे केले आणि ते महारौलीच्या जंगलात फेकले होते. या प्रकरणात आफताबला अटक करण्यात आली आहे. अशात आता या प्रकरणी दिल्ली उच्च न्यायालयाने सगळ्या वृत्तवाहिन्यांना महत्त्वाचे आदेश दिले आहेत.

श्रद्धा वालकर हत्याकांड प्रकरणात जे चार्जशीट पोलिसांनी दाखल केले आहे त्यातला मजकूर हा वृत्तवाहिन्यांनी उघड करू नये असा स्पष्ट आदेश दिल्ली उच्च न्यायालयाने दिला आहे. श्रद्धा वालकर हत्या प्रकरणाने संपूर्ण देश हादरला होता. या प्रकरणात पोलिसांनी ६ हजार पानांचे चार्जशीट दाखल केले आहे. ६ हजार ६२९ पानांच्या चार्जशीटमध्ये पोलिसांनी विविध खुलासे केले आहेत. गुन्हा घडल्यानंतर चार्जशीट दाखल करण्यासाठी पोलीस किंवा तपास यंत्रणांकडे ९० दिवसांचा अवधी असतो. मात्र ७५ दिवसांतच चार्जशीट दाखल करण्यात आलं आहे. श्रद्धा वालकर ही वसईमध्ये राहणारी तरूणी होती. तिची हत्या दिल्लीत करण्यात आली. तिचा लिव्ह इन पार्टनर आफताब पूनावालानेच तिला ठार केले. त्यानंतर आफताबने श्रद्धाच्या मृतदेहाचे ३५ तुकडे केले. गेल्या वर्षी नोव्हेंबर महिन्यात हे प्रकरण उघडकीस आले. आफताब मेहरौलीच्या जंगलात श्रद्धाच्या मृतदेहाचे तुकडे फेकत होता. हे प्रकरण उघडकीस आल्यानंतर आफताबला अटक करण्यात आली.

# सर्वाधिक वाघ चंद्रपूर जिल्ह्यात


आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** राज्यातील सर्वाधिक वाघांची नोंद चंद्रपूर जिल्ह्यात झाली असून, जिल्ह्यात सुमारे २०८ वाघ आहेत. तर एकूणच विदर्भ लँडस्केपमध्ये ४४६ वाघांची नोंद आहे. मागील व्याघ्रसंख्येच्या तुलनेत २३ टक्क्यांनी वाढ झाली आहे. भारतीय वन्यजीव संस्थेने विदर्भ लँडस्केपचा अहवाल नुकताच प्रकाशित केला. त्यातून ही माहिती समोर आली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नुकतेच नऊ एप्रिलला व्याघ्रगणनेची आकडेवारी जाहीर केली. लँडस्केपनुसार व्याघ्रगणनेचा अहवाल एकापाठोपाठ एक प्रकाशित करण्यात येत आहे. त्यात नुकताच विदर्भ लँडस्केपचा अहवाल प्रकाशित करण्यात आला. त्यानुसार विदर्भ लँडस्केपमध्ये ४४६, तर चंद्रपूर जिल्ह्यात सुमारे २०८ वाघांची नोंद आहे. ताडोबा-अंधारी व्याघ्रप्रकल्प हा वाघांसाठी सर्वोत्कृष्ट नैसर्गिक अधिवास आहे. तसेच वाघांना मुबलक प्रमाणात येथे शिकार उपलब्ध आहे. त्यामुळे एकट्या ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पात वाघांची संख्या सर्वाधिक असून, त्यापाठोपाठ ब्रम्हपूरी वनक्षेत्रात संख्या आहे. वनक्षेत्राच्या तुलनेत वाघांची संख्या अधिक असल्यामुळे व्याघ्रप्रकल्पातून वाघ बाहेर पडत आहेत. परिणामी मानव-वन्यजीव संघर्ष वाढला आहे. अधिवास आणि अस्तित्वासाठी दोन वाघ आपसात लढत आहेत. त्यामुळे व्याघ्रप्रकल्पाबाहेरील वाघांच्या स्थलांतरणाची सरकारी योजना आहे.









विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

# रामका गुणगान करिये

खरं तर केवढा आनंदाचा हा प्रसंग ! आणि त्यानंतर लगेच कैकयी आपले दोन वर दशरथाकडून मागून घेते. एका वराने रामाला वनवासात पाठवावे आणि दुसऱ्या वराने भरताला राजा करावे. दोन्ही टोकाचे प्रसंग ! एक अति आनंदी होण्याचा, तर दुसरा अति दुःखी होण्याचा. पण या दोन्ही प्रसंगात रामाची स्थितप्रज्ञता आपल्याला दिसते. तो आनंदाने हुरळून जात नाही की वनात जावे लागेल म्हणून दुःखी होत नाही. कोणतीही परिस्थिती संयमाने कशी हाताळावी याचं मूर्तिमंत उदाहरण म्हणजे राम. म्हणूनच तो 'मर्यादापुरुषोत्तम' आहे. त्याच्या वागण्याबोलण्यात सागराचे गांभीर्य आहे. दशरथ राजामध्ये रामाला वनवासात जा म्हणून सांगण्याची हिंमत राहिलेली नसते. पण आपल्या पित्याने दिलेले वचन खोटे ठरू नये म्हणून तो आनंदाने वनवासाला जायला निघतो. खरं तर प्रजा त्याच्या बाजूनं असते. त्याने उठाव केला तरी प्रजेने त्याची साथ दिली असती एवढा तो प्रजेला प्रिय होता. पण रामाचा निर्धार, रामाचा शब्द म्हणजे काळ्या दगडावरची रेघ. त्यात कालत्रयीही बदल होणार नाही. सीतेसारखी तरुण आणि त्रिभुवनात जिच्या सौंदर्याची कोणी बरोबरी करू शकणार अशी पत्नी. नुकताच विवाह पार पडलेला. अशा वेळी आपल्या तरुण आणि सुंदर पत्नीचा मोहही त्याला अडवू शकत नाही. सीता नंतर त्याच्यासोबत जाते हा भाग वेगळा. कैकयीमुळे आपल्या प्राणप्रिय असलेल्या बंधूला वनात जावे लागते हे लक्ष्मणाला कळते, तेव्हा तो कैकयीची निर्भत्सना करतो. अशा वेळी राम त्याला सुंदर शब्दात समजावतो. 'लक्ष्मणा, अरे जशी माता कौसल्या, माता सुमित्रा तशीच माता कैकयी. माता ही सदैव आदरणीय असते. 'जननी जन्मभूमिश्च स्वर्गादपि गरियासि 'हे त्याचे ब्रीद आहे.' नाहीतरी मला काही ऋषीमुनींची भेट घ्यायची इच्छा आहे.





## आनंदी पहाट

# वैचारिक प्रगल्भता प्राप्त होणे आवश्यक

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

अगदी प्राचीन काळापासूनच आपण स्वतःच्या विचारांचा आणि स्वतःच्या कीर्तीचा प्रसार करण्यासाठी विविध माध्यमांचा उपयोग करत आलो आहोत. प्रत्येक व्यक्तीच्या व्यक्तिमत्वाची

ओळख ही त्या त्या व्यक्तीच्या विचारांवरूनच होत असते. हयातीत आणि नंतर सुद्धा विचारच

शिल्लक राहतात. कायम विचारांची भूक असलेली माणसं विचारवंतांच्याच शोधात असतात. भेटणे, बोलणे, संपर्क करणे हे फक्त प्रारंभापुरतं निमित्तच ठरत असतं. आयुष्याच्या प्रवासांत सोबत हवी असते, ती विचारांचीच. विचारांचा पाया मजबूत असलेल्या व्यक्तीच्या मानसिक कळसाची उंची मोजणे सहज शक्य होतंच असं नाही. अशा व्यक्तीपेक्षा त्या व्यक्तीच्या विचारांचंच आकर्षण, कौतुक आणि आदर अधिक असल्याचं दिसून येत असतं. अशी वैचारिक प्रगल्भता प्राप्त करणाऱ्यांपैकी आपणही एक असायला काय हरकत आहे ? असा विचार कधी येतो का हो आपल्या मनांत ? विचारवंतांच्या वैचारिक बैठकीत सामील व्हायला कसं मिळेल ह्याच दृष्टीकोनातून प्रयत्न करण्यात येणं महत्वाचं ठरतं. कारण, अशा विचारवंतांच्या वैचारिक आणि मानसिक कळसाला स्पर्श करून येणारा प्रकाशाचा आणि आशेचा प्रत्येक किरण मार्गस्थ होण्यासाठी अनेकांना योग्य दिशा दाखवत असतो. दशदिशांपैकी कोणत्याही दिशेने मार्गस्थ झालं, तरीही यश प्राप्तीच्या मार्गाचं दर्शन होतंच राहतं. संपूर्ण जग सुंदर आहे, फक्त तसं पहायला हवं; प्रत्येक नातं जवळचं आहे, फक्त ते उमजायला हवं; प्रत्येक गोष्टीला अर्थ आहे, फक्त तसं समजायला हवं. ते समाध आणि आनंद आपल्याला मिळत राहायला हव्यात म्हणून सकारात्मक विचार, आचार आणि संस्कार ह्याचं महत्व आपल्याला कळणं आणि अवगत होणं आवश्यक असतं.



आधुनिक केसरी

## देह हो पंढरी | निरंतर ||

करी जो संकल्प | जगाच्या हिताचा ||
तो एक हरिचा | भक्त जाणा ||१||
ठेवोनिया स्वार्थ | वागतो जनात ||
त्याचा होय अंत | क्लेशदायी ||२||
सज्जनांच्या पायी | टेकवितो माथा ||
त्याची यशोगाथा | हरि गातो ||३||
राखोनिया भान | संसारी नांदतो ||
परमार्थी रमतो | तोचि संत ||४||
कर्तव्याचा टाळ | गुंजता अंतरी ||
देह हो पंढरी | निरंतर ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरुपण

आधुनिक केसरी



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर


भ्रमो तु नेत्रयोः शक्यं
तौलनं कर्णनेत्रयोः।
कृत्वा हि निर्णयः कार्यः
परिणामे सुखावहः।।

डोळ्यांचाही भ्रम होऊ शकतो. तेव्हा कान आणि डोळे यांची तुलना करून निर्णय करावा. असा निर्णय परिणामी सुखावह असतो.

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

आपत्ति में धीरज धरे, यह अमूल्य गुण जान ।
शील शान्ति से काम ले, यह गुरु नीति महान्
।।२५।।(स्वर्वेद तृतीय मण्डल द्वितीय अध्याय) ०३/०२/२५


मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
आपत्ती काळात धैर्य गुण धारण करणे उत्तम आहे. शील-शांतीने राहून आपल्या मर्यादांचं रक्षण करत लक्ष्य गाठलं पाहिजे. हाच सद्गुरूंचा कल्याणप्रद, उत्तम उपदेश आहे.



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## काव्य-चरितावली



पुष्प २३वे

आधुनिक केसरी

श्रीमहाराजांनी गुरूंच्या सेवेत अनुभवली
स्वभाववृत्ती तुकामाईची जणू ऊन-सावली
कधी झिडकारी ते, कधी प्रेमाने जवळ घेती
सेवा स्वीकारी आनंदे कधी उग्र स्वरूपे वागती ।।

असता सभोवताली हो जन, गुरू तुकामाई
उधळती स्तुतीसुमने श्रीमहाराजांवरती
कधी कधी तर श्रीमहाराजांची निंदा करिती
शांत चित्ते श्रीमहाराज गुरूंचे रूप पाहती ।।

गुरुसेवेत तत्पर सदा श्रीमहाराजांना
गुरू तुकामाईंच्या आज्ञेविना सारे कळू लागले
लीन होऊनी सेवेत श्रीमहाराज मग्न झाले
चिंतनात सदा गुरू तुकामाईचे स्मरण केले ।।

अजोड हे शिष्य- श्रीमहाराज - गुरू तुकामाई
म्हणे-अरुणदास-चरणी यांच्या ठेवू या डोई ।।




अरुण वि. देशपांडे
संपर्क क्र. 9850177342

# परमार्थ हा प्रपंचात मिसळला पाहिजे

आधुनिक केसरी

प्रत्येक माणूस या ना त्या मार्गाने समाधान शोधत असतो. पण सुख दुःखाचे हेलकावे देणे हा प्रपंचाचा मूळ स्वभाव असल्याने त्याच्या आहारी जाणाऱ्या माणसाला प्रापंचिक यश मिळून सुद्धा जीवनाच्या अखेर पर्यंत समाधान मिळत नाही. नुसता प्रपंच चांगला करणे हे काही मनुष्यजन्माचे ध्येय नाही. जनावरे देखील आपापला प्रपंच करतात. आपल्या खऱ्या स्वरूपाचा म्हणजे भगवंताचा विसर पडणे हे सर्व असमाधानाचे मूळ आहे. मनुष्याने भगवंताची उपासना करून त्याची प्राप्ती करून घेतली, तरच प्रपंचातील कष्टांचे सार्थक होते. असे श्रीमहाराजांचे अनुभवसिद्ध मत आहे.

अंतःकरण शुद्ध होऊन पूर्ण समाधानाचा व खऱ्या आनंदाचा साक्षात्कार होण्यासाठी संताची संगत व भगवंताचे नाम हे दोनच उपाय प्रापंचिकाच्या पचनी पडतात. त्यातदेखील संताची संगत मिळणे व टिकणे कठीण असते. परंतु नामस्मरणाला कसलीही अट नाही, कसलेही बंधन नाही,



त्यातच सत्संगती लाभते व भगवंताचे चिंतन आपोआप घडते. चिंतनातून अनुसंधान उदय पावते आणि अनुसंधान पक्के झाले की स्वतःच्या हृदयात भगवंताचे दर्शन घडते. हे श्रीमहाराजांच्या उपदेशाचे सार आहे. प्रपंचामध्ये का होईना, पण निष्कपट प्रेम करावयास शिकणे हे भगवंतावर प्रेम करावयास शिकण्याची पहिली पायरी आहे. घरच्या माणसांना दीनवाणे व कष्टी कधी ठेवू नये, त्यांची आबाळ कधी करू नये, असे सांगून श्रीमहाराज म्हणत की ज्या प्रपंचात राम नाही त्या प्रपंचात आराम होणार नाही! नवराबायकोमध्ये, आईबाप व मुलांच्यामध्ये, भाऊबहिणींच्यामध्ये निष्कपट प्रेम असले तर त्यांना त्याचे विशेष कौतुक वाटायचे. सासू-सून प्रेमाने राहिल्या तर ते दोघींचीही स्तुती करीत. 'आपला परमार्थ हा प्रपंचात मिसळला पाहिजे. प्रपंच करीत असताना कर्तव्याची जागृती राखून त्यामध्ये भगवंताची अखंड स्मृती ठेवली तर कोणालाही समाधानाची प्राप्ति होऊ शकते.' असे महाराजांचे सांगणे आहे.

श्रीमहाराज सांगत,' बाळ, भगवंताने प्रपंचामध्ये ज्या परिस्थितीत आपल्याला ठेवले आहे, तिच्यामध्ये समाधान मानावे आणि त्याच्या नामाला कधी विसरू नये. जो नाम घेईल त्याच्यामागे राम उभा आहे, नाम घेणाऱ्याचे राम कल्याण करतो. एवढे माझे सांगणे शेवटपर्यंत विसरू नका.'

## तुकाराम गाथा

आधुनिक केसरी

जेणें घडे नारायणीं अंतराय । होत बाप माय वर्जावीं तीं ॥१॥
येर प्रिया पुत्र धना कोण लेखा । करिती तीं दुःखा पात्र शत्रु ॥ध्रु.॥
प्रल्हादें जनक बिभीषणें बंधु । राज्य माता निंदु भरतें केली ॥२॥
तुका म्हणे सर्व धर्म हरिचे पाय । आणीक उपाय दुःखमूळ ॥३॥
मान अपमान गोवे । अवघे गुंडूनी ठेवावे ॥१॥

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
गुरुवार, २० एप्रिल २०२३
adhunikkesari.com Adhunik Kesari

१८१ दिवस
मुदत ठेवीवर मिळवा
11%
व्याजदर
* नियम व अटी लागू
टोल-फ्री : 18004197501 rajasthanimultistate.in

राजस्थानी मल्टीस्टेट
कार्यक्षेत्र महाराष्ट्र-कर्नाटक
राजस्थानी मल्टीस्टेट
को-ऑप. क्रेडीट सो.लि., परळी वैजनाथ
बँकींग • आरोग्य • शिक्षण • रियल ईस्टेट • इन्शुरन्स


चंदुलाल बियाणी
चेअरमन

कार्यरत शाखा :
मुख्य कार्यालय व शाखा : मोंढा मार्केट, परळी वैजनाथ, जि. बीड. 9130072178/88
पंचशिल नगर शाखा : विद्यानगर जलालपूर रोड, पंचशिल नगर, परळी वैजनाथ, जि. बीड. 9130072809
मुख्य शाखा विस्तारित कक्ष : ऊर्जा प्लाझा, गणेशपार रोड, परळी वैजनाथ, जि. बीड. 9130072181
पंचशिल नगर शाखा विस्तारित कक्ष-१ : दिगंबर कॉम्प्लेक्स, नेहरू चौक (तळ), परळी वैजनाथ, जि. बीड. 9130072180
पंचशिल नगर शाखा विस्तारित कक्ष-२ उड्डान पुला जवळ, शिवाजी नगर, परळी वैजनाथ, जि. बीड. 9130072805
सिरसाळा शाखा : बड़े निवास, जुने बस स्टँड रोड, सिरसाळा, ता. परळी वैजनाथ, जि. बीड. 9130072184
अंबाजोगाई शाखा: प्रशांत नगर, बस स्टॅण्डच्या मागे, अंबाजोगाई, ता. अंबाजोगाई, जि. बीड. 9130072183
विस्तारीत कक्ष अंबाजोगाई-१ : मोहन कॉम्प्लेक्स, मेनरोड, अंबाजोगाई, ता. अंबाजोगाई, जि. बीड. 9130072802
विस्तारीत कक्ष अंबाजोगाई-२ घाटनांदुर, मेनरोड, अंबाजोगाई, ता. अंबाजोगाई, जि. बीड. 9130072808
बीड शाखा : जिजामाता चौक, मोंढा रोड, ता. जि. बीड. 9130072221
सोनपेठ शाखा : स्नेह सदन, विटा रोड, सोनपेठ, ता. सोनपेठ, जि. परभणी. 9130072186
गंगाखेड शाखा : डॉक्टर लेन, एच.डी.एफ.सी. बँकेसमोर, गंगाखेड, जि. परभणी. 9130072807
विभागीय कार्यालय व महेश नगर शाखा : अपना बजार २०४ २०६, आकाशवाणी जवळ, औरंगाबाद 9130072176 / 77
राजा बजार शाखा : बालाजी मंदिर समोर, राजा बजार, शहागंज, मोंढा, ता. जि. औरंगाबाद. 9130072022
माळीवाडा विस्तारीत कक्ष : नाशिक रोड, माळीवाडा, ता. जि. औरंगाबाद. 9130072803
अंबड शाखा: जालना-बीड रोड, महावीर चौक, आंबड, जि. जालना. 9130072804
जालना शाखा : मेन बस स्टैंड रोड, जालना, ता. जि. जालना. 9130072806
जालना विस्तारीत कक्ष-१ : जांगडे कॉम्प्लेक्स, जालना-अंबड रोड, ता. जि. जालना. 9130072226
नांदेड विस्तारीत कक्ष : पहिला मजला, गुरूकृपा मार्केट, महावीर चौक, ता. जि. नांदेड. 9130003070
उदगीर विस्तारीत कक्ष : पहिला मजला, लासूणे कॉम्प्लेक्स, देगलूर रोड, उदगीर, जि. लातूर. 9130072190
टोकवाडी विस्तारीत कक्ष: परळी-बीड रोड, टोकवाडी, ता. परळी वैजनाथ, जि. बीड. 9130072224
दिंद्रुड विस्तारीत कक्ष : शेप कॉम्प्लेक्स, परळी-बीड रोड, दिंद्रुड, ता. माजलगाव, जि. बीड. 9130002070
लातूर विस्तारीत कक्ष : कव्हा रोड, शिवनेरी गेट जवळ, लातूर 9130002070
औराद विस्तारीत कक्ष : मेन रोड, कृष्णा ऑईल मिल समोर, औराद शहाजनी, ता. निलंगा, जि. लातूर. 9130003044
बीड विस्तारीत कक्ष : मोंढा मार्केट, संतोषी माता मंदिर समोर, बीड, ता.जि. बीड. 9130072221
उमरगा शाखा : शिवाजी महाविद्यालय जवळ, बालाजी नगर, मेन रोड, उमरगा, जि. उस्मानाबाद.
परभणी शाखा: कापसे भवन, कच्छी बजार, सरदार वल्लभभाई पटेल रोड, परभणी.
अहमदनगर शाखा: शॉप नं. ३ व ४ बेसमेंट, मोरया कॉर्नर, मोरया मंगल कार्यालय, पाईपलाईन रोड, अहमदनगर.
केज शाखा : वकीलवाडी, कानडी रोड, केज, ता. केज. जि. बीड.
माजलगाव शाखा : गाळा क्र.८, सिद्धेश्वर कॉम्प्लेक्स, गढी कॉर्नर, गढी रोड, माजलगाव, ता. माजलगाव, जि. बीड.
नियोजित शाखा :
धर्माबाद
उमरखेड
नाशिक
पंढरपूर
रेणापूर
पुणे
अकोला
कॉर्पोरेट ऑफिस : २०५,२०६, बिल्डिंग नं. २, पहिला मजला, अपना बाजार, जालना रोड, औरंगाबाद . मो. 9130072176, 9130072177

## पोलिसांमुळे मिळाली विसरलेली बॅग

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** येथील बसस्थानकावर १४ एप्रिल रोजी एक बँग आढळून आली त्यात मोबाईल व चार्जर,व कपडे आढळले असता बस स्थानकावर कार्यरत असलेले पोलीस कर्मचारी मुक्तार खान यानी शहानिशा करून बँग ताब्यात घेतली तपासाअंती मोबाईलवरून नातेवाईकाचा संपर्क झाल्याने कांबी, ता.शेवगाव येथील पांडुरंग इसारवाडे व्यक्तीची बॅग विसरली होती परंतु त्याच्या लक्षात येत नव्हते कि नेमकी कोठे विसरली, परंतु पैठण बसस्थानकावर कार्यरत आसलेल्या पोलिस कर्मचारी खान यांच्या लक्षात येताच त्यांनी ती बॅग सुरक्षित ठेवली व सात दिवसानंतर ती बॅग, व मोबाईल पोलिस निरिक्षक लक्ष्मण केंद्रे यांच्या मार्गदर्शनाखाली हेड कॉस्टेबल मुक्तार खान, पोलिस आमलदार नाईक साह्यक फौजदार सुधीर ओहूळ यांनी पांडुरंग इसारवाडे यास ओळख पटवून परत देण्यात आली.





## मंत्रालय को. ऑ. बँकेच्या उपाध्यक्षपदी सुनील खाडे

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** मंत्रालय बँकेची शतक पुर्तीकडे वाटचाल सुरू असून या बँकेने नुकताच सन २१-२२ सालासाठी पगारदार नोकरांची आदर्श बँक म्हणून प्रथम क्रमांक पटकावला आहे. मंत्रालय बँकेच्या नविन - ४ शाखा - पुणे , नगर, पालघर व नाशिक येथे लवकरच सुरू होणार आहेत. मंत्रालय बँकेवर १५ संचालक असून त्यातील सर्वांशीच सलोख्याचे व आदराचे स्थान असलेले सुनील खाडे यांची एकमुखाने बिनविरोध निवड करण्याचे ठरले. त्यासाठी विशेतः बँकेचे अध्यक्ष प्रमोद पंडित व सहकारी संचाल मंडळ यांनी विशेष परिश्रम घेतले. त्या सर्वांचे सुनिल खाडे यांनी आभार मानले. बँकेच्या उपाध्यक्षपदाची निवडणूक जिल्हा सहकारी निडणूक अधिकारी नितीन काळे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी सर्व बँकेचे संचालक मंडळ तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी व सर्व कर्मचारी यांनी सुनील खाडे यांचे पुष्पगुच्छ देऊन शुभेच्छा दिल्या.

# न्यायालयात तडजोडीचे सात लाख जमा करण्यासाठी निघालेल्या दोघांना लुटले

## धुळे- सोलापूर हायवेवरील माळेवाडी टोलनाका परिसरातील घटना

आधुनिक केसरी न्यूज

**अंबड :** छत्रपती संभाजीनगरच्या कोर्टात तडजोडीचे 7 लाख जमा करण्यासाठी निघालेल्या गेवराईच्या दोघांना पाचोडजवळील धुळे सोलापूर हायवेवरील भोकरवाडी-माळेवाडी या टोलनाका परिसरात कारमध्ये आलेल्या 7 जणांनी मोटारसायकलस्वार दोघांवर हल्ला चढवून 7 लाखांची थैली हिसकावून पोबारा केल्याची घटना भरदिवसा दि. 18 रोजी अंबड पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली आहे. या प्रकरणी अंबड पोलिस ठाण्यात 7 जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी अंबड पोलिस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीत नंदकिशोर भिकाजी वैराळ ( वय 40 वर्ष ) रा.मनुबाईजवळा ता.गेवराई यांनी म्हटले आहे की, आपला लहान भाऊ महादेव वैराळ याच्याविरुध्द त्याच्या सासरचे लोकांनी छत्रपती संभाजीनगर येथील कोर्टात केस टाकलेली आहे. दरम्यान त्या केसमध्ये 15 एप्रिल 2023 रोजी 13 लाख 50 हजारात तडजोड असल्याने नंदकिशोर वैराळ यांच्या भावाचा मेव्हणा विलास आसाराम गायकवाड ( रा. सानकवाडी ता.पैठण ) याचे खाते 47 वर 7 लाख रुपये आरटीजीएसद्वारे पाठविले होते. उर्वरीत 6 लाख 50 हजार रुपये नंदकिशोर लाल वैराळ हे त्यांचा भाऊ महादेव हे 15 एप्रिल 2023 रोजी घेवून जाणार होते.

दरम्यान नंदकिशोर वैराळ व भाऊ महादेव वैराळ मोटारसायकलने



दुपारी 1 वाजेच्या सुमारास गेवराई येथून एकूण 7 लाख रुपये एका थैलीत घेवून छत्रपती संभाजीनगर येथील कोर्टात जमा करण्यासाठी निघाले. रस्त्यात पाचोडसमोर धुळे सोलापूर हायवे वरिल माळेवाडी टोल नाक्याजवळ अगोदर अंदाजे 50 मीटरच्या अंतरावर दुपारी 2 वाजून 30 मिनिटाच्या सुमारास जात असताना त्यांच्या मोटारसायकलसमोर पाठीमागून पाचोड कडून येणारी कार अचानक येवून थांबली. त्या कारमधून नंदकिशोर वैराळ यांच्या भावाचा मेव्हणा सचीन नामदेव नेमाणे, ज्ञानदेव नेमाणे, गणेश ज्ञानदेव नेमाणे सोमनाथ नेमाणे, लखण नेमाणे,नामदेव नेमाणे सर्व ( रा.पाचोड ता. पैठण ) व त्यांचा पाहुणा धर्मराज नारायण वैद्य ( रा. शिरनेर ता. अंबड ) हे उतरले. त्यांनी या दोघांना शिवीगाळ करुन तडजोडीचे पैसे येथेच द्या. असे म्हणून वाद करू लागले.यावेळी नंदकिशोर वैराळ हे त्यांना म्हणले की, पैसे आज कोर्टात द्यायचे आहे, तुम्ही येथे का पैसे मागता असे त्यांना म्हणत असतांना नंदकिशोर वैराळ यांच्या भावाचा मेव्हणा सचिन नेमाणे याने कारमधून लोखंडी रॉड काढून नंदकिशोर वैराळ यांच्या डाव्या डोळ्याच्या भुवयीवर मारले. व गणेश ज्ञानदेव नेमाणे, ज्ञानदेव नेमाणे, सोमनाथ नेमाणे, लखण नेमाणे, नामदेव नेमाणे व त्यांचा पाहुणा धर्मराज नारायण वैद्य हे कारमधून काठ्या व सळई काढून नंदकिशोर वैराळ यांच्या पाठीवर व दोन्ही पायावर मारहाण करत असताना भाऊ महादेव हा भांडण सोडविण्यास आला.

त्यावेळी त्याला काठीने व सळईने मारहाण केली शिवाय त्याच्या हातातील तडजोडीचे 7 लाख रुपये असलेली थैली सचिन नेमाणे व गणेश नेमाणे यांनी हिसकावून घेतली. तसेच तुम्ही जर आमच्या विरोधात पोलीस स्टेशनला तक्रार दिली तर तुम्हाला जिवंत मारून टाकू असे धमकावून ते पसार झाले. त्यानंतर जखमी नंदकिशोर वैराळ व त्यांच्या भावाला घाटी रुग्णालयात दाखल करण्यात आले. याप्रकरणी नंदकिशोर वैराळ यांनी दिलेल्या तक्रारीवरून संबंधित 7 जणांविरुद्ध अंबड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास अंबड पोलिस करत आहेत.

## वडोद बाजार येथे देशी दारूची विक्री

आधुनिक केसरी न्यूज

**वडोदबाजार :** येथील अवैध देशी दारू विक्री बंद करण्याची मागणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे तालुका अध्यक्ष रमेश धनके यांनी निवेदनाद्वारे केली होती. मात्र ड्रायडे च्या दिवशी 14 एप्रिल रोजी सुद्धा वडोद बाजार येथे देशी दारूची सर्रास विक्री होताना आढळून आली मात्र पोलिसांनीही कोणतीही कारवाई न करता याकडे दुर्लक्ष करीत असल्याचे आढळून आले दिसत आहे दररोज सात वाजेपासून पहाटे नऊ वाजेपर्यंत वडोद बाजार येथे देशी दारूची सर्रास विक्री होते. तर ड्रायडेच्या दिवशी सुद्धा अवैध देशी दारू मिळते. त्यामुळे या अवैद्यदेशी दारू विक्रेत्याकडे जणू परवानाच मिळाला आहे आहे का ? असा प्रश्न नागरिकांकडून विचारला जात आहे पहाटेपासूनच देशी दारूची विक्री होत असल्यामुळे पहाटेच्या वेळी देवदर्शनासाठी जाणाऱ्या नागरिकांना या दारुड्याचा त्रास सहन करावा लागत आहे मात्र याकडे ग्रामपंचायत दुर्लक्ष करते तर पोलीस प्रशासनही यावेद्य देशी दारूच्या विक्रेत्याकडे दुर्लक्ष करीत आहे हे अवैध्य देशी दारूची विक्री बंद करण्याची मागणी निवेदनाद्वारे करण्यात आले असतानाही पोलीस यावेद्य दारू देशी दारू विक्रेत्यावर कोणतीही पोलीस कारवाई करताना दिसत नाही. पण पार्टी ऑफ इंडियाचे तालुका अध्यक्ष तथा पत्रकार रमेश धनके यांनी13व 14 एप्रिल रोजी वडोद बाजार पोलिसांना अवैध देशी दारू विक्री बाबत माहिती दिली होती तरीही पोलिस कोणतेही कारवाई करताना दिसून आले नाही तर दररोज पहाटे देशी दारूची विक्री सुरू असते त्यामुळे वडोद बाजार येथील काही नागरिक त्रस्त झालेला आहे यावे ते देशी दारूची विक्री बंद करण्यात यावी अशी मागणी आता नागरिकांकडून होत आहे.

# भारताने मोडला रेकॉर्ड

आधुनिक केसरी

जगातील सर्वाधिक लोकसंख्येचा देश म्हणून तोरा मिरवणाऱ्या चीनचा भारताने रेकॉर्ड मोडला आहे. United Nations Population Fund च्या स्टेट ऑफ वर्ल्ड पॉप्युलेशनच्या अहवालानुसार भारताची लोकसंख्या चीनपेक्षा किंचितशी वाढली असल्याचे स्पष्ट झाले आहे. तर, येत्या काळात लोकसंख्येच्या बाबतीत भारत चीनपेक्षाही अधिक पुढे जाईल, असेही या अहवालात नोंदवण्यात आले आहे. United Nations Population Fund च्या स्टेट ऑफ वर्ल्ड पॉप्युलेशनच्या अहवालानुसार संपूर्ण जगाची लोकसंख्या ८ बिलिअनपेक्षाही अधिक झाली आहे. यामध्ये भारत आणि चीनचा सर्वाधिक वाटा आहे. भारत-चीनमध्ये जगाच्या एकूण लोकसंख्येपेक्षा एक तृतीयांश लोक आहेत. या अहवालानुसार भारताची लोकसंख्या १४२.८६ कोटी झाली असून चीनची १४२.५७ कोटी नोंदवण्यात आली आहे. अहवालानुसार, भारताचा प्रजनन दर सरासरी २.० नोंदवण्यात आला आहे. तर, सरासरी आर्युमान पुरुषांसाठी ७१ वय तर महिलांसाठी ७४ वय आहे. २०२२ च्या आकडेवारीनुसार भारतीयांचे सरासरी आर्युमान ६९ वय होते. आता ते वाढून ७१ झाले आहे. या अहवालात २०२२ मध्ये भारताची लोकसंख्या १४०.६ कोटी नोंदवण्यात आली होती. यापैकी ६८ टक्के १५ ते ६४ वयोगटातील लोकांचा समावेश होता. तर, नव्या अहवालानुसार, २० कोटींहून अधिक लोकसंख्या १५ ते २४ या तरुण वयोगटातील आहेत. धक्कादायक म्हणजे, गेल्या वर्षीपेक्षा यंदा १.५६ टक्क्यांनी भारताची लोकसंख्या वाढली आहे. भारताची स्वतंत्र शक्तीशाली कथा आहे. भारत वेगाने शैक्षणिक, सार्वजनिक आरोग्य, स्वच्छता, आर्थिक प्रगती, तंत्रज्ञान यात प्रगती करत आहे. या देशात २० कोटींहून अधिक जनता १५ ते २४ या वयोगटातील असल्याने नवे प्रयोग होण्याचा पर्याय आहे, असे UNFPA मधील भारताच्या लोकप्रतिनिधी अॅण्ड्रे वोजनार यांनी म्हटले आहे. विविध क्षेत्रात वेगाने प्रगती करत असलेला चीन देश लोकसंख्येच्याबाबतीत जगभरात अव्वल क्रमांकावर होता. परंतु, गेल्यावर्षी चीनची लोकसंख्या गेल्या सहा दशकांत पहिल्यांदा घसरली. तर, यंदाही या आकडेवारीत घसरण झालेली आहे. २०२२ मध्ये चीनची लोकसंख्या १४४.८५ कोटी नोंदवण्यात आली होती. तर, नव्या अहवालानुसार चीनमध्ये १४२.५७ लोकसंख्या असण्याचे सांगण्यात येत आहे. भारतात २०११ साली जनगणना झाली होती. त्यावेळी १० वर्षांच्या तुलनेत भारतात १.७ टक्क्यांनी वाढ झाली होती. तर, सरासरी वाढ १.२ टक्के नोंदवण्यात आली होती. २०११ नुसार भारताची लोकसंख्या १२० कोटी आहे. तर, आता युएनपीएफने दिलेल्या आकडेवारीनुसार भारताची लोकसंख्या १४२.५७ कोटी असण्याची शक्यता आहे.



कमलाकर जोशी
ज्येष्ठ पत्रकार, नांदेड
संपर्क क्र. 9422170850

# आंदोलकांनो ! हातात दगड घेताल तर जेलमध्ये जाल ?

आधुनिक केसरी

**नांदेडमध्ये पंधरावर्षापूर्वी म्हणजे २००८ मध्ये शिवसेनेने महागाईच्या विरोधात केले.या आंदोलनाला हिंसक वळण लागले होते. यातून एस.टी बसेस दगडफेक करण्यात आली.यात पोलिस कर्मचारी जखमी झाले होते. पोलिसांना या आंदोलनात माजी आ. श्रीमती अनुसयाताई खेडकर व इतर १६ शिवसेना कार्यकर्त्यांच्या विरोधात दाखल करुन न्यायालयात खटला दाखल केला होता. या खटल्यात नांदेडच्या अतिरिक्त सत्र न्यायालयाने श्रीमती खेडकर सह १६ जणांना पाच वर्षे सक्तीमजुरी व प्रत्येकी१ लाख ६० हजार ७५० रू. दंडाची सुनावली आहे. न्यायालसाचे निर्णयामुळे राजकीय पक्षाचे नेते व कार्यकर्ते हादरले आहेत.**

महाराष्ट्रात रोज कोण-कोणत्या पक्षाचे, संघटनेचे आंदोलन चालू असते. लोकशाहीत न्याय व हक्कासाठी आंदोलन करणे चुकीचे नाही.पण या आंदोलनात तर कार्यकरर्त्यांनी कायदा हातात घेतला व त्यातून हिंसक घटना घडल्या तर मग जेलची हवा खाण्याची वेळ येते.आपले आंदोलन हे राजकीय स्वरूपाचे आहे.या भ्रमात राजकीय पक्षांनी आता राहू नये. नांदेड आंदोलकाना शिक्षा सुनावली,त्याचे उदाहरण आहे. आता याबाबत उच्च न्यायालयात अपील केल्यानंतर जामीन मिळाला आहे. मराठवाडा विकास आंदोलनात तरुणांना नांदेड न्यायालयाने शिक्षा दिली होती,त्यावेळी प्रकरणाची या निमित्ताने आठवण होते.राजकीय पक्षांनी आंदोलन करुन नये,असे नाही.पण आज आंदोलन करणे म्हणजे सक्तीने बंद करणे,रस्ते बंद करणे,दगडफेक करणे,सार्वजनिक मालमत्ते नुकसान करणे,सामान्य माणसालावेठीस धरणे,असे स्वरूप आलेले आहे.अन्यायाविरुध्द शांततेने दृढ निश्चयाव्दारे प्रतिकार करण्याचा एक हा अहिंसक मार्ग म्हणजे सत्याग्रह होय! सत्याचा आग्रह धरणे म्हणजे सत्याग्रह.पौराणिक आख्यायिकेत सत्याग्रह शब्दाचा उल्लेख आढळतो. पण सत्याग्रह करणाऱ्या प्रतिकारासाठी संयमपणा सहनशीलता,अत्यंत आवश्यकता असते. सत्याग्रहींनी हिंसा व असत्य मार्गाचा वापर करता कामा नये.सामान्य माणासाला हा मार्ग अनुसरता येतो.इंग्रजाच्या अन्याच्या विरोधात व स्वातंत्र्यासाठीअनेक क्रांतिविरांनी हातात शस्त्र घेतले, त्यांनी जीवाची कधी पर्वा केली नाही. तेंव्हा क्रांतिवीर हसत फासावर गेले. १९२० मध्ये लोकमान्य टिळकांच्या निधनानतर राष्ट्रीय चळवळीचे नेतृत्व महात्मा गांधी यांचेकडे आले. त्यांनी आंदोलनासाठी हिंसेचा मार्ग स्वीकारला नाही.गांधीजींचे स्वातंत्र्याच्या लढ्यात त्यांचे निश्चितच योगदान आहे, हे नाकारता येत नाही. पण एकट्या गांधीजीमुळे भारताला स्वातंत्र्य मिळाले, असे कॉँग्रेसचे चुकीचे आहे.म. गांधींनी इंग्रजांच्या विरोधात 'चलो जाव' नारा दिला होता.उलट त्यानंतर इंग्रज पाच वर्षे भारताची होते. भारताची सूत्रे हाती घ्या, यासाठी ते मागे लागले होते,परंतु त्यावेळी हिंदू व मुस्लिम वाद बरेच दिवस चालला. कॉँग्रेसमुळे देशाला स्वातंत्र्य मिळाले! हे म्हणणे चुकीचे आहे.कारण स्वातंत्र्यापूर्वी कॉँग्रेस ही चळवळ होती,तो राजकीय पक्ष नव्हता.म. गांधी यांनी तर कॉँग्रेस बरखास्त करण्याची सूचना केली होती.

खर तर!स्वातंत्र्याच्या आंदोलनात कॉँग्रेस पक्षाचा एकही नेता फासावर गेला नाही,लाठीमारात जखमी झालेला नाही. अथवा काळ्यापाण्याची शिक्षा व जेलमध्ये गेलेले नाहीत. कॉँग्रेस पक्ष नवीन पिढीसमोर चुकीचा इतिहास ठेवत आहेत. देशात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मानवतेला कलंक असलेल्या अस्पृश्यतेच्या विरोधात मोठा लढा दिला.त्यांनीही यासाठी आंदोलन व सत्याग्रह करावे लागले, १९२७ चा महाड चवदार तळ्याचा ऐतिहासिक सत्याग्रह, १९३६ मध्ये काळाराम मंदिरात प्रवेशाचा सत्याग्रह केला होता.डॉ. आंबेडकरांचे लढा विचाराचा व सत्याचा, अन्यायाच्या विरोधात हक्कासाठी होता. त्यांनी रुढी व परंपरा, जातीव्यवस्थेवर प्रखर प्रहार केले,पण त्यांनी लढ्याला हिंसक स्वरूप येवू दिलेले नाही.पण आज त्यांचे नातू प्रकाश आंबेडकर मात्र कामे होत नसतील तर खासदार व आमदारांना मारण्याचा सल्ला देतात! याचे आश्चर्य वाटते! १०४७ ते १९४८ हैद्राबाद मुक्ती संग्रामासाठी मोठी लढा झाला.यात शेकडो हुतात्मे झाले. त्यांच्या बलिदानाची यादी मोठी आहे. मराठवाड्यातील शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना हा इतिसास शिकविला अथवा सांगितला जात नाही. मात्र सांस्कृतिक भूकवाले केवळ सांस्कृतिक कार्यक्रमाचा हट्ट धरतात! प्रशासन ते झुकते! पण सांस्कृतिक कार्यक्रमाकडे राजकीय नेत्यांनी पाठ फिरवली. संयुक्त महाराष्ट्र निर्मितीसाठी १९५० ते १९६० पर्यंत मोठी चळवळ,आंदोलन झाले.यात सुरुवातीला १०५ हुतात्माची नोंद झाली. नंतर १०६ ची तर ५७ वर्षांनंतर १०७ वा शंकरराव तोरस्कर या हुतात्माची नोंद झाली.पण त्यासाठी तोरस्कर परिवाराला पाठपुरावा लागला. त्यानंतर पश्चिम महाराष्ट्राच्या दुजाभावविरूध्द मराठवाड्यात



१९७२ ते १९७४ विकास आंदोलन झाले.वसमत येथील नोकर भरतीच्या वेळी पोलिसांनी गोळीबारात देविदास राठोड, रामा शिसोदे यांचा बळी घेतला. १९७७ मध्ये मराठवाडा विद्यापीठाचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर नाव देण्यासाठी १६ वर्षे संघर्ष करावा लागला. यात काही जणाचे प्राण गमावले. यात दलितांची घरे वस्त्या, जाळण्यात आल्या.देशात आणि महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना संघटीत करून शेतीमालाच्या भावासाठी शरद जोशी यांनी देशव्यापी आंदोलन केले, सुमारे १३५ शेतकऱ्यांच्या छातीवर गोळ्या झाडल्या गेल्या.पण कॉँग्रेस सरकारने शहीदाचा दर्जा दिला नाही. कॉँग्रेसने ५५ वर्षे सत्तेत असताना चुकीचे धोरण राबविले, यामुळे आज शेतकरी कंगाल, दलाल व नेते मात्र मालमाल झाले. मात्र भाजपा शेतकरी विरोधी ओरड केली जातेय! यालाच म्हणतात,'उलटा चोर कोतवाल को डाटे'. शेतकऱ्यांचे प्रश्न अजून कायम आहेत. मराठवाड्यातील रेल्वेच्या रुंदीकरणाच्या मागणीसाठी १९९० मध्ये जनतेचे आंदोलन झाले होते. महाराष्ट्रात २०१८ मराठा समाजाला आरक्षणासाठी अभूतपूर्व आणि शांतताप्रिय मोर्चे निघाले होते.यात आंदोलनात तरूणांनी आपला जीव गमावला हा प्रश्न अजून सुटलेला नाही.दिल्लीत तीन कृषी कायदे रद्द करण्यासाठी २०२० मध्ये शेतकरी आंदोलन झाले. ते आंदोलन ३७८ दिवस चालले.यात काही देशविरोधी प्रवृत्तींचा शिरकाव झाला. यातून लालकिल्यावर खलिस्तानचा झेंडा फडविण्याचा प्रयत्न झाला. या आंदोलनात हिंसक घटना घडल्या आहेत. नागरिकता संशोधन कायदा ( CAA )२०१९ विरोधात दिल्लीत शाहीनबाग येथे महिलांचे आंदोलन झाले.राज्यात २०२१ मध्ये एस.टी. महामंडळाचे शासनात विलिनीकरण करावे,यामागणीसाठी कर्मचाऱ्यांनी संप व आंदोलन केले,यात१०० वर कर्मचाऱ्यांना प्राण गमावावे लागले. देशात आंदोलन व सत्याग्रह,संघर्ष केल्याशिवाय काही मिळत नाही, सत्तेतील लोकांनी तीच सवय लागलेली आहे.पण आजकाल जो तो उठता रस्ता बंद करतो.आजही आंदोलनाची सुरुवात एस,टी.वर दगड फेकूनच होते.एस.टी गरिबांच्या सन्मानाचे वहातुकीचे साधन आहे. त्यामुळे बसेसला लक्ष्य केले जाते. यात एस.टी.ला कोट्यवधीचा फटका बसत गेला. आजकाल जो उठतो, रस्ता रोको' आंदोलन करतो. यातून सामान्य माणसांना वेठीस धरले जातेय! सर्वोच्च न्यायालयाने आंदोलन करण्याचा सर्वांना अधिकार आहे,पण ते करताना इतरांना त्यास त्रास होणार नाही, याची काळाजी घेतली पाहिजे, असे स्पष्ट म्हंटले होते. पण त्याकडे दुर्लक्ष होत आहे.आंदोलक सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान, निष्पाप लोकांचा बळी घेत असतील!तर त्यांना शिक्षा व त्यांचेकडून नुकसान भरपाई आंदोलकांकडून सक्तीने वसूल झाली गेली पाहिजे. हिंसक कृत्याबद्दल त्याचेवर खटले भरून कठोर शिक्षा व्हावयाला हवी. म्हणजे लोकशाहीत सत्याग्रह, आंदोलनाचा दुरूपयोग तरी होणार नाही. राजकीय पक्ष उठसूठ आंदोलन करतात. आम्ही काही केले तरीही न्याय संस्था आम्हाला आधिकची शिक्षा कशी काय देऊ शकते? असा राजकीय नेत्यांना समज आहे. जसा गांधी परिवाराचा आहे! पण भारतीय कायद्यासमोर सर्व समान आहेत,हे सर्वोच्च न्यायालयाने नुकतेच स्पष्ट केले, तेंव्हा आंदोलकांनो! सावध रहा! कायदा हातात घेवू नका! हातात दगड,काठ्या घेताल तर जेलमध्ये जावे लागेल!

# कायकवे कैलास : जगतज्योति महात्मा बसवेश्वर

आधुनिक केसरी

**भारतीय सामाजिक जीवनाला विशिष्ट स्वरुप व दिशा प्राप्त करून देणारे बाराव्या शतकातील महात्मा बसवेश्वर हे एक अभूतपूर्व क्रांती घडवून आणणारे थोर समाजसुधारक होते. कायक या नवीन शब्दाने समाजामध्ये स्वातंत्र्य, समता, बंधुता, मानवता, दया, अंहिसा, त्याग, सेवा 'कायकता'अर्थात श्रमप्रतिष्ठा इत्यादी अनेक मूल्य तत्कालीन विचारांमध्ये रुजवली.**



कायक हा संस्कृत शब्द आहे.काय+ का=शरीराने केलेले काम, शारीरिक कष्ट करून, घाम गाळून, परिश्रम करून,राबवून केलेले काम असा त्याचा अर्थ होतो. 'कायकचा अर्थ म्हणजे देह अथवा शरीर होय.' प्रत्येकाने आपल्या जीवन जगण्यासाठी कर्तव्य म्हणून कोणते ना कोणते तरी काम केले पाहिजे. ज्याप्रमाणे लहान किटक, गांडूळ भुमीला सुपीक करण्याचे कायक करीत असतात. वृक्ष उभे राहून दासोह भावनेने लोकांना फळे, फुले व सावली देण्याचे कायक करतात.असेच मानवाने दासोह व (कायक) श्रम केले पाहिजे. महात्मा बसवेश्वर व समकालीन शरणांनी (भक्तांनी) बाराव्या शतकात समतेचे कल्याण राज्य निर्माण केले. सामाजिक समानतेसाठी कायक व दासोह ही दोन तत्वे या जगाला दिले.कायक व दासोह शब्दास लिंगायत संस्कृतीत अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे.

कोणत्याही श्रमाला कमी लेखू नका. श्रमामुळेच माणसाला श्रेष्ठत्व लाभते. कोणतेही श्रम हे कमी किंवा श्रेष्ठ नसते. श्रमाची पूजा हीच खरी पूजा होय.यातूनच म.बस्वेश्वरांनी "कायकवे कैलास" ही श्रम संकल्पना समाजापुढे मांडली.

एका वचनात म्हणतात....

**कायक जो करील**
**देव तयाला तारील**
**हे कुडलसंगमदेवा!**

जो काम करील त्याला कुडलसंगमदेव प्रसन्न होईल.प्रत्येकांने हे काम कर्तव्य म्हणून केले पाहिजे.

श्रम करणाऱ्या लोकांनी श्रम करीत रहावे.जे लोक श्रम करीत नाहीत ते बौद्धिक कष्टावर भर देत असतात.बौद्धिक कष्ट करणाऱ्या लोकांनी श्रम करु नयेत.असे समिकरण तयार झाले होते.ही समिकरणे झुगारुन 'कायक' ला महत्त्व दिले गेले. कायक हे एक अप्रतिम बसवतत्व आहे. काम हाच दाम, काम हाच राम, काम हाच रहिम, सेवा हाच शिव, श्रमपूजा हीच ईश्वरपूजा, श्रम हेच कैलास, श्रम हेच सर्वस्व हा "कायकवे कैलास" हा मुख्य संकल्पनेचा आशय आहे.

कार्लाईल म्हणतो ( Work is Workship ) कार्य हीच पूजा होय.तर महात्मा बसवेश्वर म्हणतात ( Work is heaven )' कर्म हाच कैलास.काम हाच स्वर्ग होय.बस्वेश्वरांच्या शरण सांप्रदायात'कायक' म्हणजे श्रम...ते केल्याशिवाय अन्नग्रहण करायलाही अनुमती नव्हती.कोणते न कोणते काम करा ही शिकवण दिली.

एका वचनात कायकाचे महत्व सांगताना म्हणतात..

**श्रम ना उच्च**
**श्रम ना नीच**
**श्रम सर्व समान.**

श्रमामध्ये श्रेष्ठ व कनिष्ठ असा भेदभाव नसून,त्याच्या मते प्रत्येक श्रमाचे मूल्य सारखेच आहे.

"कायकवे कैलास" ची सुरुवात कल्याणभूमीतून झाली. बस्वेश्वर कल्याण राज्याचे प्रधानमंत्री होते.त्यांच्या कार्यकाळात एकही युद्ध झाले नाही. त्यांच्या काळात कायकला खूप महत्त्व दिले गेले.चिरंतन शांती सुख व समाधान मिळविण्यासाठी प्रत्येक व्यक्तीने कायक करणं आवश्यक आहे.असा मुलमंत्र जगतज्योति महात्मा बसवेश्वरांनी दिले. अशा या महामानवास कोटी कोटी प्रणाम!

**महादेव शरणप्पा खळुरे**
**यशवंत विद्यालय अहमदपूर**
**मो ८७९६६६५५५५**

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत)आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९


Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# आठवले with 'आठ'वलये पुस्तकाचे प्रकाशन उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** तापडिया नाट्यगृहात आज सकाळी दुष्यंत आठवले यांनी लिहिलेल्या.. आठवले with ".आठ " वलये या आत्मचरित्राताच्या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा विलक्षण उत्साहात संपन्न झाला. पुस्तकाच्या प्रकाशन सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी दिलीप गोगटेसर होते तर उद्घाटन दैनिक सकाळचे माजी संपादक यमाजी मालकर यांच्या हस्ते करण्यात आले. आठवले with " आठ " वलये या आत्मचरित्राताच्या पुस्तकाचे लेखक दुष्यंत आठवले हे आपल्या आत्मचरित्रपर पुस्तका विषयी बोलताना म्हणाले... माझ्या आयुष्यातील ही माझी जीवनगाथा साध्या शब्दात गुंफण्यात आलेली आहे.कोणतेही अलंकारिक भाषेत ती लिहिण्याचा प्रयत्न केला नाही.माझ्या जीवनातील विधायक संघर्षाची कहाणी साधी सोपी मी मांडत गेलेलो आहे. विद्या निकेतन प्रशालेतील संस्कारामुळेच मी घडलो माझ्या जीवनात निर्भयता.. सचोटी..निष्ठा.. प्रामाणिकपणाआला.विद्यानिकेतनमुळेच माझं जीवन फुललं.. बहरून आलं.माझ्या जीवनातील या आत्मचरित्रातील पुस्तकात माझा बंडखोरपणा.. माझ्यातील सर्जनशील अभियंता.. प्रगतीशील शेतकरी.. यशस्वी उद्योजक.. सामाजिक कार्यकर्ता.. स्पष्टवक्तेपणा.. मला लाभलेले जीवलग मित्र.. शेवटी आज्ञाधारक नवरा... अशी "आठ" वलये मी माझ्या आत्मचरित्रपर पुस्तकातून मांडण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे.

पुस्तकाचे प्रकाशक भास्कर सरोदे यांनी सांगितले दुष्यंत आठवले हे माझे चांगले मित्र आहेत.त्यांची मैत्रेय ही संस्था कोणत्याही जाती..पातीचा विचार नकरता निष्टेनी काम करणारी संस्था आहे.त्यामुळेच माझ्या मित्राचे आत्मचरित्रपर हे पुस्तक मी प्रकाशित केलेले आहे. उद्घाटनपर भाषणात दैनिक सकाळचे माजी संपादक यमाजी मालकर बोलताना म्हणाले.. दुष्यंत आठवले हा माझा एक जिव्हाळ्याचा मित्र आहे.आम्ही एका खोलीत पुण्यात रहात होतो.त्यामुळे दुष्यंत आठवलेंच्या जीवनातील असंख्य घटनांचा मी



साक्षीदार आहे.दुष्यंत आठवलेचं हे आत्मचरित्र म्हणजे त्याच्या जीवनपटाची साध्या सोप्या भाषेत केलेली उकल आहे.दुष्यंत विषयी सांगावयाचे झाले तर... निवासी शाळेतील जबरदस्त जिद्द चिकाटी असलेला मित्र.. खाजगी कंपनीतील कामगार.. सरकारी नोकरीतील प्रामाणिक अभियंता.. मातीच्या ओढीतूनच एक उभा राहिलेला आदर्श शेतकरी.. सामाजिक बांधिलकीच्या जाणिवेतून उभा राहिलेला एक यशस्वी उद्योजक.. अनेक संकटांवर मात करून उभा राहिलेल्या दुर्बल घटकातील एका तेजस्वी तरुणाचा हा जाज्वल्यपूर्ण इतिहास म्हणजे हे दुष्यंत आठवले यांनी लिहिलेले हे आठवले with " आठ " वलये आत्मचरित्रपर पुस्तक आहे.

कार्यक्रमाचे शेवटी अध्यक्षीय समारोप करताना दिलीप गोगटेसर म्हणाले.. शासकीय विद्या निकेतन निवासी शाळेतील विद्यार्थ्यांच्या मनात आम्रवृक्षाच्या बीया रुजलेल्या होत्या ते आम्रवृक्ष आज बहरलेले आहेत... दुष्यंत आठवले हे आपल्या करकमलानी रसाअमृताचे कलष साऱ्या समाजाला देतं आहेत.दुष्यंत आठवले यांचे हे आत्मचरित्र पुस्तक साऱ्या समाजाला नवी दिशा दाखविणारे..नवी प्रेरणा देणारे ठरेल हे बाकी खरं... कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अतिशय भावपूर्णपणे रविंद्र मगर यांनी केले. तर आभार प्रदर्शन हे रवी वतनी यांनी केले. आठवले "आठ"वलये या आत्मचरित्रपर पुस्तकाच्या प्रकाशन सोहळ्याला असंख्य उद्योजक.. शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर.. अनेक नेतेमंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सारथी बार्टी महाज्योतीस आता एकच निकष

## संशोधकांना नोंदणीपासून शिष्यवृत्ती मंजूर

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** सारथी संशोधकांना अधिछात्र वृत्ती नोंदणी दिनांकापासून मंजूर करा, अशी मागणी सातत्याने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचेकडे जेष्ठ अभ्यासक राजेंद्र दाते पाटील यांनी केली असता त्यावर मुख्यमंत्र्यांनी अंतीम निर्णयासाठी ही बाब व मागणी तात्काळ मंजुर करण्याचे आदेश नियोजन विभागाचे अवर सचिव मंत्रालय, महाराष्ट्र शासन डॉ.राजपाल देवरा यांना दिले होते दरम्यान १८एप्रिल ,२०२३ रोजी मुंबईत सह्याद्री शासकीय विश्राम गृहात मंत्रिमंडळ उपसमितीची बैठक मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्या अध्यक्षते खाली संपन्न होउन होऊन त्या मध्ये सारथी बार्टी महा ज्योतीस आता आर्थिक स्तरावर एकच निकष असण्यास मान्यता होऊन सारथी संशोधकांना नोंदणी दिनांका पासुन शिष्यवृत्ती मंजुर करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. संशोधक विद्यार्थी वर्गास हा फायदा मिळावा म्हणून सातत्यानं जेष्ठ अभ्यासक राजेंद्र दाते पाटील यांनी प्रचंड पाठपुरावा केला असुन या बाबत त्यांना सदरची बाब मंजुरीसाठीचा मेल ३१मार्च २०२३ रोजी मुख्यमंत्री कार्यालयातुन प्राप्त झाला होता.

जेष्ठ अभ्यासक राजेंद्र दाते पाटील यांनी आजच्या बैठकीत मंत्रिमंडळ उपसमितीची अध्यक्ष चंद्रकांतदादा पाटील यांना सुद्धा सविस्तर निवेदनात त्यांनी नमुद केले होते की,छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानवविकास संस्था, पुणे यांचे वतीने संशोधन ( पी.एच.डी ) साठी पात्र आलेल्या मराठा ( कुणबी मराठा )समाजा तील संशोधकांनी पीएच.डी.साठी नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांना संशोधन अधिछात्र वृती देण्याचा अभिनव उपक्रम राबवत आहे. सारथी संस्थेमार्फत पीएच. डी. साठी( सीएसएमएनआर एफ२०२२ )करीता मुलाखत व मुळकागदपत्र पडताळणी प्रक्रियेस उपस्थित सर्व ८५१ विद्यार्थ्यांची अंतिम निवड सारथी च्या वतीने करण्यात आली होती. राज्यातील इतर संस्था स्थापना झाल्या पासुन ते आज तगायात नोंदणी दिनांका पासून अधिछात्र वृत्ती देते,परंतू सारथी ही संस्था अंतिम निवड झालेल्या पीएच.डी. संशोधक विद्यार्थ्यांना नोंदणी दिंनाका पासून संशोधन अधिछात्र वृत्ती देत नाही हे जेष्ठ अभ्यासक राजेंद्र दाते पाटील यांनी वेळोवेळी मुख्मंत्र्यांकडे स्पष्ट केलेले आहे. संबंधित विषयी मराठा विद्यार्थ्यांच्या बाबतीत सकारात्मक निर्णय घ्यावा या अपेक्षेने त्यांनी सातत्याने पाठपुरावा केला असता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जातीने लक्ष घालून सदर मागणीचा गांभीर्याने विचार करून उपरोक्त मागणी तात्काळ मंजुर करण्याचे आदेश संबंधित विभागास द्यावा व मराठा विद्यार्थ्यांच्या बाबतीत सकारात्मक निर्णय घ्यावा या मागणीस तात्काळ मंजुर करण्याचे आदेश द्यावेत अशी मागणी केली होती. या मागणी बाबत ते सदरची यादी मंजुर झाल्या पासुन पाठपुरावा करीत असून सारथी चे व्यवस्थापकीय संचालक डॉ. अशोक काकडे ( भाप्रसे ) यांचे कडेही त्यांनी सातत्याने पाठपुरावा केला असता सारथी संस्थेच्या वतीने शिफारस असलेला संचालक मंडळाचा ठराव सुद्धा कार्यकारी संचालक डॉ. अशोक काकडे यांनी शासनाला पाठवलेला होता. आजच्या बैठकीत २०१९- २०२० च्या संशोधक विद्यार्थी वर्गाचा निर्णय सुध्दा प्रशासकीय मान्यता घेणे साठी पाठवण्यात आला आहे. खास बाब म्हणजे जेष्ठ अभ्यासक राजेंद्र दाते पाटील हे मुख्य हस्तक्षेप याचिका कर्ता म्हणून सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे मराठा समाजाचा आरक्षणाचा लढा देत आहेत.

# नागपुरात चक्क १ किलोचा एक आंबा

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** शहरातील कळमना येथील कृषी उत्पन्न बाजारात सध्या आंब्याची आवक वाढली असताना एका व्यापाराकडे चक्क एक किलो वजनाचा एक आंबा विक्रीला असून या आंब्याची सध्या बाजारात चांगलीच चर्चा असून या त्याची मागणी वाढली आहे. सध्या उन्हाळ्याचे दिवस असून या दिवसांत बाजारात आंब्याला चांगली मागणी असते. नागपूरच्या कळमना कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये मुकेश कुमार-रोशन कुमार अडतिया या आंबा विक्रेत्याकडे आंबा विक्रीला असून या एक किलो आंब्याची सर्वच बाजारपेठांमध्ये चर्चा आहे. आंबा व्यापारी मुकेश कुमार यांनी सांगितले, मांचियालमधील पिरकापल्ली या गावातून हा आंबा विक्रीला आला आहे. मलगोबा, बैगनफल्ली या प्रजातीचे हे आंबे आहेत. एक आंबा एक ते सव्वा किलो वजनाचा असून या आंब्याला चांगली मागणी असली तरी फारसा भाव मिळत नाही. १५ रुपये किलो प्रमाणे हा विकण्यात आला. हा आंबा आंबट असून भाजी किंवा लोणच्यासाठी या आंब्याचा वापर करतात. गेल्या दोन दिवसांपासून कळमना कृषी उत्पन्न बाजार समितीत या आंब्याची चर्चा आहे.

# १५० वर्षांनी साजरा झाला हळदी-कुंकू समारंभ

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** चैत्र वद्य त्रयोदशी म्हणजेच दिनांक २५ एप्रिल १८७३ रोजी सदाशिव पेठेतील नवा विष्णू मंदिरात झालेल्या पाच हजार महिलांच्या हळदी-कुंकू समारंभाच्या आठवणींना उजाळा देत तब्बल १५० वर्षांनी पुन्हा एकदा त्याच ठिकाणी त्या तिथीच्या दिवशी सार्वजनिक हळदी-कुंकू समारंभ पार पडला. पुणे सार्वजनिक सभेचे नेते गणेश वासुदेव जोशी उर्फ 'सार्वजनिक काका' यांनी 'स्त्री विचारवती सभा' यांच्या पुढाकाराने सार्वजनिक हळदीकुंकू कार्यक्रम आयोजित केला होता. त्या घटनेची पुनरावृत्ती करीत कार्यक्रमाचा शतकोत्तर सुवर्णमहोत्सव मोठया उत्साहात साजरा झाला.

इतिहास प्रेमी मंडळ व पुणे सार्वजनिक सभेच्या वतीने सदाशिव पेठेतील नवा विष्णू मंदिरात सार्वजनिक हळदी-कुंकू कार्यक्रम शतकोत्तर सुवर्णमहोत्सव या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सुप्रसिद्ध लेखिका व सामाजिक कार्यकर्त्या शेफाली वैद्य, पुणे सार्वजनिक सभेचे अध्यक्ष विद्याधर नारगोळकर, इतिहास प्रेमी मंडळाचे अध्यक्ष मोहन शेटे, शरद पंडित, सुप्रसाद पुराणिक आदी उपस्थित होते.



शेफाली वैद्य म्हणाल्या, हळदी-कुंकू सारख्या समारंभामध्ये महिलांमध्ये संवाद होतो. महिला एकत्र येणे हे महत्वाचे आहे. हळदी-कुंकू समारंभाची परंपरा केवळ महाराष्ट्रात नाही, तर भारतभर आहे. सामाजिक उद्देशाने एखादी परंपरा पुढे नेणे, हा आपला सांस्कृतिक वारसा आहे. तो पण जपायला हवा. विद्याधर नारगोळकर म्हणाले, सार्वजनिक काकांनी स्वदेशी शपथ, इंग्रजी भाषेतील मासिक, दुष्काळात गरजूंना आर्थिक मदत अशी वैविध्यपूर्ण सामाजिक कामे केली. त्यात १५० वर्षांपूर्वी आयोजित केलेले सार्वजनिक हळदी-कुंकू हा वेगळा कार्यक्रम होता. नवा विष्णू मंदिर त्या घटनेचे साक्षीदार आहे. मोहन शेटे म्हणाले, तब्बल १५० वर्षांपूर्वी झालेल्या या कार्यक्रमाची बातमी मुंबई च्या नेटिव्ह ओपिनियन मध्ये छापून आली होती. ही घटना त्या काळातील एक क्रांतिकारी व महाराष्ट्राला प्रागतिक घडवणारी घटना ठरली. त्यामुळे या ऐतिहासिक घटनेला उजाळा देण्यासाठी पुन्हा एकदा त्याच नवा विष्णू मंदिरात सार्वजनिक हळदीकुंकू समारंभ आयोजित करण्यात आला.

महाराष्ट्र Business Katta












# पुरस्कार समारंभाला आलेले भारतीय नागरिक की श्रीसदस्य ?



विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

आधुनिक केसरी

**महाराष्ट्र भूषण पुरस्काराला महाराष्ट्राची मान खाली जाईल या पद्धतीचे गालबोट सरकारच्या शून्य नियोजनामुळे व कार्यक्रमाचा पैसा जाहिरातीवर खर्च केल्याने लागले आहे. कार्यक्रमाला लाखोच्या संख्येत लोक उपस्थित राहणार यांचे पूर्व माहिती असून आणि उन्हाचे दिवस असून, कार्यक्रम दुपारी ठेवून सरकारने आपली विद्वत्ता व सर्वसामान्य लोकांप्रती असलेली आत्मीयता दाखवून दिली. याचाच परिणाम हजारो लोकांवर उष्माघाताचा परिणाम झाला अनेक लोकांना आपला जीव गमवावा लागला. अनेक लोकांवर उपचार सुरू आहेत. महाराष्ट्र भूषण पुरस्कारा दरम्यान महाराष्ट्र भीषण झाला.**

अनेक कुटुंबांचा आधार गेल्याने त्या कुटुंबाचे भविष्य झाले अंधकारमय झाले. सरकारसाठी मृत्तांचा हा फक्त आकडा असू शकतो. परंतु या कुटुंबातील लोक गेलेत ते कुटुंबाचा तो मुख्य आधार असतो. याची जाणीव महाराष्ट्र सरकारला असलेले दिसत नाही. मृतांना पाच लाख रुपयाची मदत करून सरकार मृतांच्या कुटुंबावर उपकार करणार आहे की भविष्यामध्ये अशा प्रकारचे घटना घडू नाही म्हणून काही नियोजन करणार आहे हे बघणे महत्त्वाचे आहे. सरकारने जाहिराती व इतर ठिकाणी केलेल्या निरर्थक खर्चामुळे लोकांना बसण्यासाठी सावली निर्माण करता आली नाही. आणि याच कारणाने अनेक कुटुंबाच्या डोक्यावरचे सरकारच्या घोडचुकीमुळे छत गेले आहे. ही पोकळी कधीही भरून न निघणारी आहे. अनेक प्रसार माध्यमे व इतर सोशल मीडियाच्या माध्यमातून एक गोष्ट वारंवार दाखवली जात आहे ती म्हणजे महाराष्ट्र भूषण पुरस्कार वितरण सोहळ्यामध्ये लाखोच्या संख्येने श्रीसदस्य आले होते. आता सर्वात मोठा प्रश्न उपस्थित राहतो की महाराष्ट्र भूषण पुरस्कार सरकारने अध्यात्म, धर्म आणि जात बघून दिला का ? जर त्या ठिकाणी लाखोच्या संख्येने आलेले श्रीसदस्य होते तर महाराष्ट्र भूषण पुरस्काराच्या नावाखाली महाराष्ट्र सरकारने श्रीसदस्यांवर खर्च केला का ? हा प्रश्न उपस्थित राहतो.

धर्माधिकारी यांच्या मागे लाखोच्या संख्येने श्रीसदस्य आहेत आणि म्हणून 2024 च्या निवडणुकीमध्ये धर्माधिकारी यांचा राजकीय वापर व्हावा म्हणून त्यांना पुरस्कार देण्यात आला का ? हा ही प्रश्न उपस्थित होतो. श्रीसदस्यांवर सरकारने खर्च करू नये असे मुळीच मत नाही. परंतु एकीकडे महाराष्ट्र भूषण अर्थात महाराष्ट्रातील सर्वोच्च नागरी पुरस्कार जिथे जात, धर्म, पंथ अध्यात्म या बाबी बाजूला सारून महाराष्ट्रातील जनतेसाठी काम करणाऱ्या व्यक्तीला तो मिळाला पाहिजेत. परंतु श्रीसदस्याचा मोठा समुदाय पाठीशी आहे म्हणून महाराष्ट्र भूषण पुरस्कार देणे चुकीचेच आहे. सरकारला श्री भक्तांवरती खर्च करायचा असता तर करोडो रुपयाचा निधी धर्माचे तीर्थस्थळ व इतर धार्मिक कार्यासाठी काढून ठेवलेला असतो. त्या निधीमधून सरकारने पाहिजे तिथे खर्च करून, पाहिजे त्यांना खुश करण्याचा प्रयत्न करायला पाहिजे होता. परंतु महाराष्ट्र भूषण च्या नावाखाली जातीचे किंवा धर्माचे भूषण करून अध्यात्माला प्राधान्य देऊन इतर धर्मांचा अवमान करू नये. आणि महाराष्ट्र भूषण पुरस्कारांमध्ये इतर धर्माचा सर्व अवमान होत किंवा दुय्यम समजले जात असेल तर, त्याला महाराष्ट्र भूषण पुरस्कार न दिलेलाच बरा. महाराष्ट्रामध्ये अनेक जाती धर्माचे लोक राहतात म्हणून शिक्षण, आरोग्य, अंधश्रद्धा निर्मूलन, पाखंड यावरती काम करून सुदृढ व सक्षम समाज बनवणाऱ्या लोकांना हा पुरस्कार दिला जायला पाहिजेत. धर्माचा प्रचार करून अंधश्रद्धा प्रस्थापित करणाऱ्यांना हा पुरस्कार देणे म्हणजे ते एका धर्माला विशेष प्राधान्य देण्यासारखे होय. धर्माधिकारी यांना पुरस्कार दिला त्यावरती प्रश्नचिन्ह उपस्थित होण्याचे अनेक कारणे असले तरी मूळ मुद्दा हा आहे लाखोच्या संख्येने जर श्रीसदस्य त्या ठिकाणी आले असतील, उष्माघाताचा फटका त्यांना बसून अनेक लोकांचा मृत्यू व शेकडोलोक हॉस्पिटलमध्ये भरती झाले असतील, तर याची नुकसान भरपाई धर्माधिकारी यांच्याकडून वसूल करण्यात यावी. कारण श्रीसदस्याचा आणि सरकारचा कोणताही संबंध नाही. आणि सरकार फक्त श्रीसदस्यांसाठी काम करत नाही कार्यक्रमांमध्ये ज्यांच्यासाठी श्री सदस्य आले होते, ते कार्यक्रम ठिकाणी होते, आणि त्यांच्यासाठी लोक आले होते म्हणून, त्यांची नैतिक जबाबदारी म्हणून व ते स्वतः मानव सेवा करणारे आहेत, शिवाय त्यांच्याकडे पैसा सुद्धा मोठ्या प्रमाणात आहेत. मानवसेवेची शिकवण देणारे धर्माधिकारी यांच्याकडून मृतांच्या कुटुंबाला व भरती असलेल्या श्री सदस्यांना नुकसानभरपाई देऊन त्या कुटुंबांना चिरकाल आधार मिळेल असे व्यवस्था करण्यात यावी. आणि जर ते लोक नागरिक म्हणून आलेले असतील तर त्याची जबाबदारी महाराष्ट्र सरकारने घेऊन सर्व तो खर्च महाराष्ट्र सरकारने



करावा. पाच लाख रुपये देऊन त्यांच्या कुटुंबांना फारसा आधार होणार नाही म्हणून चिरकाल कुटुंबाला आधार मिळेल अशी व्यवस्था महाराष्ट्र शासनाने करावी. व कार्यक्रमाला उपस्थित असलेले मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री देशाचे गृहमंत्री यांनी घटनेची नैतिक जबाबदारी घेऊन तात्काळ राजीनामा द्यावा. आणि सरकारने धर्माचे नाही तर धर्मनिरपेक्ष काम करून धर्मनिरपेक्ष माणसाला महाराष्ट्र भूषण पुरस्कार द्यायला पाहिजे. जर सरकारला हे जमत नसेल तर महाराष्ट्र भूषण पुरस्कार बंद करून जाती धर्माच्या नावाखाली त्यांनी दुसरा पुरस्कार द्यायला सुरुवात करावी. यामध्ये कोणाला काहीच वावगे वाटणार नाही. परंतु महाराष्ट्र भूषण च्या नावाखाली जर एकाच जातीच्या एकाच धर्माच्या आणि अध्यात्माच्या माध्यमातून अंधश्रद्धा पसरवणाऱ्या लोकांना पुरस्कार देत असाल तर महाराष्ट्रातील जनता प्रश्न विचारणारच आहे. महाराष्ट्र भूषण पुरस्काराला लागलेले गालबोट मिटवून टाकण्यासाठी योग्य तो निर्णय घेऊन, उष्माघाताने मृत्यू झालेल्या लोकांची जबाबदार असलेल्या लोकांवर कारवाई करून लोकांचा सरकार वरील विश्वास वाढवावा. आणि हे करताना अगोदर आपल्याला हे बघणे आवश्यक आहे कार्यक्रमाला आलेले श्रीसदस्य होते की भारतीय नागरिक. कारण भारतीय नागरिक असतील तर त्यांना तिथे बोलवण्याची आणि घरापर्यंत सुखरूप पोहोचवण्याची जबाबदारी हे सरकारने घ्यायलाच पाहिजेत. याच्यामध्ये कुठेही दुमत नाही. परंतु ते श्री सदस्य असतील असतील तर शासकीय कार्यक्रमांमध्ये त्यांना बोलवणाऱ्या धर्माधिकारी यांनी ती जबाबदारी घ्यावी. धर्माधिकारी यांचे नाव व कार्य महान आहे, म्हणून त्यांना महाराष्ट्र भूषण पुरस्कार देण्यात आला. धर्माधिकारी यांनी सुद्धा ते महाराष्ट्राचे भूषण आहे हे दाखवून द्यावे. दाखवून देताना कार्यक्रमाला आलेले श्रीसदस्य होते ते धर्माधिकारी यांच्यामुळे आले होते श्रीसदस्यांची येण्याची जाण्याची व त्यांच्या आरोग्याची सर्व सर्व ती जबाबदारी धर्माधिकारी यांची होती. झालेल्या प्रकाराची धर्माधिकारी यांनी जबाबदारी घेऊन श्री सदस्यांच्या कुटुंबाचे पालकत्व स्वीकारून पुन्हा एकदा मानव सेवा करून महाराष्ट्राचे भूषण वाढवावे. महाराष्ट्रभर मानव सेवा केल्यापेक्षा मृत झालेल्या कुटुंबाचे पालन पोषण व हॉस्पिटलमध्ये भरती असलेल्या लोकांचा खर्च एवढे जरी धर्माधिकारी यांनी केले तरी धर्माधिकारी हे खरे महाराष्ट्र भूषण असल्याचा सर्व महाराष्ट्रीयांना सार्थ अभिमान वाटेल. सरकारने शासकीय कार्यक्रमांमध्ये विशिष्ट धर्माच्या लोकांना बोलावून शासकीय कार्यक्रमाला धार्मिक कार्यक्रमाचे स्वरुप देऊन इतर धर्माचा अवमान करणे किंवा इतर धर्मांना दुय्यम समजणे बंद करावे. सरकार एका धर्माचे नसते तर ते माणसाचे असते. आणि सरकारने लोकांकडे धार्मिक म्हणून नाही तर माणूस म्हणून बघावे. आणि म्हणून उष्माघाताने मृत्य झालेले श्री सदस्य नाही तर भारतीय नागरिक होते याची जाणीव ही सरकारला असायला पाहिजेत. परंतु सरकारच श्री सदस्य श्री सदस्य बोलून त्यांना धार्मिक स्वरूप आणून देण्याचा प्रयत्न करत आहे. जर ते श्री सदस्य असतील तर श्री सदस्यांच्या जोरावर ज्यांनी करोडोची मालमत्ता कमावली अशा लोकांकडून शासनाने भरपाई करावी. तरच जनतेला न्याय मिळेल व सरकार निरपेक्ष काम करते याची प्रचिती येईल.

# क्रायोजेनिक इंजिन: भारतात निर्माण !




श्रीकृष्णदास
निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी

**दि.१९ एप्रिल १९७५ रोजी भारतीय शास्त्रज्ञांद्वारे जो पहिला उपग्रह अंतरिक्षात झेपावला तो आर्यभट्ट होय. त्याची संरचना विक्रम साराभाई यांनी अहमदाबाद रिसर्च सेंटरमध्येच केली होती. आर्यभट्टाने यशस्वीपणे उड्डान केल्यानंतर त्यावेळच्या पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांनी विक्रम साराभाईंचे अभिनंदन केले होते. आर्यभट्टाच्या यशस्वी प्रक्षेपणानंतर भारताने अनेक उपग्रह आकाशात झेपावले आणि ते यशस्वीपणे काम करत होते. या अंतरीक्ष संशोधनामध्ये साराभाई यांचे अथक परिश्रम, दूरदृष्टी कारणीभूत आहे. ही मोहीम यशस्वीपणे राबविण्यासाठी विक्रम साराभाईंसोबतच हजारो शास्त्रज्ञांनी अहोरात्र परिश्रम घेतले. नवनवीन तंत्रज्ञान विकसित केले. क्रायोजेनिक इंजिन मिळवण्यात येणाऱ्या अडचणी लक्षात घेता भारतातच हे इंजिन तयार केले. नवनवीन इंधनांचा प्रयोग केला आणि आपली ही मोहीम पुढेच नेली.**

त्यामुळेच आज या दिवशी या मोहिमेत आपले योगदान देणारे सर्व जण अभिनंदनास पात्र आहेत. दि.२७ नोव्हेंबर १९६३ रोजी थुंब्याहून नाईके ॲपची नावाचा अमेरिकन अग्निबाण सोडण्यात आला. ही इस्रोच्या आगमनाची नांदी होती. थुंबा हे केरळमधील सागरकिनारी वसलेले एक लहानसे खेडे आहे. तेव्हा थुंबा या गावाजवळ साधी सडकसुध्दा नव्हती. मात्र या संशोधन केंद्रात रशियामधून आलेले एक यंत्र घेऊन जाण्याची गरज होती. तेथे मोटार जात नव्हती, म्हणून हे रशियन यंत्र बैलगाडीतून तेथे नेण्यात आले होते. त्या बैलगाडीतून भारताचा अंतराळ संशोधन प्रवास सुरू झाला आणि आज भारत हा जगातला या क्षेत्रातला आघाडीचा देश ठरला आहे. अवकाश संशोधनावर गेल्या पन्नास वर्षात आपण केलेला खर्च केवळ बारा अब्ज डॉलर एवढा आहे. या उलट अमेरिकेचा या कार्यक्रमासाठीचा एका वर्षाचा अर्थसंकल्प सतरा अब्ज डॉलर एवढा आहे. याचा विचार केला तर या कार्यक्रमावर आपण केलेला खर्च किती कमी व तरीही किती उपयोगी आहे ? हे लक्षात येऊ शकेल. अमेरिका, रशिया आणि जपान या पाठोपाठ खगोलीय उपग्रह अवकाशात पाठवणारा आपला भारत हा जगातला चौथा देश ठरला आहे. इस्रोची स्थापना दि.१५ ऑगस्ट १९६९ रोजी झाली. प्रारंभीच्या काळात इस्रोची उद्दिष्टे मर्यादित होती. परंतु पुढे इंदिरा गांधी यांच्या काळात अन्नधान्याच्या उत्पादनापासून ते अंतराळ संशोधन क्षेत्रात स्वयंपूर्णतेचे उद्दिष्ट निश्चित केले गेले. त्यातून अंतराळ संशोधनासाठी इस्रोची स्थापना केली गेली. त्यानंतर अवघ्या सहाच वर्षांत आर्यभट्ट या उपग्रहाची जुळणी देशातील शास्त्रज्ञांनी यशस्वी करून दाखवली. इस्रोच्या वाटचालीचा हा पहिला टप्पा होता. इन्सॅट उपग्रहांची मालिका कार्यरत करणे हा दुसरा आणि सन १९९०पासून ध्रुवीय उपग्रह प्रक्षेपण यान- पीएसएलव्ही तसेच भूसंकलिक उपग्रह प्रक्षेपण यान- जीएसएलव्ही हे पूर्णतः भारतीय संशोधनातून बनले. यासाठी क्रायोजेनिक इंजिनही इस्रोने स्वतः बनवणे, हा तिसरा टप्पा होता. चांद्रयान ते मंगळयान या चौथ्या टप्प्यावर आता आपण आहोत. या सर्व टप्प्यांत कोणतीही वाच्यता न करता देशाच्या संरक्षणाची गरज भागेल, असे कामही इस्रो करीत आली आहे. मुख्य म्हणजे या सर्व वाटचालीत तिची स्वायत्तता कधीही धोक्यात आली नाही. भारतात माहिती-तंत्रज्ञान क्रांतीची मशाल या मोहिमेनेच



पेटविली. त्या काळात टीव्ही, इंटरनेट यांसारख्या सेवा नव्हत्या. त्यामुळे भारताला रेडिओवरच समाधान मानावे लागत होते. पण इस्रोने या सेवा भारताला प्रदान करण्यासाठी अंतराळात अनेक उपग्रह सोडले. त्यामुळेच आज संपूर्ण भारतीय या अत्याधुनिक माहिती तंत्रज्ञानाचा लाभ घेत आहेत. केवळ माहिती आणि तंत्रज्ञानच नव्हे, तर पर्यावरण, हवामान, कृषी, भूकंप, त्सुनामी यांसारख्या क्षेत्रांचीही माहिती क्षणात मिळवून देणारे स्वदेशी तंत्रज्ञान आमच्या बहाद्दर शास्त्रज्ञांनी विकसित केले आहे. त्यात त्यांनी भरघोस यश मिळविले. प्रामुख्याने अमेरिका, चीन आणि रशिया या देशांकडे असलेल्या संरक्षणविषयक आणि टेहळणी करणारे उपग्रह असल्यामुळे भारतालाही अशा टेहळणी उपग्रहांची गरज भासू लागली. इ.स.१९७१च्या भारत-पाक युद्धात भारताने हे युद्ध जिंकले. भारताच्या लष्कराला टेहळणी उपग्रहाची जोड देण्याचा विचार तेव्हाच सुरू झाला होता. परंतु ज्या वेळी हा विचार पुढे आला, भारताला सहकार्य न करण्याची भूमिका त्या वेळी हे तंत्रज्ञान जवळ असलेल्या देशांनी घेतली. परिणामी भारताला स्वदेशी तंत्रज्ञान विकसित करणे भाग पडले. याचाच परीणाम म्हणजे दि.१९ एप्रिल १९७५ रोजी सोडलेला पहिला कृत्रिम उपग्रह आर्यभट्ट होय. आर्यभट्ट हा भारताचा ३६० किग्रॅ वजनाचा पहिला उपग्रह कापुस्टीन यार या रशियन अंतराळ स्थानकावरुन प्रक्षेपित करण्यात आला. ही इस्रोची पहिली मोहीम होती. थोर भारतीय गणितज्ञ व खगोल शास्त्रज्ञ आर्यभट्टांचे नाव या उपग्रहाला देण्यात आले. तो फक्त पाच दिवसच कार्यरत होता; कारण त्याचे आयुष्यच मुळी काही दिवसांचे होते. सुमारे पाच दिवस पृथ्वीभोवती प्रदक्षिणा घातल्यानंतर उपग्रहाचा इस्रोशी संपर्क तुटला. स्वतःचा पहिला उपग्रह रशियाच्या मदतीने पाठवणाऱ्या आपल्या भारताने आतापर्यंत वीस देशांचे ५१ उपग्रह प्रक्षेपित करून ५०० कोटी रुपयांचे उत्पन्न मिळवले आहे. ॲस्ट्रोसेटच्या यशस्वी प्रक्षेपणाने जागतिक अवकाश संशोधनाच्या क्षेत्रातही नवा इतिहास रचला गेला आहे. पोलर सॅटेलाईट लाँच व्हेईकल- पीएसएलव्ही या प्रक्षेपकाद्वारे इ.स.२०१०मध्ये एकाच वेळी दहा उपग्रह अवकाशात यशस्वीपणे प्रक्षेपित करायचा नवा विक्रम तथा इतिहासही इस्रोनेच लिहिला. इंग्लंड, अमेरिका, रशिया, फ्रान्स या देशांची अवकाश संशोधनाच्या क्षेत्राची मक्तेदारी भारताने मोडून तर काढलीच, पण या क्षेत्रात दबदबाही निर्माण केला. ज्या अमेरिकेने हे तंत्रज्ञान आपल्याला देण्यास नकार दिला, त्याच अमेरिका व ब्रिटनसह काही देशांचे एकूण अकरा उपग्रह भारताने अवकाशात सोडले होते. यालाच म्हणतात काळाचा महिमा! अडचणीशिवाय सन्मानर्ग गवसत नाही, हेच शेवटी खरे ठरले.

# वाढते तापमान पाहता उष्माघातापासून स्वत:ला सांभाळा

आधुनिक केसरी

हवामानातील बदलामुळे उष्णतामानात मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे.यामुळे उन्हाचा फटका मानव व पशु-पक्षी यांना सहन करावा लागतो आहे. कारण एप्रिल-मे महीन्यात सुर्य आग ओकत असतो आणि ओकत आहे. यापासुन सर्वांनीच सावध रहाण्याची गरज आहे.कारण यामुळे त्वचा कोरडी होणे, डोळ्यांची अंगार होणे,ओठ सुकणे,घाम येणे बंद होणे, चक्कर येणे, मळमळ वाटणे, डोकेदुखी,पोटदुखी, अंगदुखी इत्यादी प्रकारांचा त्रास होतो.त्यामुळे सर्वांनीच उन्हापासून बचावात्मक पवित्रा स्वीकारला पाहिजे.अन्यथा थोडीशी चुक उष्माघाताचे कारण बनू शकते व यामुळे जीवीत हाणी सुध्दा होवू शकते याला नाकारता येत नाही. कारण राज्यात सध्याच्या परिस्थितीत बहुतांश ठिकाणी कमाल तापमान 40 अंशाहून अधिक आहे आणि ही सर्वांसाठी धोक्याची घंटा आहे. हवामान अंदाज सांगतो की पुढील काळात उष्णता आणखी वाढण्याची चिन्हे आहेत. म्हणजे उष्णतेचा धोका अजून पर्यंत टळलेला नसुन आणखी गडद होण्याची शक्यता दिसून येते.त्यामुळे सर्वांनीच सावधगिरी बाळगली पाहिजे. याकरिता भरउन्हात फिरणे टाळावे. बाहेर जायचेच असेल तर नाकातोंडाला दुपट्टा बांधून घराच्या बाहेर पडावे. अन्यथा शरिरावर विपरीत परिणाम होवून उष्माघात होऊ शकतो. दुपारी 12 ते 3 या कालावधीत घराच्या बाहेर पडणे टाळावे. त्याचप्रमाणे वाढते उष्णतामान पहाता पाणी भरपूर प्यायला हवे. सध्याच्या परिस्थितीत उष्णतेची लाट संपूर्ण भारतात सुरू आहे. पूर्व भागात पुढील चार दिवस वायव्य भागात आणखी दोन दिवस उष्णतेची लाट राहण्याची शक्यता आहे. बंगाल, बिहारचे गंगेचे खोरे तसेच सिक्कीम, ओडिशा आणि झारखंडमध्ये पुढील दोन ते तीन दिवस उष्णतेची लाट कायम राहु शकते असा हवामानाचा अंदाज आहे. म्हणजेच महाराष्ट्रासह संपूर्ण भारतात आपल्याला उष्णते लाट प्रखर दिसून येते. उष्माघातामुळे मृत्यू कसा ओढावतो हे आपल्याला मुंबईतील खारघर येथे दिसून आले. नवी मुंबईच्या खारघरमध्ये महाराष्ट्र भूषण पुरस्कार सोहळ्याच्या कार्यक्रमाच्या दरम्यान लाखोंच्या संख्येने श्री सेवक जमा झाले होते.या दरम्यान 13 जणांचा उष्माघाताने मृत्यू झाल्याचे सांगितले जाते. ही अत्यंत दुःखद घटना आहे. मृतपावलेल्यांच्या प्रती मी शोक व्यक्त करतो करून श्रद्धांजली अर्पण करतो.

**रमेश कृष्णराव लांजेवार**

# अक्षय तृतीया - अखाजी



पंकज वसंत पाटील
मो. 9850439579

आधुनिक केसरी

**वैशाख शुद्ध तृतीयेला अक्षय तृतीया म्हणतात.साडेतीन मुहूर्तातील हा एक शुभारंभाचा दिवस आहे. हा श्राद्ध दिवस म्हणजेच पितरांचा सण मानला जातो. अक्षय्य तृतीयेच्या दिवशी कोणतेही नवीन काम सुरू करण्यास मुहूर्त पाहण्याची गरज नाही. या दिवशी केलेले दान, हवन, तर्पण, पूजा, जप इत्यादी पूण्यकर्म अक्षय टिकते म्हणून अक्षय तृतीया ही पुण्यतिथी आहे. थोडक्यात पितरांचे ऋण फेडण्याचा हा दिवस. हा दिवस परशुराम जयंती म्हणूनही ओळखले जातो. कृतयुग, त्रेतायुग, द्वापारयुग आणि कलियुग यामधील प्रथम युग त्यात लोक फार सुखी होते. सर्वत्र शांतता व समाधान नांदत होते. अशा कृतयुगाचा आरंभ वैशाख शुद्ध तृतीयेला झाला. कोणत्याही युगाचा आरंभ शुभमंगल मानला जातो म्हणून हा दिवस महत्त्वाचा आहे.**

**अस्यां तिथौ क्षयमुपैति हुतं न दत्तं ।**
**तेनाक्षयेति कथिता मुनिभिस्तृतीया ।।**
**उद्दिश्य दैवतपितृन्क्रियते मनुष्यैः**
**तच्चाक्षयं भवति भारत सर्वमेव ।।**

भगवान श्रीकृष्ण म्हणतात हे युधिष्ठिरा या तिथीस केलेले दान व हवन क्षयाला जात नाही, म्हणून हिला मुनींनी अक्षय्य तृतीया म्हटले आहे. देव आणि पितर यांना उद्देशून या तिथीच जे कर्म केले जाते, ते सर्व अक्षय होते. या तिथीस महत्त्व येण्याचे कारण म्हणजे हा कृतयुगाचा प्रारंभदिन आहे. कालविभागाचा कोणताही प्रारंभ दिवस भारतीयांना नेहमीच पवित्र वाटतो. म्हणून अशा तिथीस स्नानदानादि धर्मकृत्ये सांगितली गेली आहेत.

भुकेले तहानलेल्यांना तृप्त करावे असा प्रघात आहे या दिवशी जलकुंभ दान करतात. पितरांना उदककुंभदान करतात. तसेच ग्रीष्म ऋतूमध्ये होणाऱ्या सर्व प्रकारच्या धान्याचे दान या दिवशी केल्या जाते. या दिवशी श्राद्ध करतात म्हणजेच परलोकात गेलेल्या वाडवडिलांना पाणी देतात त्यांची आठवण म्हणून दानधर्म करतात.

या दिवशीच भगवान परशुरामांचा जन्म झाला. संपूर्ण पृथ्वी जिंकली पण आपल्या ब्राह्मणपणाला विसरले नाही व जिंकलेली पृथ्वीदान करून अखेर स्वतःच तपश्चर्या करण्यासाठी निघून गेलेले भगवान परशुराम यांचा हा जन्मदिवस. अक्षय्य म्हणजे कधीही न संपणारे अखंड टिकणारे या दिवशी केलेले दान अक्षय राहते कधीही संपत नाही म्हणून या तिथीला जे जे शक्य असेल तेथे दान करावे. या दिवशी दान केलेले अक्षय तर राहतेच पण त्याबरोबर दान देणाऱ्यास यामुळे शांती, सुख, समृद्धी याचाही लाभ होतो म्हणून आपणास जे शक्य असेल असे पुण्यकृत्य या दिवशी करावे असे सांगितले जाते. या दिवशी केलेले सत्कृत्य अखंड टिकणारे असते असे मानले जाते. गोरगरीब, उपेक्षितांना मदत करण्याची प्रेरणा देणारा, त्यासाठी प्रवृत्त करणारा हा सण आहे त्यामुळे समता बंधुभाव ऐक्य टिकण्यास मदत होते. अनाथ विद्यार्थ्यांना मदत करावी, अन्नदान, वस्त्रदान करावे असे सांगितले जाते.

ऋषभदेव यांनी एक वर्ष आणि काही दिवस एवढ्या कालानंतर हस्तीनापुरचा राजा श्रेयांस याच्या घरी या तिथीस उसाच्या रसाचे प्राशन केले होते. त्यामुळे राजाची भोजनशाला अक्षय्य झाली. म्हणून या तिथेच अक्षय्य तृतीया असेही नाव पडले आहे. या दिवशी जलकुंभाची पूजा करून तो दान देतात. तसे पाहिले तर तहानलेल्यांना पाणी द्यावे हे त्याचे प्रतिक. वैशाखात उन्हाची तीव्रता वाढलेली असते. यासाठीच आपल्या संस्कृतीत जलदानाचे महत्त्व सांगितले आहे. मनुष्य, प्राणीमात्रांना, वृक्षवेलींना पाणी देऊन जीवनदान द्यावे. थोडक्यात अक्षय तृतीया या तिथीमुळे एक जीव दुसऱ्या जीवाचा मग तो प्राणी, मनुष्य, वन्य, वृक्ष कोणताही असो, त्याला जलदान करून तृप्त करावे असा संस्कृतीचा नियम आहे. हा



दिवस पितरांचा सण आहे म्हणून या दिवशी पितरांना नैवेद्य दाखवतात, पितृ स्तोत्र म्हणून पूजा करतात. या दिवशीच आपल्या शेतीची पूजा करून अन्नाच्या नैवेद्याचे ताट सीतामातेला नैवेद्य दाखवून प्रार्थना करून अर्पण करतात. या दिवसापासून शेतकरी आपल्या कामाला लागतात. विदर्भ आणि खान्देशात अक्षय तृतीयेला अखजी, अखोजी या नावाने ओळखतात, च्या दिवशी सासुरवाशीणी माहेराला जातात.

**सासुरवाशीणी हरखती, आला अखजीचा सण ।**
**लागते माहेराची ओढ, चैतन्याने फुलते तन-मन ।।मंगलदिनी याच जन्मले,महात्मा गुरू बसवेश्वर ।**
**भूमीतळावर अवतरले, परशुराम परमेश्वर ।।**
**शास्त्रात आहे विशेष मान,आखाजी मुहूर्त महत्वाचा ।**
**अक्षय होते केलेले दान, पुण्यसंचय जमविण्याचा ।।**
**करावे गंगास्नान पवित्र, तृषितांची भागवावी तहान ।**
**घ्यावा आशीर्वाद मोठ्यांचा, हेच असे पुण्यकर्म महान ।।**

चैत्र शुद्ध तृतीयेला झुल्यावर बसविण्यात आलेली गौरी या दिवशी माहेरून सासरी जात असते म्हणून या दिवशी गोड-धोडाचे जेवण करून सवाष्ण घालतात. बायका एकमेकींकडे हळदीकुंकवाला जातात-येतात. माहेरी आलेल्या गौरीला निरोप देण्याचा हा कुळाचार आहे.याच दिवशी परशुरामांचा जन्म झाला म्हणून या तिथीस प्रदोष काळी परशुरामांची पूजा करून त्यांना अर्ध देतात. चला तर मग अक्षय तृतीयेला शेतीमातीची, पितरांची पूजा करु या! या मंगल मुहूर्तावर चांगली कामे करून आपले पुण्य अक्षय करू या!

आपल्या आयुष्यात "अक्षय्य" सुख आणि धनसंपदा घेऊन येवो आपणा सर्वांना अक्षय तृतीयेच्या हार्दिक शुभेच्छा !

# अक्षय आनंदाचा ठेवा



दिलीप देशपांडे
मो.नं. ८९९९५६६९१७

आधुनिक केसरी

**वैशाख शु.तृतिया म्हणजेच "अक्षय तृतिया". जी साडेतीन शुभ मुहूर्त आपण मानतो,त्यातच अक्षय तृतिया हे एक पुर्ण मुहूर्त आहे. २२ एप्रिल शनिवार रोजी सकाळी ७-४७ वाजता अक्षय तृतीया तिथीला प्रारंभ होऊन २४ एप्रिल सकाळी ७-४७ वाजे पर्यंत ही तिथी आहे. अक्षय म्हणजेच क्षय न होणारे, नाश न पावणारे. या दिवशी अन्नपूर्णा देवी जयंती, बसवेश्वर जयंती, नरनारायण या देवतेची जयंती, परशुराम जयंती, असते. या दिवशी महर्षी व्यासांनी महाभारत ग्रंथाची रचना करायला प्रारंभ केला आणि त्यांचे लेखनिक म्हणून श्रीगणेशाने काम केले अशी आख्यायिका आहे. ह्या दिवशी दानाचेही अत्यंत महत्व आहे.अक्षय तृतियेच्या दिवशी केलेल्या दानाचेही अधिक पटीने पुण्य मिळत असते,ते चिरकाल टिकणारे असते म्हणून अनेक जण अक्षय तृतीयेस छत्री,पायातल्या वहाणा,पाण्यासाठी माठ,रांजण,रूमाल, पंचे,कापड,वस्त्र,आदींचे गरजू व्यक्तींना, वृध्दाश्रमात, गोरगरिबांचे वस्त्यात जाऊन दान करत असतात.**

जवस, गहू, हरभरा, दुग्धजन्य पदार्थ, जलकुंभ, सर्व प्रकारचे रस, आणि उन्हाळ्यात उपयुक्त अशा वस्तूचे दान करत असतात. अनंत फलप्राप्ती होत असते. या तिथीला केलेले दान हवन आणि पितरांना उद्देशून जे कर्म केले जाते ते सर्व अक्षय म्हणजे अविनाशी आहे. ज्याला ज्या प्रमाणात शक्य असेल तेवढे त्यांनी जरूर करावे. सतपात्री दान करावे अशी भावना आहे. या दिवशी भगवान विष्णू आणि लक्ष्मीची पूजा करतात.विधिवत पूजा केल्यास आपले मनोरथ पूर्ण होतात. ह्या सुमारास उन्हाच प्रमाण वाढले असते, तापमान खूप असते.म्हणून अनेक व्यापारी मंडळी, रस्तारस्यावर पाणपोई सुरु करतात.जनावरांच्या पाण्यासाठी हौद,हाळ,बांधतात. ज्या ज्या पासून पुण्यप्राप्ती होईल ते.ते करतात.कारण ते अक्षय आहे. अक्षय तृतियेला पितरांचे स्मरण करुन श्राध्द घालण्याचीही प्रथा आहे.या सणाचे निमित्ताने मनात पितरांची स्मृती जागृत होते.त्यांचे आशिर्वाद घराला मिळतात. या दिवशी पवित्र नद्यांच्या संगमावर किंवा गंगा स्नानाचे महत्त्व आहे गंगास्नानने ती व्यक्ती पवित्र होते पापमुक्त होते असा समज आहे. अक्षय तृतिया हे नाव पडण्यामागचे कारण"मदनरत्न" ह्या ग्रंथात सांगितले आहे.

श्रीकृष्णाने युधिष्ठिराला
असे सांगितले होते की...

**अस्यां तिथौ क्षयमुपैति ह्रतं न दत्तं ।**
**तेनाक्षयेति कथिता मुनिभिस्तृतीया.।।**

श्रीकृष्ण म्हणतात, "**हे युधिष्ठिरा,या तिथीला केलेले दान,हवन,क्षयाला जात नाही.** याविषयी एक कथा प्रचलित आहे. शाकल नगरीत धर्म नावाचा वाणी राहत होता. तो सर्वसामान्य लोकांसारखा नव्हता. तो सत्य वचनी होता. देवाची ब्राह्मणाची पूजा करीत होता. एकदा एका ब्राह्मणाने त्याला अक्षय तृतीयेचे महत्त्व सांगितले. त्याला ते पटले. ब्राह्मणाने सांगितल्याप्रमाणे त्याने नदीवर जाऊन स्नान करून पितरांना तर्पण करून ब्राह्मणांना दक्षिणा दिली. अशाप्रकारे प्रतिवर्षी हा उपक्रम त्याने नित्यनेमाने सुरू ठेवला होता. कोणत्याही विघ्नाची त्यांनी पर्वा केली नाही.धर्म नावाप्रमाणे धर्मा सारखा जगाला.वागला. त्याचे भाग्य म्हणून परमेश्वराचे स्मरण करत असताना त्याला मृत्यू आला. गत जन्माची पुण्याई नंतर पुढील जन्मी त्याला कामाला आली आणि त्याला राज्य पद मिळाले. राज्यपद मिळाल्यावरही तो गर्विष्ठ बनला नाही आणि पूर्वीप्रमाणेच आपले दानधर्माचे व्रत सुरू ठेवले. परंतु त्याचा खजिना कधीच रिकामा झाला नाही आणि याचे कारण म्हणजे त्याने अक्षयतृतीयेला भरपूर दानधर्म केला होता. हा मुहूर्ताचाच दिवस असल्याने, सोने,चांदी,दागिने. मौल्यवान वस्तुंची खरेदी.अनेक शुभ कामांना प्रारंभ, केला जातो. नवीन जागा व्यवसाय चे उद्घाटन नवीन वाहन खरेदी नवीन संकल्प या दिवशी सुरू केल्या जातात कोणतेही शुभ कार्य या दिवशी सुरू केल्यास ते कायमस्वरूपी टिकून राहते.

या दिवशी कृषिसंस्कृतीचा पालक म्हणून बलरामाची ही पूजा होते. शेतकरी शेतीच्या कामाला सुरूवात करतात.शेतकरी शेती कामासाठी नविन सालदाराची नेमणूक करत असत.आज ही प्रथा काहीच ग्रामीण भागात आढलून येते.काळा नुसार प्रथा बदलतात.

सध्या सर्वत्र पाण्याचे दुर्भिक्ष असल्याने अशा परिस्थितीत ज्यांना ज्यांना शक्य आहे त्यांनी पाणपोई काढून पुण्य पदरी पाडावे,अशी स्थिती आहे. ह्या काळात नामस्मरणालाही तेवढेच महत्व आहे. आपल्याला प्रिय असलेल्या देवतेचे होईल तेवढे नामस्मरण करावे.




विष्णुसहस्त्रनाम,लक्ष्मीची उपासना,करावी..ह्या दिवशी केलेल्या नामस्मरणाने घरातील दोष नाहीसे होतात.

आपल्याला आवडत्या देवतेचे नमस्मारण किंवा मंत्र पठाण याने पुण्य अखंड टिकून राहते .

**|| ओम नमो भगवते वासुदेवाय ||**
किंवा
**|| सर्व मंगल मांगल्ये शिवे सर्वार्थ साधिके**
**शरण्ये त्रंबके गौरी नारायणी नमोस्तुते ||**

हा जप आपण करू शकतो. स्त्रियांनी घरात चैत्र गौरीची स्थापना केली असते.ह्या शेवटच्या दिवशी स्त्रिया हळदीकुंकवाचा कार्यक्रम करतात. गौरीला सांजोरी, करंजी, शेवेचा,नैवेद्यही दाखवतात. त्या निमित्ताने महिला एकत्र येतात. आंब्याची डाळ, कैरीचे पन्हे, देतात. मोगऱ्याच्या फुलांचे गजरे देतात. खान्देशात अक्षय तृतीया सण फार उतत्साहात साजरा होतो.खान्देश भागात "आखाजी" म्हणून हा सण ओळखला जातो. ग्रामीण भागात पत्याचे डाव रंगतात. जुगार खेळायला परवानगी असते. तरुण,वयस्कर,सर्वच ह्यात सहभागी होतात.गल्लीत, देवळाच्या ओट्यावर, गोठयात, पारावर, जागोजागी डाव रंगलले दिसतात.

मुली माहेरवाशीण म्हणून आलेल्या असतात.त्यांच्या साठी पुरणपोळी,आंब्याचा रस, कटाची आमटी,काही ठिकाणी मांडे( म्हणजे खापरावर केलेल्या मोठ्या पुरण पोळ्या )हा बेत हमखास असतो. अक्षय तृतीया दिवशी मुली माहेरी असतात. खानदेशात अनेक खेड्यामध्ये झाडाला झोके बांधलेले असतात आणि महिला एकत्र जमवून आखाजीची गाणी म्हणत असतात.बालपणीच्या मैत्रीणींना भेटून आनंदाची उधळण करत असतात. तिथे वयाचा विचार नसतो. अक्षय तृतियेला भगवान परशुरामची जयंती असते. भगवान विष्णूचा हा सहावा अवतार, ,आणि अष्टचिरंजीवा पैकी एक चिरंजीव अशी त्यांची महती आहे.त्यांचे पूजन केले जाते.अनेक ठिकाणी परशुरामाची मिरवणूक काढण्यात येते.आपल्या महाराष्ट्रात चिपळूण जवळ भगवान परशुरामाचे मंदिर आहे.

एके वर्षी आम्ही आमच्या सद्गुरु माऊली समवेत सात- आठ दिवस ऋषिकेशला होतो त्यावेळी अक्षयतृतीयेला गंगा स्नान आणि स्वामी शिवानंद स्वामींचे आश्रमात महाप्रसाद घेतला होता. त्या अक्षय तृतीयेचा आनंद अवर्णनीय आहे...

या दिवशी- अक्षय तृतीया दिवशी पवित्र नदीमध्ये तसेच गंगा स्नानाचे महत्त्व आहे. ब्राह्मणाला भोजन देऊन वस्त्रदान तांदूळ, मीठ, फळे,छत्री, वाहाणा, दान करण्याचे महत्त्व आहे. साडेतीन मुहूर्ता पैकी एक असल्याने या दिवशी सोने चांदी खरेदी नवे वस्त्र खरेदीचे महत्व आहे. वाहन खरेदी करतात. पाण्याने भरलेली घागर वाळा टाकून ब्राह्मणास दान देतात तसेच या दिवसापासून अनेक लोक पानपोळी सुरू करतात. शुभकार्य, संकल्पांची सुरुवात करतात. भगवान परशुराम हे सप्तर्षीपैकी एक, तसेच जमदग्नीऋषी आणि रेणुका मातेची पुत्र. अक्षय तृतीयेच्या दिवशी भगवान परशुराम यांची जयंती हिंदू मोठ्या थाटामाटा सादर करतात. या दिवशी पवित्र गंगा नदी स्नान केल्याने पापे नष्ट होतात अशी धरण आहे. अक्षय तृतीयेच्या दिवशी अन्नपूर्णा माता यांचा जयंती दिवस देखील मानला जातो. अन्नपूर्णा मातेची पूजा केली जाते. अन्नपूर्णा मातेचे पूजनाने स्वयंपाक घरात जेवणाची चव वाढते आणि घरात अन्नाची बरकत असते.कधीही कमी पडत नाही.

अनेक दृष्टीने अक्षय तृतियेचे महत्त्व आहे.सुख.समृद्धी. आनंद. देणारा सण आहे. काळाच्या ओघात अनेक प्रथा परंपरा कमी होत असल्याचे जाणवते. असे सणवार आपल्या संस्कृतीचा ठेवा आहे. त्याची जपणूक करणे आपले काम आहे. महाराष्ट्र सह दक्षिण भारत, पश्चिम बंगाल, राजस्थान, या ठिकाणी अक्षय तृतीया सण साजरा केला जातो.


ह्या अक्षय तृतीयेच्या दिवशी आपण सर्व जण एक संकल्प करु . देवासमोर एक धान्याचा आणि दुसरा पाण्याने भरलेला असे कलश ठेउन सुख,समृद्धी साठी अक्षय वरदान मागू या.


ह्या वर्षी अक्षय तृतिया २२ एप्रिल शनिवार रोजी आहे.

आपण सगळे सुख,समृध्दि, आरोग्य,या साठी, भगवान विष्णू आणी लक्ष्मीदेवी कडे प्रार्थना करु या.

**।।सर्व मंगल मांगल्ये शिवे सर्वार्थ साधिके**
**शरण्ये त्रंबके गौरी नारायणी नमोस्तुते ।।**
**अन्नपूर्णे सदा पूर्णे शंङ्कर प्राणवल्लभे**
**ज्ञानवैराग्य सिध्यर्थं भिक्षां देही च पार्वती ।।**

## || मंथनाचे पैलू ||





डॉ. धोंडोपंत मानवतकर
संपर्क क्र. 9890827414

लेखांक : १३

# डी.बी.जगतपुरिया यांचा वाङ्मयीन परिप्रेक्ष्यातील साक्षेपी सृजनाविष्कार !

साहित्यक्षेत्राला सुपरिचित असलेले आमचे ज्येष्ठस्नेही डी.बी. जगतपुरिया हे एक सर्वस्पर्शी व्यक्तिमत्व. कवी, लेखक, नाटककार, समीक्षक ही त्यांची साहित्यक्षेत्रातील ओळख असून ते सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीतील एक सक्रीय कार्यकर्ता, निर्भिड पत्रकार आणि परखड वक्ता म्हणूनही परिचित आहेत. एखाद्या कवी किंवा कलावंतामध्ये सात्विक आणि तात्विक माणूस दडलेला असतोच. त्या माणसाशी जवळीक साधण्यासाठी किंवा निखळ मैत्रीसाठी जो पारदर्शी स्वभाव हवा असतो, तो डी.बी.जगतपुरिया यांच्या ठायी आहे. स्वभावात कुठलेही आढेवेढे नाहीत, कुठलाही बडेजाव नाही, कुठलाही अभिनिवेश नाही. राहणीमानात आणि बोलण्यात साधेपणा.. आणि सच्चेपपणा. त्यांचा स्वभाव अत्यंत परखड, निर्भिड, सत्यवादी, स्वाभिमानी, व्यवहारदक्ष, कर्तव्यदक्ष, निराभिमानी, सत्याची चाड आणि खोट्याची चीड असणारा तत्ववादी माणूस. गेल्या तीस वर्षापासून डी.बी.जगतपुरिया यांचा सहवास असल्याने त्यांचा एकूणच स्वभावधर्म मला परिचित आहे. साहित्यक्षेत्रात अनेक नवोदितांना उभे करण्यात त्यांचा महत्वाचा वाटा आहे. गेल्या पाच दशकापासून सामाजिक, सांस्कृतिक आणि साहित्यिक चळवळीशी ते निगडित आहेत. केवळ निगडितच नाहीत तर अनेक साहित्यिक, सामाजिक कार्यक्रमात त्यांचा सक्रीय सहभाग राहिलेला आहे, तो आजही आहे. त्यांचे साहित्यलेखनाचे कार्य आजही अखंड सुरू आहे. त्यांच्या सामाजिक आणि वाङ्मयीन परिप्रेक्ष्यातील सृजनाविष्काराचे यथार्थ अवलोकन करताना त्यांचे व्यक्तिमत्व आणि साहित्य ह्या एकाच नाण्याच्या दोन बाजू असल्याचे दिसून आले आहे. अनेक साहित्यिक केवळ प्रसिद्धीसाठी लेखन करतात किंवा विरंगुळा म्हणून काहीतरी लिहित राहतात. डी.बी. जगतपुरिया यांच्या बाबतीत मात्र तसे नाही. ते विरंगुळा किंवा केवळ प्रसिद्धीसाठी लेखन करणारे साहित्यिक नाहीत. स्वतःच्या जीवनप्रवासात अन्याय, अत्याचार आणि विषमतावादाचे अनेक भोगवटे पचवत त्यांनी संघर्ष केलेला आहे, त्यांचे जीवन आणि त्यांचे साहित्य हे एकमेकांपासून वेगळे करता येत नाही, असे बहुआयामी साहित्यिक डी.बी.जगतपुरिया हे याच महिन्यात वयाची पंचाहत्तरी पूर्ण करीत आहेत. त्यानिमित्ताने त्यांच्या व्यक्तिमत्वाच्या अनेक पैलूंविषयी व वाङ्मयीन कार्याविषयी केलेले हे साक्षेपी अवलोकन..! डी.बी. जगतपुरिया यांचा जन्म २६ एप्रिल १९४८ रोजी एका गरीब श्रमजीवी शेतकरी कुटुंबात झालेला आहे. मोलमजुरी करून गरिबीतून बी.एस्सी, बी.एड्. व साहित्यालंकार असलेले डी.बी. जगतपुरिया यांनी आपल्या साहित्यिक प्रवासात अनेकविध साहित्यकृती जन्मास घातल्या. त्यांना अनेक पुरस्कार मिळाले आहेत. अनेक कवी संमेलनाची, साहित्य संमेलनाची पदेही त्यांनी भूषविली आहेत. त्यांच्या प्रकाशित साहित्यसंपदेचा आढावा घेऊया.!

मराठी कविता संग्रह- ठिणगी, वज्रमूठ, सूर्यकुल, दरबार, रणांगण हे मराठी कवितासंग्रह प्रकाशित आहेत. प्रचंड गाजलेल्या पहिल्याच 'ठिणगी' काव्यसंग्रहाला कविश्रेष्ठ कुसुमाग्रज यांची पाठराखण व डॉ.गंगाधर पानतावणे यांची दीर्घ प्रस्तावना आहे. रणांगण' या कवितासंग्रहावर डॉ.जर्नादन वाघमारे, डॉ.श्रीपाल सबनीस, प्रा.दामोदर मोरे यांच्यासह १२ दिग्गजांनी परीक्षणे लिहून काव्यलेखनाची प्रशंसा केली आहे. डॉ.जनार्दन वाघमारे, प्रा. केशव मेश्राम, डॉ.सदा कऱ्हाडे यांच्या

ग्रंथांमध्ये संदर्भ म्हणून डी.बी.जगतपुरिया यांच्या कवितांचा समावेश केलेला असल्याने जगतपुरिया यांची कविता ताकदीची असल्याचे सिद्ध होते. पुढे त्यांच्या काही कवितांचा परामर्श आपण घेणारच आहोत. "उजेडाचे वारसदार" व "उजेडाचे वाटसरू" ही दोन व्यक्तिचित्रणे, त्याच बरोबर 'झुंबर' व 'डंका' ही सामाजिक चिंतनपर दोन पुस्तके प्रकाशित आहेत...समीक्षक म्हणूनही त्यांची साहित्यक्षेत्राला ओळख आहे. त्यांची "मूल्याक्षः कवितेची सम्यक समीक्षा", "माझ्या कवितेची समीक्षा", "सत्त्वसार", "दस्तऐवज", "सृजन पर्व ही समीक्षेची पुस्तके प्रकाशित आहेत. योद्धा' ह्या संग्रहात दलित कवितांचे संपादन व अनुवाद. त्यांच्या नावावर 'उमंग, चिनगारी, ऐलान' हे तीन हिंदी कवितासंग्रह आहेत. डी.बी.जगतपुरिया यांनी एकांकिका व नाटक हे प्रकारही सुंदररित्या हाताळलेले आहेत. त्यांच्या "कळली किमया त्रिकोणाची", "बलिदान", "हे खेळ भावनांचे", व "प्रेमज्वर (हिन्दी) ह्या एकांकिका आणि "चुडेदान" हे तीन अंकी नाटक प्रसिद्ध आहे.

अनेक साहित्यिकांच्या पुस्तकांवर परीक्षणे. तसेच ६० लेखक-कवींच्या पुस्तकांना त्यांनी प्रस्तावना लिहिल्या आहेत. बाशिंग, मतदार, श्रमराज्य या शीर्षकाच्या दिवाळी अंकाचे संपादन व जनशक्ती, आपला महाराष्ट्र, गावकरी, मतदार, देशदूत, श्रमराज्य या वृत्तपत्रासाठी स्तंभलेखनही त्यांनी केलेले आहे. प्रकाश बच्छाव संपादित 'दहकते अंगारे' या गाजलेल्या प्रातिनिधिक हिन्दी कवितासंग्रहात नामदेव ढसाळ, नारायण सुर्वे, प्रा.दामोदर मोरे या दिग्गज कवींसह डी.बी.जगतपुरिया यांच्या कवितेचा समावेश आहे. डी.बी.जगतपुरिया यांच्या साहित्याचा केंद्रबिंदू माणूस व समाज आहे. त्यांच्या एकूणच साहित्यातून अन्याय, अत्याचार, विषमता, सामाजिक, आणि राजकीय विकृतीवर भाष्य केलेले आहे. साहित्याच्या चौफेर लिखाणासाठी त्यांना अनेक पुरस्कारही मिळालेले आहेत...त्यांना मिळालेल्या अनेक राज्यस्तरीय व राष्ट्रीय पुरस्कारांवरही एक दृष्टिक्षेप टाकता येईल..

*राज्यस्तरीय पुरस्कार* अस्मितादर्श वाङ्मय पुरस्कार, अंकुर वाङ्मय पुरस्कार, तुका म्हणे वाङ्मय पुरस्कार, छत्रपती शाहू वाङ्मय पुरस्कार, शब्दरंजन वाङ्मय पुरस्कार, शब्दशक्ती वाङ्मय पुरस्कार, स्मिता पाटील वाङ्मय पुरस्कार, कविश्रेष्ठ कुसुमाग्रज वाङ्मय पुरस्कार नाशिक, अकोला, शिवांजली साहित्य सन्मान, शाहीर अनंत फंदी विशेष सन्मान, आशीर्वाद साहित्य सन्मान, मुंबई.

*राष्ट्रीय पुरस्कार* राष्ट्रसंत तुकडोजी विशेष राष्ट्रीय पुरस्कार, दर्यासागर राष्ट्रीय पुरस्कार, डॉ.बाबासाहेब आंबेडकर सन्मान दिल्ली, अंकुर काव्यप्रज्ञा राष्ट्रीय पुरस्कार, अस्मितादर्श जीवनगौरव पुरस्कार, तापी पूर्णा जीवनगौरव पुरस्कार २०२३, समीक्षाग्रंथ 'सृजनपर्व' ला अत्यंत प्रतिष्ठेचा श्री चक्रधरस्वामी वाङ्मय पुरस्कार २०१९...अशा अनेक पुरस्काराचे मानकरी ठरलेले डी.बी.जगतपुरिया हे नागपूर येथील पाचव्या शिक्षक साहित्य समेलनाचे विशेष अतिथी म्हणून तर यवतमाळ येथे भरलेल्या ४४ व्या अंकुर साहित्य समेलनाचे ते समेलनाध्यक्ष होते. बार्शी येथील ४५ व्या अंकुर साहित्य समेलनाचे ते उद्घाटक होते. नांदेड येथे भरलेल्या ११ व्या अ.भा. दलित साहित्य समेलनाचेही ते उद्घाटक होते. सोयगाव येथे भरलेल्या मराठवाडा साहित्य संमेलनात कविसंमेलनाध्यक्ष. २०१८ ला जालना येथे भरलेल्या ३५ व्या अस्मितादर्श साहित्य संमेलनाचे संमेलनाध्यक्ष. २०१८ ला कल्याण येथे भरलेल्या अ.भा.आंबेडकरवादी साहित्य संमेलनात प्रमुख अतिथी. २०१९ ला धुळे येथील अ.भा.विश्वकर्मा साहित्य संमेलनाचे प्रमुख अतिथी व समारोप समारंभाचे अध्यक्ष. २०१९ ला कल्याण येथील भारतीय संविधान संमेलनाच्या परिसंवादात सहभाग. अखिल भारतीय दलित साहित्य संमेलन, नाशिक येथे सहभाग. जळगाव येथील कविवर्य नारायण शिरसाळे प्रथम प्रेरणा साहित्य संमेलनाचे संमेलनाध्यक्ष. यवतमाळ येथील अण्णाभाऊ साठे साहित्य संमेलनात परिसंवादाध्यक्ष. २०१६ ला धुळे येथे भरलेल्या कलावंत संमेलनात कवी संमेलनाचे अध्यक्ष. खान्देश साहित्य संमेलनात सक्रिय सहभाग. असा अनेक साहित्य संमेलनात सक्रिय सहभाग घेऊन साहित्याची आवड जपली नि जोपासली. डी.बी.जगतपुरिया यांनी अनेक वर्ष मुक्त पत्रकारिता केली. धुळे येथे असतांना जि.प.भ्रष्टाचार भास्कर वाघ प्रकरणात लाखों रुपयांची लाच ठोकरली व जीवावर उदार होऊन सत्याच्या बाजूने निर्भिडपणे लेखन केल्यामुळे भास्कर वाघांना जन्मठेप झाली. ही त्यांच्या पत्रकारितेची पावती होती. लामकानी व धुळे तालुक्यात सेवाभावी डॉक्टरांच्या मदतीने गरिबांसाठी मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन केले. १५ गरीब दलित विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी भरीव मदत केली. भ्रष्ट शिक्षण संस्थेविरूद्ध आंदोलनाचे मुख्य कार्यवाह व प्रवक्ता म्हणून सहभाग घेतला. नामांतर चळवळ, नर्मदा बचाव चळवळ, विद्यार्थी शेतकरी आंदोलन इ. आंदोलनात सक्रिय सहभाग घेतला. अनेक दुर्लक्षित बहुजन लेखकांना न्याय देण्याचा प्रयत्न केला. डी.बी.जगतपुरिया यांनी केलेल्या सत्कार्याची लेखक, कवी, समीक्षकांनीच नव्हे तर कामगार, मजूर श्रमजीवी लोकांनी सुदधा दखल घेतली. २००६ ला डी.बी जगतपुरिया यांच्या सेवानिवृत्तीच्यावेळी धुळे येथे भव्य नागरी सत्कार करण्यात आला. सेवानिवृतीचे औचित्य साधून डॉ.गंगाधर पानतावणे यांच्या अध्यक्षतेखाली २६ मार्च २००६ ला एक साहित्य संमेलनही झाले. या संमेलनात डी.बी.जगतपुरिया यांनी लिहिलेल्या साहित्यावरच एक परिसंवाद ठेवला होता, या परिसंवादाचे डॉ.श्रीपाल सबनीस अध्यक्ष होते. नाशिकच्या अखिल भारतीय संमेलनाचे माजीअध्यक्ष केशव मेश्राम हे या कविसंमेलनाचे अध्यक्ष होते. या निमित्ताने अनेक दिग्गज लेखकांचा सहभाग असलेला 'मानदंड' या शीर्षकाचा गौरव अंकही काढण्यात आला होता. समाजसेवा करण्याची आंतरिक ऊर्जा असलेल्या साहित्यिकात कार्यकर्ता दडलेला असला तरच त्याची समाजाप्रती सहानुभूती असते.. त्यातूनच साहित्यनिर्मितीचे प्रयोजन ठरले जाते.



कुठल्याही वाङ्मयनिर्मितीच्या गर्भात मानसशास्त्रीय, समाजशास्त्रीय व साहित्यशास्त्रीय दृष्टीकोन असतो. तद्नंतर वाङ्मयप्रकार व शैलीविचार याचेही प्रयोजन लेखक करत असतो..डी.बी.जगतपुरिया यांच्यातील प्रतिभेने कवी, लेखक, नाटककार, समीक्षक, वक्ता, पत्रकार, कार्यकर्ता वेळोवेळी जागा केला. जाणिवा प्रगल्भ होत गेल्या... त्यांच्यात असणारा बहुगुणी, बहुआयामी झुंजार साहित्यिक साहित्य क्षेत्राला मिळाला...त्यांच्या कवितेतून त्यांची झुंजारवृत्ती दिसून येईल, त्यांच्या एका ग़ज़ल रचनेचा मतला बघुया....! ***झुंजार लेखनीला हरणे कबुल नाही***

***झुंजार लेखनीला झुरणे कबुल नाही***

हा ग़ज़लेचा बांधीव मतला आहे. या मतल्यातील 'हरणे' आणि 'झुरणे' ह्या काफियातून आलेला विचारच कवीचा स्वभावधर्म उजागर करणारा आहे... कवी आपल्या लेखनीचा वापर तलवारी सारखा व्हावा असे सांगताना म्हणतात आपली लेखनी झुंजत रहावी, तिला झुरणे किंवा हरणे मान्य नाही.

***सूर्याचे लावून डोळे, अंधार मिटवुया सारा***
***पोळले जयांचे जगणे, देऊया तयांना वारा***

सहज आलेल्या काव्यपंक्तीत व्यापक विचार आहे, कवी इथल्या सर्व झुंजार माणसांना सूचवतात की, विषमतेचा अंधार दूर करण्यासाठी तप्त सूर्याचे डोळे लावू आणि ज्या दुर्लक्षित दुर्बलाचं जीवन पोळलेलं आहे त्यावर करुणेचा शीतल वारा होऊन फुंकर घालू. असा कवीचा विद्रोही तितकाच कारूण्यदर्शी विचार आहे..कारण इथे विषमतेचा अंधार पेरणाऱ्यांची संख्या खूप आहे, कारुणिक कुणीच नाही. माणसातल्या नीतीचा दीपच विझवलेला आहे... "**दीप नीतीचा विझला, माजला अंधार**

**सत्तेवरच्या भूतांचा, फार झाला भूईभार**"

कवी डी.बी.जगतपुरिया हे प्रज्ञासूर्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या विचारांवर जीवनप्रवास करणारे कवी आहेत म्हणजे ते सूर्यकुळातील विद्रोही कवी आहेत. त्यांची कविता इथल्या राजकीय विकृतीवरही परखड भाष्य करते... **राजकारण - राजकारण खुर्चीसाठी- अब्रु तारण**

**राजकारण- गटारगंगा हाही नंगा - तोही नंगा**

त्यांची एकूणच कविता विषमतावादी विकृतीवर अत्यंत परखडपणे भाष्य करते; कारण कवीच्या काळजात इथल्या विषमतावादी व्यवस्थेबद्दल दाह आहे..मनात राग आहे म्हणून ते म्हणतात, या व्यवस्थेवर हल्ला करण्यासाठी माझ्या लेखनीत रग निर्माण व्हावी आणि दुखी पीडितांच्या जीवनातला अंधकार घालवण्यासाठी माझं प्रत्येक अक्षर गाणं व्हावं..असा निर्वाळा कवी आपल्या कवितेतून देतात. ज्येष्ठस्नेही डी.बी.जगतपुरिया हे वयाची पंचाहत्तरी पूर्ण करत आहेत तरीही त्यांच्यामध्ये सामाजिक आणि साहित्यिक कार्याविषयीची जी ऊर्जा आहे ती नवोदितांसाठी अत्यंत प्रेरक आहे. या वयातही अंगभूत असणारी सुहृदयता, संवेदनशीलता आणि सृजनशीलता टिकून आहे. साहित्यलेखन हा त्यांचा पिंडच आहे, त्यांच्या व्यक्तिमत्वाचे अनेक पैलू आहेत, त्या पैलूंच्या अनेक कंगोऱ्यांचा शोध त्यांचे समग्र साहित्य वाचल्यावरच घेता येईल. त्यांची साहित्याविषयीची अस्मिता आणि समाजाप्रती असलेली श्रद्धा, कैवार, सहवेदनेसह कृतज्ञता त्यांच्या साहित्यात ठायी ठायी दिसून येते. डी.बी.जगतपुरिया यांच्या समग्र साहित्यकृतींचा उलगडा करणे विस्तारभयास्तव थांबवतो आहे. त्यांना आगामी साहित्यकृतीच्या लेखनासाठी दीर्घ आयुरारोग्य लाभो, हीच मनस्वी सदिच्छा..!

---

# अस्मितादर्शी लेखक डी.बी. जगतपुरिया

डॉ. सारीपुत्र तुपेरे
संपर्क ९८२२९८४३१३

माझ्या सहप्रवासी सारथ्यांनो... गुरुवर्य पानतावणे सरांनी ही साहित्याची सत्त्वशील चळवळ उभारताना रक्ताचं पाणी केलं. महापुरुषांच्या विचारांच्या, तत्त्वज्ञानाच्या बेरजेतून ते क्षीण बुध्दीला बळकट करणारे विचार आपल्या लेखणी- वाणीतून मुक्तपणे वाटत राहिले. सर केवळ व्यक्ती राहिले नव्हते. ते अस्मितादर्श विद्यापीठाचे कुलगुरू म्हणून विशाल उर्जाकेंद्र झाले होते. पानतावणे नावाच्या उर्जापीठातून क्रांतिकारी, तेजस्वी, अंधारभंजक, विशाल, उत्तेजक विचारकिरणांचे प्रक्षेपण होत होते. त्यांचे स्वतःचे तत्त्वज्ञानही अस्मितादर्शच्या वैचारिक दबदबा निर्माण करणाऱ्या वाटचालीत एकजीव झाले होते. ते मूल्यवर्धक- तत्त्वचिंतक, थोर साहित्यिक होते. आपण अनेक मोठयातले खोटे आणि मोठयातले छोटे लेखक पाहतो. पण ते खूप तुच्छतावादी असतात. दांभिक असतात. सर मोठयातले मोठेच होते. त्यांनी निर्माण केलेली विचार उर्जा अक्षय आहे. या नाठाळ व्यवस्थेशी दोन हात करण्यासाठी शूर सर्जकांचं सैन्य त्यांनी तयार करून ठेवलयं. अस्मितादर्श साहित्य संमेलन विचार, विवेक आणि प्रेरणची भक्कम शिदोरी वाटणारं आगळ-वेगळं साहित्य संमेलन असतं. ही साहित्याची कार्यशाळा असते. ( ३५वे अस्मितादर्श साहित्य संमेलन, जालना येथील डी. बी. जगतपुरिया यांचे अध्यक्षीय भाषण ) प्रख्यात कवी, चिंतनशील स्तंभलेखक, साक्षेपी समीक्षक आणि परखड वक्ते असलेले प्रज्ञावंत व्यक्तिमत्त्व म्हणजे डी.बी.जगतपुरिया होय. महत्त्वाची गोष्ट म्हणजे ते अस्मितादर्श या नियतकालिकातून लिहित्या झालेल्या साहित्यिकांपैकी एक महत्त्वाचे लेखक आहेत. त्यांनी आंबेडकरवादी भूमिका घेऊन साहित्यनिर्मिती केली. आपले सबंध आयुष्य प्रबुध्द साहित्यासाठी घालवले. अशा अस्मितादर्शी लेखकांचा अमृतमहोत्सव साजरा होतोय. ही अतिशय आनंदाची घटना आहे. त्याबद्दल सर्वप्रथम अस्मितादर्शी लेखक डी.बी.जगतपुरिया यांचे मनस्वी अभिनंदन आणि त्यांना भावी सर्जनशील दीर्घायुष्यासाठी मंगलमय सदिच्छा !

अस्मितादर्श हे नाव आंबेडकरी चळवळीमध्ये क्रांतदर्शी आहे. हे त्रैमासिक स्मृतिशेष पद्मश्री डॉ. गंगाधर पानतावणे यांनी सुरू केले. अत्यंत कष्टाने, निष्ठेने आणि परिश्रमाने ते चालविले. दलित चळवळ आणि साहित्याला हक्काचे विचारपीठ मिळवून दिले. त्यामागे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांची प्रेरणा होती. ही उर्जा घेऊनच मराठी साहित्यात दलित साहित्याची निर्मिती झाली. वेदना, नकार, विद्रोह, विज्ञान आणि मानवता ही या साहित्य प्रवाहाची सूत्रे आहेत. दलित साहित्याने क्रांतिविज्ञान घडविले. हे सूर्यसत्य कोणीही नाकारु शकणार नाही. या वाङ्मयीन क्रांतीची पायाभरणी ज्या त्रैमासिकातून झाली ते म्हणजे अस्मितादर्श होय. आंबेडकवाद ही अस्मितादर्शची प्रतिज्ञा आहे. आंबेडकरवादाचे संवर्धन करणे, त्यातील तत्त्वांचा जागर करणे, त्याविरुध्दच्या अविचारांचे निर्दालन, उत्खनन करणे हे कार्य अस्मितादर्शमधील लेखनातून सातत्याने केले गेले. यातूनच दलित चळवळ आणि साहित्यामध्ये नवनवीन लेखकांनी लेखन केले. प्रस्थापित साहित्याने दलित लेखकांच्या साहित्याला साहित्य म्हणून नाकारले, त्याची हेटाळणी केली. त्यावर आरोप प्रत्यारोप केले. अशावेळी अस्मितादर्शने दलित लेखकांना लेखनाचे बळ दिले. एकूणच अस्मितादर्श हे तळागळातील, दलित, शोषित, वंचित समुहांतील लेखकांसाठीची हक्काचे वाङ्मयीन सर्जनपीठच आहे. यातूनच निर्माण झालेल्या अस्मितादर्शी लेखकांमधील डी.बी.जगतपुरिया हे एक नाव महत्त्वाचे आहे. अस्मितादर्श आणि डी.बी. जगतपुरिया यांच्यातील ऋणानुबंध अतिशय घनिष्ठ आहे. अस्मितादर्शमधून त्यांचे लेखन प्रसिध्द झाले. प्रत्येक अस्मितादर्श साहित्य संमेलनात त्यांचा सहभाग राहिला आहे. ते ३५ व्या संमेलनाचे अध्यक्ष ही राहिलेले आहेत. डॉ. गंगाधर पानतावणे यांच्याविषयी जगतपुरिया यांना प्रचंड आदर आहे. याविषयी डंका या वैचारिक लेखसंग्रहाच्या मनोगतात त्यांनी लिहिलेले आहे की, धुळयाला नोकरीस असतानाच विख्यात विचारवंत, पहिल्या विश्व मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष अस्मिादर्शकार डॉ. गंगाधर पानतावणे यांचा सहवास लाभला. त्यामुळे अस्स्ल सामाजिक आशयाची, विद्रोही कविता कशी असते याची जाणीव झाली. ( २०१७, पृ. ६ ) यावरुन डॉ. पानतावणे, अस्मितादर्शशी असलेला त्यांचा ऋणानुबंध येथे दृग्गोचर होतो. वास्तविक अस्मितादर्शमधील प्रत्येक लेखकाला मार्गदर्शन करण्याचे कार्य डॉ. पानतावणे यांनी केलेले आहे. लेखक जगतपुरिया यांनी अनेक वृत्तपत्रातून स्तंभलेखन केलेले आहे. विविध मासिकांमधूनही ते लिहित राहिले परंतु अस्मितादर्शशी त्यांचा वेगळा स्नेह होता. जो आजही अस्तित्वात आहे. कवी जगतपुरिया हे त्यांच्या लेखकीय पैलूतील महत्त्वाचा भाग आहे. आंबेडकरी जाणिवांची आत्मप्रत्ययी कविता गेल्या अर्धशतकापासून लिहिली जात आहे. डी.बी.जगतपुरिया यांचे नाव महत्त्वाचे आहे. त्यांनी इतर प्रकारात लेखन केलेले असले तरी त्यांची कवी म्हणून असलेली ओळख महत्त्वाची आहे. ठिणगी हा त्यांचा पहिला कवितासंग्रह आहे. त्यांनतर वज्रमूठ, सूर्यकुल, दरबार आणि रणांगण हे त्यांचे प्रकाशित कवितासंग्रह आहेत. समाजसन्मुखता आणि विचारशीलता हा त्यांच्या कवितेचा मुख्य गाभा आहे. कवी जगतपुरिया हे स्वप्नात रमणारे कवी नाहीत. त्यांना वास्तवाचे सजग भान आहे. या भानाला समाजनिष्ठता आहे. समाजातील विविध प्रश्नांशी भिडण्याची ताकद त्यामध्ये आहे. जातीयता, विषमात, धर्मांधता, अंधश्रध्दा यांना तर जगतपुरिया हे आपल्या कवितेतून प्रखरपणे नाकारतात. ही सर्व जुनाट मूल्ये माणसाचे माणूसपण नाकारणारी होती. यातून अस्पृश्यता सारखा सामाजिक कलंक निर्माण करण्यात आला. त्याविरुध्द्ची वज्रमूठ कवीने आववळलेली आहे. यामागे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची प्रज्ञासूर्याची उर्जा आहे. या सूर्यकुलाचा हा कवी वारसदार आहे. डॉ. आंबेडकरांनी दलित समाजाचा अस्मिता दिली. त्यांना अस्मितेचे दर्शन घडविलेले. हेच अस्मितादर्शी कवी जगतपुरिया यांच्या कवितेचा गाभा आहे. प्रज्ञासूर्याच्या या भूमीत/ सौख्याचा सूर्य उगवेल/ अन् तोच/ दहशतवादाने पोखरलेल्या/ सबंध जगाला / शांती व अहिसा/ अन् करुणेचं सत्त्व जागवेल ( २०१८, पृ. १४ ) कवीने याठिकाणी आजच्या प्रश्नांवर भाष्य केलेले आहे. दहशतवाद मग तो आतंगवाद्यांचा, धर्मांधवाद्यांचा, भांडवलवाद्यांचा कोणाचाही असो तो देशाला घात आहे. अशावेळी कोणता विचार आपला तारक ठरणार आहे. याची स्पष्टता कवींना असायला हवी. ती कवी जगतपुरिया यांच्यासारख्या ज्येष्ठ् कवीकडे पाहायला मिळते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, भारतीय संविधान आणि त्यातील सामाजिक लोकशाहीची मूल्येच आपल्याला जपावी लागणार आहेत. त्याशिवाय भारत देशाचे सार्वभौमत्व अबाधित ठेवता येणार नाही. असा सम्य्क विचार मांडणारी आंबेडकरवादी अस्मितादर्शी कविता कवी डी.बी.जगतपुरिया यांनी लिहिलेली आहे. यातूनच त्यांचे अस्मितादर्शी कवी म्हणून असलेला पैलू दृग्गोचर होतो.चिंतनशील स्तंभलेखक म्हणून डी.बी.जगतपुरिया यांची विशेष ओळख आहे. वास्तविक कोणताही अस्मितादर्शी लेखक हा इतर साहित्यप्रकारात लेखन करत असला तरी त्याची वैचारिक जडणघडण होत जाते आणि त्याच्याकडून चिंतनशील वैचारिक साहित्यनिर्मितीसुध्दा होते. जगतपुरिया यांनी विविध वृत्तपत्रांमधून स्तंभलेखन केलेले आहे. त्यांचे हे लेखन म्हणजे त्यांच्या सर्जनशील, चिंतनशील, समाजभिमुख आणि परिवर्तनवादी भूमिकांचा दस्तऐवज आहे. यामध्ये विविध स्तंभलेखांचे संग्रह असलेले झुंबर आणि डंका हे दोन ग्रंथ महत्त्वाचे आहेत. डंका या ग्रंथात गावकरी- नाशिक, श्रमराज्य- धुळे, लोकपत्र- औरंगाबाद, महानायक- औरंगाबाद, नवराष्ट्र- नागपूर, आपला महाराष्ट्र- धुळे, जनशक्ती-जळगाव, देशदूत- जळगाव, लोकनायक- मुंबई इत्यादी वृत्तपत्रामध्ये लिहिलेले विविध लेख एकत्रित केलेले आहेत. तब्बल ५७ लेखांचा समावेश यात आहे. या लेखांची शीर्षके पाहिली तरी आपल्याला यातील विषयचिंतनाचा आवाका लक्ष्यात येतो. उदा. अज्ञानाची मगरमिठी, दूध चमत्कार : एक सार्वभौम दुर्भाग्य, चमत्काराच्या तंत्रात फसणारा समाज, कलेंच कलेवर करणारा उपटसुंभानंद, खा-कीचा खाकीखोर तमाशा, दलालीची दलदल, कुशासनाच्या प्रदूषणांत गुदमरणारी जनता, देवभूमीत चालणारा देहव्यापार, बागस साहित्यिक, बोगस संस्था आणि बोगस पुरस्कार, लोकशाहीची खिल्ली उडविणारे सत्तानाटय, संसदीय हैदोस, धर्मांतराची आग आणि मानवतेची जाग, पर्यावरणचे जागतिक संकट इ. वरील सर्व स्तंभलेखनातून जगतपुरिया समाज, संस्कृती, भाषा, साहित्य, राजकारण, धर्म्कारण यांची चिकित्सा करतात. सामाजिक परिवेशाचा धांडोळा घेणे, त्यातील अपप्रवत्तींचे निर्दालन करणे, समाजाला सशक्त करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करणे हे कोणत्याही जाणत्या, लिहित्या लेखकाचे काम असते. समाजाला जागृत करावे लागते. असा सामाजिक जागल्या असलेले डी.बी.जगतपुरिया हे महत्त्वाचे स्तंभलेखक आहेत. साक्षेपी समीक्षक म्हणून डी.बी. जगतपुरिया यांनी केलेले समीक्षालेखन खूप महत्त्वाचे आहे. वास्तिवक तात्त्विक समीक्षा त्यांनी लिहिलेली नाही तर वाङ्मयीन आस्वादात्मक समीक्षालेखन त्यांनी केलेले आहे. कोणत्याही समीक्षेचा पाया हा आस्वाद असतो. आस्वादातून आकलन, आकलनातून परीक्षण, परीक्षणातून समीक्षेची आखणी केली जाते. समीक्षक जगतपुरिया यांचे मूल्याक्ष : कवितेची सम्यक समीक्षा, माझ्या कवितेची समीक्षा, सत्त्वसार, दस्त-ऐवज आणि सृजनपर्व इत्यादी ग्रंथ प्रकाशित आहेत. यामध्ये वेगवेगळया ग्रंथांना त्यांनी लिहिलेल्या प्रस्तावना, ग्रंथ परीक्षणे यांचा समावेश आहे. कोणत्याही समीक्षाव्यवहारात सर्जनशील लेखनाची दखल घेणे खूप गरजेचे असते. त्याशिवाय वाङ्मयीन परिप्रेक्ष्य विस्तारीत होत नाही. जगतपुरियांचे समीक्षालेखन हा केंद्राकडून परिघाकडे घेऊन जाणारा समीक्षाव्यवहार आहे. दुर्लक्षित, उपक्षित, वंचित, दलित समुहातील लेखकांच्या साहित्याची ते नोंद घेतात. त्यांच्या सर्जनाला न्याय देतात. हे करतानाचा उच्चप्रभू, झापडबंद, समीक्षणांवर त्यांनी हल्लेही चढवलेले आहेत. एकुणात बहुजनांचा समीक्षक म्हणून जगतपुरिया यांना ओळखले जाते. यासाठी सत्वसार या समीक्षाग्रंथातील काही तपशील लक्षात घेणे गरजेचे आहे.

अस्मितादर्श आणि डी.बी. जगतपुरिया यांचे नाते घनिष्ठ स्वरूपाचे आहे. ते प्रत्येक अस्मितादर्श संमेलनात सहभागी होते. कवी म्हणून कवी संमेलनाचे अध्यक्ष म्हणून त्यांनी महत्त्वाची भूमिका निभावलेली आहे. आपल्या अनोख्या शैलीतून ते कवी संमेलन बहारदार करत असत. त्यांची वाणी प्रबुध्द काव्याचा आविष्कार करत होती. ३५ वे अस्मितादर्श साहित्य संमेलन जालना येथे संपन्न झाले. त्या संमेलनाचे अध्यक्ष डी.बी. जगतपुरिया होते. याठिकाणी त्यांचे झालेले भाषण अतिशय महत्त्वाचे आहे. उर्जस्वी वाणी, परखड विचार मांडणी आणि तात्त्विक आंबेडकवादी भूमिका यांचे दर्शन या भाषणातून पाहायला मिळते. मानवी जीवनात साहित्याची भूमिका काय आहे आणि ती काय असावी असा मूलभूत प्रश्न ते उपस्थित करतात. त्यांची ठाम भूमिका आहे की, आजच्या या अद्यावत विज्ञान- तंत्रज्ञानाच्या काळात साहित्याने वैज्ञानिक दृष्टिकोन जपत अंधाराकडून प्रकाशाकडे जयचा राजमार्ग दाखवला पाहिजे. ( २०१९, पृ. ३४ ) अस्मितादर्शी लेखक जगतपुरिया यांची ही भूमिका अतिशय महत्त्वाची आहे. पुराणप्रिय, सनातनी, अवैज्ञानिक, अमानवी आणि बुध्दिभेद करणा-या विचारांना साहित्यात काहीही स्थान नसावे. तर तळागळातील माणसांच्या विचारांचा स्वर मांडणारे साहित्य निर्माण व्हायला हवे. दलित साहित्य हे या कसोटयावर टिकणारे महत्त्वाचे साहित्य आहे. दलित ही संकल्पना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मांडलेल्या ब्रोकन मेन थेरीनुसार आलेली आहे. त्यामध्ये क्रांतीचा विचार आहे. विद्रोह, विज्ञान आणि मानवतावादीची बीजे आहेत. या बिजाचा विस्तार व्हायला हवा . यासाठी परिवर्तनवादी लेखकांनी जबाबदारीने वागायला हवे. याची जाणीव त्यांनी येथे करून दिलेली आहे. समाजकारण, राजकारण, धर्मकारण अशा विविध पातळयांवरील गंभीर प्रश्नांची दखल घेत या भाषणामध्ये जगतपुरिया यांनी आपले वाङ्मयीन चिंतन मांडलेले आहे. शेवटी ते लिहितात, दोस्तांनो, परिवर्तनाची लढाई खूप कठीण असते. क्रांतीचं चक्र आम्हीच आमच्या सह फिरवू या बाबासाहेबांच्या शब्दांत खोल अर्थ दडलाय. आम्ही म्हणजे पीडित- दुर्लक्षित, तिरस्कृत, कोटयावधी गरीब, दुबळे, श्रमिक, कष्टकरी यासाठी गुलछबू लेखक अडथळे आणतील. यासाठी आपल्यालाच नवरचनेच्या अवकाशात गरूडझेप घ्यावी लागेल. भ्रांतीचं विसर्जन करून क्रांतीच्या पथाने जावे लागेल. विसाव्या शतकात पुराणमतवादी- जीर्ण- टाकाऊ विचार खिळखिळे झाले. इष्ट असेल ते बोलणारचं हा बाण अंगात भिनवावा लागेल. समविचारी साहित्य प्रवाहातल्या मित्रांना सोबत घ्यावं लागेल. समता, न्याय, ज्ञाननिष्ठा ही मूल्ये पेरण्यासाठी लेखण्या सज्ज कराव्या लागतील. मित्रांनो, आपले उर्जावान हात एकमेकांच्या होतात असू द्या. तुम्ही शत्रू नाहीत समतेच्या जगातले मानवतेचे शिलेदार आहात हे दिसू द्या. आपल्या या प्रज्ञापथाला कडकडीत विरोध करणाऱ्या संकुचित संकीर्ण मुंगीच्या मनाच्या धेडांना त्यांच्या डबक्यात स्वस्थ बसू द्या. मित्रांनो, मी माणसाचं मूल्य जपणारा छोटा पण सच्चा माणूस आहे. मी आपल्याकडूनच भरपूर उर्जा ग्रहण केली आहे. आपल्या मौलिक संपर्कातले मोतीमोलाचे क्षण मी कधीच विसरणार नाही. ( २०१९, पृ. ४१ ) अस्मितादर्शी लेखक डी.बी. जगतपुरिया यांचे हे भाषण अत्यंत चिंतनशील, मार्गदर्शी आहे. यामागे अस्मितादर्शच्या कार्य्शाळेतून मिळालेली विचारउर्जा आहे. याची जाणीव ते सातत्याने मांडत असतात. जगतपुरिया यांच्या विचारांची बैठक पक्की आहे. आजही अनेक भाषणांमधून ते परखडपणे विचार मांडणी करतात. त्यामध्ये पुरोगामी विचारतत्त्वे, मानवतावादी सूत्रे, सम्यक क्रांतीचा विचारधारा, भारतीय संविधानातील मूल्ये आणि अस्मितादर्शी चळवळ आणि साहित्विचार यांचा समावेश होतो. यातून जगतपुरिया यांचे अस्मितादर्शी लेखक असलेले व्यक्तिमत्त्व आणि वाङ्मयीन कार्यकर्तृत्व अधिक उजागर होते. डी.बी. जगतपुरिया यांचा हा उर्जस्वी प्रवास असाच प्रबुध्द दिशेने गतिमान होत राहो. ही मंगलमय सदिच्छा व्यक्त करून या लेखाला पूर्णविराम देतो.



# चारचाकी चोरणारे अट्टल चोरटे पोलिसांच्या ताब्यात

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** काही दिवसापूर्वी बनावट चावीद्वारे चार चाकी वाहन चोरल्याची घटना घडल्याने अनोळखी चोरट्यावर गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्याच अनुषंगाने धुळे स्थानिक गुन्हे शाखा व चाळीसगाव चौफुली पोलीस यांना पोलीस अधीक्षक संजय बारकुंड यांनी तात्काळ कारवाईचे आदेश केले. व चोटा हा चाळीसगाव चौफुली च्या आवारात आढळून आल्याने त्याला ताबडतोब ताब्यात घेण्यात आले. व त्याच्याकडून एकूण ४,५०,००० चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.


तक्रारदार देविदास त्र्यंबक अहिरराव वय 67 रा साईबाबा मंदिराजवळ पश्चिम हुडको , धुळे यांनी पांढऱ्या रंगाची टाटा DI २०७RX पिकअप चारचाकी वाहन चोरी केल्याबाबतची तक्रार दिली होती चोरी गेलेला वाहणाचा शोध घेणेबाबत मा.पोलीस अधीक्षक संजय बारकुंड यांनी पोलीस निरीक्षक हेमंत पाटील स्थानिक गुन्हे शाखा , धुळे यांना सुचना देऊन गुन्ह्याची उकल करणेबाबत आदेशीत केले होते . सदर आदेशानुसार माहिती प्राप्त करीत असतांना पोलीस निरीक्षक हेमंत पाटील यांना गोपनिय माहीती प्राप्त झाली की, सदरचा गुन्हा चाळीसगाव रोड परिसरातील अरबाज मनियार व त्याचा साथीदार शाहरुख खाटीक यांनी केला असल्याचे माहीती प्राप्त झाल्याने स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला आदेशित केले. पोलीस पथक संशयीत आरोपी अरबाज शेख व शाहरुख खाटीक यांचा शोध घेत असतांना ते चाळीसगाव रोड चौफुली येथे मिळून आल्याने त्यास ताब्यात घेवून त्यांचे नाव गाव विचारता १ ) अरबाज शेख साजीद मनियार वय- २५ वर्ष २ ) शाहरुख अब्बास खाटीक वय २६ वर्षे दोन्ही रा.जामचा मळा चाळीसगाव रोड , धुळे असे सांगितले आरोपीतांना गुन्ह्यातील चोरी केलेल्या वाहणांबाबत सखोल विचारपुस करता त्यांनी दोन चारचाकी वाहने बनावट चावी द्वारे चोरी केल्याचे सांगितले . चाळीसगाव रोड परीसरातून चोरी केलेले पिकअप वाहन क्र . MH - १८ AA - २२० ९ हे ज्योती टॉकीज जवळ लपविले असल्याचे सांगितले व बुलढाणा जिल्ह्यातुन चोरी केलेले क्रुझर वाहन क्र . MH - २८ - V - ६२४५ हे संत नरहरी नगर येथे लपविले असल्याचे सांगितले.स्था.गु.शा. पथक व चाळीसगाव रोड पोलीस ठाणे चे पथकाने लागलीच दोन्ही वाहणाने ताब्यात घेतली नमुद दोन्ही आरोपीतांकडुन खालील दोन गुन्ह्याची उकल झाली आहे . पोलीस ठाणे चाळीसगाव रोड पो.स्टे हिवरखेड पो.स्टे ( बुलढाणा ) गु.र.नं व कलम ८ ९ / २०२३ IPC ३७ ९ प्रमाणे ४२/२०२३ IPC ३७ ९ प्रमाणे एकुण वाहन क्र . MH - १८- AA - २२० ९ MH - २८ - V - ६२४५ जप्त मुद्देमाल किंमत १,५०,००० / ३,००,००० / ४,५०,००० / नमुद दोन्ही आरोपीतांकडुन दोन गुन्हयांची उकल होवुन ४,५०,००० / - रु.कि.चा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून अधिकचा तपास चाळीसगाव रोड पोलीस करीत आहेत सदरची कारबाई संजय बारकुंड पोलीस अधीक्षक, धुळे, किशोर काळे , अपर पोलीस अधीक्षक , धुळे एस. ऋषीकेष रेड्डी सहा . पोलीस अधीक्षक , धुळे शहर विभाग यांचे मार्गदर्शनाखाली स्था.गु.अ.शा. चे पो नि हेमंत पाटील, पो . नि . धिरज महाजन चाळीसगाव रोड पो.स्टे . स्थानिक गुन्हे शाखेचे बाळासाहेब सुर्यवंशी, संदिप सरग , पंकज खैरमोडे , महेंद्र सपकाळ , योगेश जगताप, किशोर पाटील, पंकज चव्हाण संदिप पाटील, प्रदिप पाटील, अविनाश पाटील, इंद्रजीत वैराट स्वप्निल सोनवणे, शरद जाधव, चेतन झोळेकर व हेमंत पवार अशांनी केली आहे.

# तब्बल २५ वर्षानंतर भेटले बालमित्र

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** केंद्रीय प्राथमिक शाळा, करंजखेड व महात्मा जोतिबा फुले विद्यालय, करंजखेड येथील सर्व जुने शिक्षक, माजी विद्यार्थी, विद्यार्थिनी यांचा स्नेहमेळावा नुकताच झाला. सर्व जिवलग जुने मित्र तब्बल पंचवीस ते तीस वर्षानंतर भेटल्याने आनंदून गेले होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस सर्व शिक्षकांवर फुलांचा वर्षाव करून स्वागत करण्यात आले. सर्व शिक्षकांचे गुरुपूजन व पाद्यपूजन करून माजी विद्यार्थी, विद्यार्थिनींनी केले. फटाक्यांची आतिषबाजी झाली. त्यानंतर शिक्षक व माजी विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी रुपाली अहिरे ,कृष्णा मालकर, बद्रीनाथ सपकाळ, गणेश खैरे, विशाल देशमुख, समाधान ससे, योगेश शिंदे, भाऊसाहेब शिंदे, सुरेखा पवार, सुरेखा देशमुख, सविता देशमुख, ज्योती घाडगे, संतोष वाघ, जगदीश आगळे आदींनी जुन्या आठवणींना उजाळा दिला. जे माजी विद्यार्थी हयात नाहीत त्यांना श्रद्धांजली देण्यात आली. स्नेहमेळाव्याचे सूत्रसंचालन सुनील पवार व युवराज शेलार यांनी केले. प्रास्ताविक कृष्णा मालकर यांनी केले तर आभार विशाल देशमुख यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी नाना लवंगे, संजय खरात, पोपट वळवळे, केदार ठाकरे, मीनल कोल्हे, मीना ताजने, सुवर्णा घडामोडे, वैशाली जगताप आदी माजी विद्यार्थी व विद्यार्थिनींनी परिश्रम घेतले.





# अंबड तालुक्यातील लोणार भायगाव येथे कुस्त्याची दंगल

आधुनिक केसरी न्यूज

**अंबड :** तालुक्यातील लोणार भायगाव येथे प्रती वर्षीप्रमाणे याही वर्षी भव्य कुस्त्याची दंगल ग्रामस्थांच्या वतीने दि. 18 रोजी भरविण्यात आली होती. या कुस्तीच्या आखाड्यात शेकडो पहिलवानांनी सहभाग नोंदविला.

अंबड तालुक्यातील लोणार भायगाव येथे भरविण्यात आलेल्या कुस्त्याच्या या आखाड्यात जालना जिल्ह्यातील मल्ल पहेलवानासह, बीड, औरंगाबाद, परभणी,नगर या जिल्ह्यातील पहेलवान मंडळींनी या कुस्त्यांत सहभाग नोंदवून ग्रामस्थांच्या वतीने देण्यात आलेल्या बक्षीसाचा स्विकार या आखाड्यात केला. सामाजिक कार्यकर्ते कल्याण काका खडके यांनी कुस्त्यांची दंगल यशस्वीपणे पार पडावी तसेच ग्रामीण भागातील पहिलवानांना कुस्तीसाठी प्रेरणा देण्यासाठी 11 हजार रुपये नगदी स्वरूपात कमिटीला सुपूर्द केले. या आखाड्याची शेवटची कुस्ती कल्याण काका खडके यांच्या हस्ते लावून विजेत्या पहेलवानाला बक्षीस देण्यात आले. कुस्तीचे आखाडे यशस्वीपणे पार पाडण्यासाठी लोणार भायगावचे माजी सरपंच रामप्रसाद दसपुते,सरपंच गोविंद जाधव, लहू किडवे, लक्ष्मण माने,रंगाप्पा वैद्य,भद्रीनाथ वैद्य, सुरेश शिवाजी दसपुते, सिद्धार्थ रोटे,राजाराम जाधव,कल्याण कुंडकर, तलाठी रामभाऊ जाधव,पत्रकार सुगनचंद संचेती,संभाजी बोबले, संभाजी कुंडकर यांच्यासह ग्रामस्थांनी सहकार्य केले. या कुस्त्या पाहण्यासाठी लोणार भायगाव परिसरातील सर्व कुस्ती शौकीनांसह ग्रामस्थ हजारोंच्या संख्येने उपस्थित होते.

# अंगलगाव येथील सप्ताहाची सांगता

आधुनिक केसरी न्यूज

**परतुर :** तालुक्यातील अंगलगाव येथे सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहाची मंगळवारी दि१८. उत्साहात सांगता झाली. तरुणाने व्यसनापासून दूर राहून, परमार्थ



करावा- ह.भ.प. अक्रुर महाराज साखरे यांच्या काल्याच्या कीर्तनात संदेश अखंड हरिनाम सप्ताह, अंगलगाव येथील मागील सात दिवसांपासून सुरू असलेल्या सप्ताहाची सांगता झाली. ह.भ.प. आक्रूर महाराज यांच्या काल्याच्या कीर्तनाने आज सप्ताह ची सांगता झाली, यावेळी सर्व युवकांनी व्यसनापासून परावृत्त होऊन, दूर राहून खरा परमार्थ करून आनंद घ्यावा, असा मोलाचा संदेश देत आपली सेवा संपन्न झाली. तसेच भागवत कथे ची हो समाप्ती झाली, भागवत कथा प्रवक्ते ह. भ. प. अमोल महाराज बोधले यांच्या हस्ते करण्यात आली. तसेच ज्ञानेश्वरी पारायण सांगता हस्ते उद्धव महाराज तनपुरे व रेवणनाथ महाराज रेंगे यांच्या हस्ते संपन्न झाले.या सप्ताहात महाराष्ट्रातील ख्यातनाम गायानाचार्य शिवाजी काकडे, उध्दव शिंदे, निवृत्ती महाराज शिंदे तसेच मृदंगाचाऱ्य कृष्णा भोरकडे आदी दिग्गज कलाकारांची उपस्थिती होती. कीर्तनानंतर महाप्रसादाचा लाभ पंचक्रोशीतील सर्व भविकासह गावकऱ्यांनी लाभ घेतला. मागील 29 वर्षांपासून सुरू असलेल्या या सप्ताह चे संपूर्ण नियोजन यावर्षी गावातील नवंयुवक तरुण मंडळींनी केले. सप्ताह संपूर्ण यशस्वी करण्यासाठी गावातील सर्व भजनी मंडळी,ज्येष्ठ नागरिक, महिला, सर्व तरुण मंडळींनी परिश्रम घेऊन आनंदाने सप्ताहाची सांगता केली.

# शेतकऱ्याच्या पीक विमा व नुकसान भरपाई संदर्भात निवेदन

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** पोलीस मित्र संघटना नवी दिल्ली भारत मा संथापक राष्ट्रीय अध्यक्ष संतोष दादा चौधरी यांच्या आदेशाने राष्ट्रिय जन सम्पर्क प्रमुख गजानन भगत साहेब व महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष सुनिल भाउ पाटिल यांच्या सुचनेनुसार तसेच छत्रपती संभाजीनगर जिल्हा प्रमुख अशोक वरकड पाटिल यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा कमेटीच्या वतीने केद्रीय कृषी राज्यमंत्री कैलाशजी चौधरी साहेब छत्रपती संभाजीनगर येथे आले असता त्यांना केंद्रीय वित्त राज्यमंत्री डॉ भागवत कराड साहेब यांच्या निवासस्थानी शेतकर्याच्या पिक विमा व नुकसान भरपाई संदर्भात निवेदन देण्यात आले यावेळी जिल्हा कार्याध्यक्ष योगेश निकम जिल्हा सचिव कैलास पाटिल गाडेकर जिल्हा सल्लागार अरुणराव देवूळगावकर गायकवाड व शेख साहेब आदी उपस्थीत होते.





# कविता आली सामोरीचे प्रकाशन

आधुनिक केसरी न्यूज

**मेहकर :** येथील प्रसिद्ध कवी , समीक्षक किरण डोंगरदिवे ह्यांच्या कविता आली सामोरी ह्या पुस्तकाचे प्रकाशन दि 18 एप्रिल 2023 रोजी डोंगरदिवे परिवारातील सदस्यांच्या उपस्थिती मध्ये कु नीरजा विनोद डोंगरदिवे, सुरभी विनोद डोंगरदिवे आणि ॲड इशिता किरण डोंगरदिवे ह्या कन्यांच्या हस्ते झाले. कविता आली सामोरी हा ग्रंथ कवितेच्या निर्मितीच्या संवेदनशील तितक्याच रंजक कथा सांगणारा असून त्यात प्रदीप निफाडकर ह्यांची माझी मुलगी, कवी बी ह्यांची माझी कन्या कविता आहेत त्याशिवाय राजकवी यशवंत ह्यांची आई, विठ्ठल वाघ ह्यांची तिफन, इंद्रजित भालेराव ह्यांची बाप, विनायक ह्यांची हिरकणी, श्री दि इनामदार ह्यांची ऋण कुंजबिहारी ह्यांची भेटेन नऊ महिन्यांनी ह्यासह किरण डोंगरदिवे ह्यांची शबरी अश्या कवितांच्या जन्मकथा सांगितल्या गेल्या आहेत.

त्यासाठी प्रत्यक्ष कवीशी किंवा त्यांच्या पारिवारिक सदस्य ह्यांच्याशी संवाद साधून कवितेमागील कथा किरण डोंगरदिवे ह्यांनी लिहिली असून हा मराठी साहित्यातील पहिला प्रयोग आहे. ह्या प्रकाशनाच्या वेळी लेखक किरण डोंगरदिवे ह्यांच्यासह अर्चना डोंगरदिवे, विनोद डोंगरदिवे, सिद्धार्थ डोंगरदिवे, सोनम डोंगरदिवे, समीक्षा डोंगरदिवे, अक्षर डोंगरदिवे, सम्राट आणि सम्यक असे परिवारातील सदस्य उपस्थित होते. समाजजीवनात मुलीच्या कर्तबगारीला प्रोत्साहन मिळावे तसेच येऊ घातलेल्या जागतिक पुस्तक दिनानिमित्त परिवारातील सदस्यांना ग्रंथाचे महत्व समजावे म्हणून हे प्रकाशन पारिवारिक कार्यक्रमात मुलींच्या हस्ते संपन्न करून कवी किरण डोंगरदिवे ह्यांनी नवीन पायंडा पाडला आहे.

# ॲड. अशरफ पटेल यांची महाराष्ट्र शासनाच्या अव्वर सचिवपदी निवड

आधुनिक केसरी न्यूज



**जळगाव :** जळगाव ( जामोद ) तालुक्यातील पळशी ( वैद्य ) या गावचे रहिवासी जे. जे. हॉस्पिटल मुंबई येथील माजी व्हॉईस डीन तसेच गुणश्री प्राध्यापक महाराष्ट्र शासन डॉ. सादिक पटेल यांचे सुपुत्र ॲड. अशरफ पटेल यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत महाराष्ट्र शासनाचे विधी व न्याय विभागाचे अवरसचिव म्हणून निवड झाली आहे. ॲड.अशरफ पटेल यांनी मुंबई विद्यापीठातून पदव्युत्तर पदवी सुवर्ण पदकासह उत्तीर्ण केली, नंतर त्यांनी मा.उच्च न्यायालय मुंबई येथे अधिवक्ता म्हणून वकीली व्यवसाय केला व नामवंत अधिवक्ता म्हणून काम करत असतानाच त्यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची परीक्षा दिली व परीक्षेला प्रविष्ट झालेल्या उमेदवारां मधून प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाले व त्यांची विधी व न्याय विभागाचे अव्वर सचिव म्हणून वयाचे ३१व्या वर्षी निवड झाली. ही जळगाव जामोद तालुका करिता अभिमानास्पद भूषणवाह बाब आहे.यापूर्वी त्यांचे काका ॲडव्होकेट हमीद बापूमीया पटेल हे सुद्धा अवर सचिव पदावर निवड होऊन प्रधान सचिव पदावर जाणारे बुलढाणा जिल्ह्यातील एकमेव अधिकारी होते. शिक्षणाचा व सामाजिक सेवेचा वारसा त्यांना त्यांचे आजोबा भाऊसाहेब बी. एस. पटेल सर यांच्याकडून मिळाला असून त्यांचे दुसरे काका ॲड. सलीम बापूमिया पटेल यांनी जळगाव जामोद तालुक्यातील पिंपळगाव काळे येथे के.जी. ते पी. जी. पर्यंतचे उच्च दर्जाचे शिक्षण देणारी शैक्षणिक संस्था स्थापन करून त्यांचे कुटुंबाचा शैक्षणीक वारसा पुढे नेण्याकरता प्रयत्न करीत आहे. ॲड.आशरफ पटेल यांचे नियुक्ती बद्दल व्हॉईस ऑफ मीडिया चे गुलाबराव इंगळें,राजेश बाठे यांनी त्यांचे अभिनंदन करून भविष्यकालीन वाटचालीस शुभेच्छा दिल्या.ॲड अशरफ पटेल यांच्या नियुक्तीचे सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे.

# गाढवाच्या शिंगरूवर उपचार करून पशु वैद्यकीय अधिकारी डॉ. श्रीकांत सुर्वे यांनी जपला सेवाधर्म

आधुनिक केसरी न्यूज

**सांगोला :** दहा ते बारा दिवस वयाच्या गाढवाच्या शिंगरूवर जागेवर जाऊन उपचार करून पशु वैद्यकीय अधिकारी डॉ. श्रीकांत सुर्वे यांनी आपला सेवाधर्म जपण्याचे कार्य केल्यामुळे पक्षीप्रेमी ग्रुपच्या वतीने त्यांचे आभार व्यक्त करण्यात आले.


पुजारवाडी, सांगोला येथे सक्सेस क्लासेसचे चालक महामुनी सर यांच्या घराशेजारी गाढवाचे एक शिंगरू जखमी अवस्थेत त्यांना दिसून आले. महामुनी सरांनी आपुलकी प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजेंद्र यादव यांच्याशी संपर्क साधून या जखमी शिंगरूवर उपचार करणे गरजेचे असल्याचे सांगितले. यादव यांनी पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. श्रीकांत सुर्वे यांना दुरध्वनीवरून संपर्क करून ही माहिती दिली. त्यानंतर तात्काळ डॉ. सुर्वे यांनी आपल्या सहकाऱ्यासमवेत पुजारवाडी येथे जाऊन काट्याकुट्यात पडलेल्या या शिंगरूला बाहेर काढून त्याच्यावर प्राथमिक उपचार केले. दहा-बारा दिवस वय असलेल्या या शिंगरूजवळ त्याची आईही उभी होती. मात्र ओरडण्याशिवाय ती काहीही करू शकत नव्हती. कोणीतरी अज्ञात व्यक्तीने मानेवर मारल्यामुळे जखमा झालेल्या या शिंगरूवर डॉ. सुर्वे यांनी उपचार करून आपला सेवाधर्म जपला आहे. यापूर्वीही स्टॅन्ड परिसरात गाढव तसेच शिवाजीनगर परिसरात गायीवर वेळीच जागेवर उपचार करून जीवदान दिलेले आहे. डॉ. श्रीकांत सुर्वे यांनी दाखविलेल्या भूतदयेबाबत पक्षीप्रेमी ग्रुपच्या वतीने तसेच परिसरातील नागरिकांकडून त्यांच्या या कार्याबद्दल अभिनंदन करून त्यांचे आभारही व्यक्त केले गेले.



# धार्मिक तेढ निर्माण करणाऱ्याची गय नाही : तळेकर

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** तालुक्यातील अंधानेर येथे दोन गटात भांडण झाल्याने आरोपी यांची कारागृहात रवानगी करण्यात आली त्या अनुशंगाने सोशल मिडीयावर पोस्ट केल्याने धार्मिक तेढ निर्माण करणा-या वर दि 11/2023 ते 17/4/2023 पर्यत 80 व्यक्ती विरोधात गुन्हे दाखल करून कारागृहात ग्रामीण पोलीस अधीक्षक मनीष कलवानिया यांच्या मार्गदर्शनाखाली रवानगी करण्यात आली आहे. सोशल मिडीयाचे माध्यमांतून धार्मिक व जातीय भावना दुखावुन दोन समाजात तेढ निर्माण होतील असे स्टेटस, व्हिडीओ क्लिप्स, आक्षेपार्ह मजकुर, एसएमएस तयार करून प्रसारित करण्यासारखे कृत्य करून सामाजिक सौहार्द बिघडवणाऱ्या कोणत्याही व्यक्तीची हयगय न करता त्यांचे विरुध्द सक्त कारवाईचा बडगा उगारत सामाजीक शांतता खराब करून अशांतता होईल असे वातावरण निर्माण करणा-या व्यक्तींविरुध्द कलम 153, 153 ( अ ), 295 ( अ ) भादंवी कायद्यानुसार तात्काळ गुन्हे दाखल करून त्यांना कारागृहाचा रस्ता दाखवला आहे. यामुळे अशा व्यक्तींना कठोर कायदेशिर कारवाई ला सामोर जावे लागत आहे. पोलीस अधीक्षक यांचे सुचनानुसार जिल्हयातील सामाजिक सौहार्द बिघडविण्याऱ्या कोणत्याही व्यक्तीची गय केली जाणार नसुन त्यांचे विरुध्द सातत्याने थेट व धडक गुन्हे दाखल करण्याचे निर्देश दिले आहेत. या वेळी कन्नड शहर पोलीस निरीक्षक बोलताना म्हणाले पोलीस सर्व परिस्थीतीला हाताळण्यास सक्षम असून



सायबर पोलीस टिम तंत्रज्ञान व विशेष दुलच्या साहय्याने सर्व प्रकारच्या सोशल मिडीया साईडवर बारकाईने लक्ष ठेवून आहेत. पोलीसांची सोशल मिडीया पेट्रालिंग नियमत सुरु असते. दोन धर्मात तेढ निर्माण करून अशांतता निर्माण करण्याऱ्या समाजकंटकाद्वारे कठोर कारवाही केली जाईल .

# फुले -आंबेडकर जयंतीनिमित्त व्याख्यानाचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** म.ज्योतिबा फुले विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त ल.सा.क.म जिल्हा छत्रपती संभाजीनगर शाखेच्या वतीने शनिवार,दि.२२ रोजी भानुदास चव्हाण सभागृह स्टेशन रोड उस्मानपूरा येथे व्याख्यानाचे आयोजन केले. आहे. कार्यक्रमाचे अध्यक्ष इंजि मधुसुदन कांडलिकर,उद्घाटक स.सो. खंडाळकर, प्रमुख वक्ते डॉ. प्रल्हाद लुलेकर उपस्थित राहतील. प्रमुख वक्ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर या विषयांवर मार्गदर्शन करतील. बालाजी थोटवे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भूमिका आणि आजचे वास्तव या विषयांवर आपले विचार मांडतील. तसेच कार्यक्रमाचे प्रास्ताविक लक्ष्मण जांभळीकर, सूत्रसंचालन साईनाथ भालेराव, तर आभार डी.व्ही. वाघमारे मानतील. यावेळी राजकुंडल बी.एस. व्यकटेंश भोसले, राम कांबळे, माणिक गालफाडे, बळीराम जी. किन्हाळकर, तर संयोजक म्हणून मारोती गायकवाड, आशुतोष रसाळ, बापूसाहेब उपाडे, अजय तुपे आदींची उपस्थिती असेल. या कार्यक्रमास जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन प्रसिद्धी प्रमुख अतुल खांडगावकर यांनी केले आहे.




# सुरक्षा ठेवीची रक्कम भरण्याचे वीजग्राहकांना आवाहन

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** महावितरणच्या छत्रपती संभाजीनगर परिमंडलातील वीजग्राहकांना माहे एप्रिल/मे महिन्याच्या वीजबिलांसोबत अतिरिक्त सुरक्षा ठेव भरण्यासाठी स्वतंत्र बिल देण्यात येत आहे. या अतिरिक्त सुरक्षा ठेवीच्या रकमेचा वीजग्राहकांना भरणा करावा, असे आवाहन महावितरणकडून करण्यात आले आहे.

दरम्यान, वीजग्राहकांना अतिरिक्त सुरक्षा ठेवीची रक्कम भरण्यास महावितरणकडून जास्तीत जास्त सहा समान मासिक हप्त्यांची सोय उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्याबाबतचा संदेश सुरक्षा ठेवीच्या बिलावर नमूद करण्यात आला आहे. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या विद्युत पुरवठा संहिता-२०२१ च्या विनियम १३.१ नुसार वीजग्राहकांकडून सुरक्षा ठेव आकारण्यात येते. दरवर्षी सुरक्षा ठेवीची पुनर्गणना करण्यात येते व त्यानुसार आर्थिक वर्ष संपल्यानंतर ग्राहकांच्या मागील एका वर्षातील सरासरी वीजवापराच्या आधारे अतिरिक्त सुरक्षा ठेवीची रक्कम निश्चित करण्यात येते. वीजग्राहकांची सुरक्षा ठेव मासिक बिल असेल तर तेथे सरासरी मासिक बिलाच्या दुप्पट आणि त्रैमासिक असेल तेथे सरासरी त्रैमासिक बिलाच्या दीडपट घेण्याची तरतूद आयोगाकडून करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे विनियम १३.११ नुसार ग्राहकाने भरलेल्या सुरक्षा ठेव रकमेवर रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या दराच्या सममूल्य दराने व्याजाची रक्कम वीजबिलाद्वारे समायोजित करून वीजग्राहकांना अदा करण्यात येते. त्याप्रमाणे छत्रपती संभाजीनगर परिमंडलातील वीजग्राहकांना एप्रिल महिन्यामध्ये अतिरिक्त सुरक्षा ठेवीचे स्वतंत्र बिल देण्यात येत आहे. या बिलामध्ये नमूद सुरक्षा ठेवीची रक्कम भरण्यासाठी जास्तीत जास्त सहा मासिक समान हप्त्यांची सोय उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यासंबंधीची माहिती सुरक्षा ठेवीच्या बिलामध्ये नमूद आहे. तसेच लघुदाब वीजग्राहकांना अतिरिक्त सुरक्षा ठेवीची रक्कम घरबसल्या भरण्यासाठी महावितरणच्या www.mahadiscom.in ही वेबसाईट व महावितरण मोबाईल ॲपद्वारे सोय उपलब्ध आहे. वीजग्राहकांनी अतिरिक्त सुरक्षा ठेवीच्या बिलाची रक्कम भरून सहकार्य करावे, असे आवाहन महावितरणकडून करण्यात आले आहे.

# आंबेडकरांचे विचार प्रत्येक घरापर्यंत पोहोचविण्याची गरज

## दीपकआबा साळुंखे पाटील : आलेगाव, ता.सांगोला येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन

आधुनिक केसरी न्यूज



**सांगोला :** महामानव, घटनेचे शिल्पकार, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे बहुजनांच्या उद्धारासाठी व राष्ट्र उभारणीसाठीचे कार्य प्रत्येक घरामध्ये पोहोचवणे ही काळाची गरज आहे, असे मत महाराष्ट्र राज्य राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष मा.आ. दीपकआबा साळुंखे पाटील यांनी व्यक्त केले. आलेगाव ता. सांगोला येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीच्या निमित्ताने मिरवणूक कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. पुढे ते म्हणाले, ह्या भारत देशामध्ये प्रत्येक नागरिकाला आदर्शवत व स्वाभिमानाने जीवन जगण्याची गुरुकिल्ली डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सर्वप्रथम दिली. प्रस्थापितांच्या विरोधात जाऊन बहुजनांसाठी ज्यांनी रक्ताचा थेंब सुद्धा न सांडता आपल्या लेखणीतून सर्वसामान्य लोकांना अधिकार मिळवून दिला. हे सर्व करीत असताना "मानवता हाच खरा धर्म" सर्वप्रथम राष्ट्रप्रेम व राष्ट्राचा उद्धार याचबरोबर उपेक्षित घटकांना न्याय देणे अशा कितीतरी गोष्टी आपण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चरित्रातून आदर्श घेण्यासारखे आहेत.

आजच्या युवकांनी कोणत्याही क्षेत्रामध्ये यश मिळवण्यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या उक्तीप्रमाणे "शिका ,संघटित व्हा, आणि संघर्ष करा" अशा पद्धतीचे स्वतःचे वागणे असले पाहिजे व कोणत्याही व्यसनाला आहारी न जाता डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार आत्मसात करून स्वतःचा व राष्ट्राचा उद्धार करण्याची आज गरज भासू लागली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना डोक्यावर घेऊन नाचण्यापेक्षा त्यांचे विचार डोक्यात घेणे सध्या काळाची गरज आहे. त्यांनी दलित बौद्ध चळवळीला प्रेरणा दिली. आणि अस्पृश्य ( दलित ) लोकांविरुद्ध होणारा सामाजिक भेदभाव नष्ट करण्यासाठी चळवळ उभारली, तसेच महिलांच्या आणि कामगारांच्या हक्कांचे समर्थन केले. हे एवढे महान कार्य आपण सर्वांनी आत्मसात केले पाहिजे आणि त्यांचे विचार सर्वत्र पोहोचले पाहिजेत असे मत त्यांनी व्यक्त केले. या प्रसंगी श्रीरंग बाबर, संग्रामसिंह बाबर, पांडुरंग बाबर, डॉ. अभिजीत बाबर, सुनील बाबर, राहुल ढोले, चंचल बनसोडे, योगेश दिवसे, बाळासो पाटील, किशोर नवघरे,नितीन रसाळ, प्रकाश जाधव, आकाश नवघरे,जयसिंग गडहिरे यांच्यासह मोठ्या प्रमाणावर आंबेडकर प्रेमी व ग्रामस्थ उपस्थित होते.

# बाळासाहेब देवरस रूग्णालयाचा भूमिपूजन सोहळा अक्षयतृतियेला

आधुनिक केसरी न्यूज



**पुणे :** सामान्य रूग्णांसाठी आवाक्यातील खर्चात गुणवत्तापूर्ण वैद्यकीय सेवांच्या उद्देशाने पुणे वैद्यकीय सेवा व संशोधन प्रतिष्ठान संचलित बाळासाहेब देवरस रूग्णालयाच्या भूमिपूजन सोहळा शनिवार, २२ एप्रिल २०२३ रोजी अक्षयतृतीयेच्या मुहूर्तावर होतो आहे. कात्रज भागातील खडी मशीन चौकात ८०० बेडचे हे रूग्णालय दोन टप्प्यात उभारले जाणार आहे. अशी माहिती बाळासाहेब देवरस पॉलीक्लीनिकचे अध्यक्ष शिरीष देशपांडे आणि कार्यवाह बद्रीनाथ मूर्ती यांनी दिली. यानिमित्ताने आयोजित भूमिपूजन समारंभाला केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याणमंत्री डॉ. मनसूख मांडवीय, पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या केंद्रीय कार्यकारिणीचे सदस्य सुरेश उर्फ भैय्याजी जोशी, पुणे वैद्यकीय सेवा व संशोधन प्रतिष्ठानचे मानद अध्यक्ष व राम जन्मभूमि तीर्थक्षेत्र ट्रस्टचे कोषाध्यक्ष पूज्य. गोविंद देव गिरीजी, सिरम इन्स्टिट्यूट ऑफ इंडियाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. आदर पूनावाला, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या पश्चिम महाराष्ट्र प्रांताचे संघचालक नानासाहेब जाधव आदी मान्यवरांची उपस्थिती असणार आहे. खडी मशीन चौकातील प्रस्तावित ८०० बेडचे सुसज्ज रूग्णालय व अद्ययावत वास्तुच्या भूमिपूजन सोहळा समारंभ पुणे- सातारा रस्त्यावरील बिववेवाडी स्थित लोकशाहीर अण्णाभाऊ साठे सभागृहात सकाळी १०.३० वाजता होणार आहे. नागरिकांनी अण्णाभाऊ साठे सभागृहात कार्यक्रमास लक्षणीय संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन प्रतिष्ठानने केले आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे तृतीय संघचालक श्रद्धेय बाळासाहेब देवरस हे आणीबाणीतील काही वर्षे पुण्याच्या येरवड्याच्या तुरूंगात होते आणि आयुष्यातील शेवटची काही वर्षे मित्रमंडळ चौकात स्थित कौशिक आश्रमात त्यांचा निवास होता. सेवेच्या आयामाला त्यांनी दिलेली दिशा याचा विचार व दृष्टी समोर ठेवून त्यांचेच नाव या रुग्णालयाला द्यावे असे प्रतिष्ठानने ठरविले. पुण्यातील अनेक तज्ज्ञ व मान्यवर डॉक्टरांच्या टीमची या प्रकल्पासाठी मदत घेऊन याचे सविस्तर नियोजन होते आहे. मान्यवर आर्किटेक्ट, बांधकाम व्यावसायिकाची या प्रकल्पासाठी निवडून २०२५ साली राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला १०० वर्षे होत असताना या प्रकल्पाचा पहिला टप्पा पूर्ण करण्याचा प्रतिष्ठानचा मानस आहे.

# धर्माबाद तालुक्यातील सात ग्रा.पं. पोटनिवडणुकीचा कार्यक्रम जाहीर

आधुनिक केसरी न्यूज

**बाबुराव गोणारकर**

**धर्माबाद :** नांदेड जिल्ह्यातील ज्या ग्रामपंचायतील जागा रिक्त झाल्या असतील त्यांच्या पोट - निवडणुकीचा कार्यक्रम निवडणूक आयोगाने घोषित केला असून त्यात धर्माबाद तालुक्यातील सात ग्रामपंचायतीचा समावेश आहे. तालुक्यातील ज्या ग्रामपंचायतीतील सदस्यांचे निधन झाले असेल, राजीनामा दिला असेल किंवा अपात्रतेमुळे ती जागा रिक्त झाली असेल अशा ग्रामपंचायतीच्या पोट निवडणुका घ्याव्यात अशा आशयाच्या सूचना नांदेड जिल्हाधिकाऱ्याकडून धर्मबाद तहसील कार्यालयांस देण्यात आल्या. या सूचना मिळताच धर्माबादचे तहसीलदार दत्तात्रय शिंदे यांनी परिपत्रक काढून निवडणूक कार्यक्रम घोषित केला आहे. यामध्ये धर्माबाद तालुक्यातील सायखेड - (एसटी), मंगनाळी - (एसटी - स्त्री), बेल्लर बु. (एसटी - स्त्री),बाचेगाव (ओबीसी),चोळाखा - (ओबीसी - स्त्री), चिकना -(ओबीसी - स्त्री) ,आटाळा - (एसटी - स्त्री) या सात ग्रामपंचायतींचा समावेश आहे.

**निवडणुकीचे टप्पे :** नामनिर्देशनपत्रे सादर करणे दि.२५/०४/२०२३ ते ०२/०५/२०२३
वेळ- सकाळी ११ ते दु ३ .००
(सुट्टी वगळून) **छाननी** - दि. ०३-०५-२०२३
वेळ-सकाळी ११ .०० वा. पासुन छाननी संपेपर्यंत.
**अर्ज मागे घेणे** - दि.०८-०५-२०२३
वेळ : दु. ३ .०० वा. पर्यंत
**निवडणूक चिन्ह वाटप व उमेदवारांची यादी प्रसिध्द**
दि.०८-०५-२०२३ वेळ : दु. ३ .०० वा. नंतर
मतदान- १८/०५/२०२३, सकाळी ७ .३० वा. पासुन ते सायं. ५ .३० वा मतमोजणी व निकाल - १९ /०५/२०२३

# शेतकऱ्यांची फसवणुक; गुन्हे दाखल करा

आधुनिक केसरी न्यूज

**परतूर :** एच. डी. एफ. सी. अग्रो कंपनीने दिवसा ढवळ्या परतूर व मंठा तालुक्यातील शेतकऱ्यांचा खिसा कापला आहे .व शासनाच्या तिजोरीवर दरोडा टाकला आहे. यात शासन व प्रशासन सहभागी असल्या कारणाने एच. डी. एफ. सी. अर्गो कंपनीने खरीप हंगाम २०२२-२३ चे पिक विम्याचे पैसे भरणा करुन घेतले पण देते वेळी शेतकऱ्यांची चेष्टा लावली आहे. जसे शिवार एक, गटनंबर एक, एकाच बापाची दोन मुले एक तास पिक विमा मिळतो दुसऱ्याला नाही 10 तसेच एका शेतकऱ्याला 130 दुसऱ्याला 199 तिसऱ्याला 440 चौथ्याला 120 अशा अनेक शेतकऱ्यांना तुकडे रकमा देऊन शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळण्याचे काम शासनाच्या व प्रशासनाच्या सहकार प्रशासनाच्या सहकार्याने कंपनीने केले आहे . शेतकऱ्याच्या मध्यावरचे लोणी खाण्याचे काम हे करत आहेत शासनाचे धोरण शेतकऱ्याचे मरण कंपनीच्या दाराला शासनाच्या सहकार्याने सोन्याचे तोरण अशी अवस्था झाली आहे.

# सरस्वती भुवन महाविद्यालयात अभाविपचे भोंगानाद आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** विद्यार्थ्यांच्या समस्यांना घेऊन गेल्या दोन वर्षांपासून सरस्वती भुवन महाविद्यालय येथे B.Voc ला प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचा अद्यापही निकाल लागलेला नाही, याच कारण म्हणजे महाविद्यालयाने महाविद्यालयात विद्यार्थ्यांचा प्रवेश करून घेतला परंतु, महाविद्यालयाच्या चुकीमुळे विद्यार्थ्यांचे विद्यापीठात प्रवेश झालेले नाहीत. २०२१ मध्ये विद्यार्थ्यांचे प्रवेश असता निकाल न लागल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. तसेच विद्यार्थ्यांना विद्यापीठातून PRN दिला गेलेला नाही.विद्यार्थ्यांचे पेपर महाविद्यालयाकडे पडुन असल्यामुळे विद्यार्थ्यांचा निकाल राखीव आहे. यामुळे देखील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाले आहे तसेच महाविद्यालयात विद्यार्थीनींना पिण्यासाठी पाण्याची सोय विद्यार्थी स्वच्छतागृह बाहेर केली असल्यामुळे विद्यार्थिनींना पाणी पिण्यासाठी अडचण येत आहे. या सर्व प्रश्नांना घेऊन अभाविप कडुन वारंवार निवेदन दिले असता प्राचार्यांनी दुर्लक्ष केले. म्हणून आज अभाविपने प्राचार्यांच्या कक्षात भोंगे वाजवत ठिय्या देत आंदोलन करण्यात आले. यावेळी B.Voc च्या विद्यार्थ्यांचा प्रश्न येत्या आठ दिवसांमध्ये विद्यापीठासोबत समन्वय साधून मार्गी लावू, तसेच महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या पिण्याच्या पाण्याची व्यवस्था दुसऱ्या ठिकाणी करू असे



प्राचार्यांनी लेखी आश्वासन दिले.

यावेळी महानगर मंत्री ऋषिकेश केकान, महानगर सह मंत्री अजय अटुळे, जिल्हा संयोजक उमाकांत पांचाळ, महाविद्यालय अध्यक्ष रितेश राठोड, प्रतिक भोसले, शिवशंकर शेरे, मनिषा कुलकर्णी, दिव्या निकम सह आदी महाविद्यालयीन विद्यार्थी उपस्थित होते.



# दयानंद महाविद्यालयात परीक्षा सुरळीत सुरू

आधुनिक केसरी न्यूज

**लातूर :** येथील दयानंद वाणिज्य महाविद्यालयात स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेडच्या उन्हाळी 2023 परीक्षांना 18 एप्रिल 2023 पासून सुरुवात झाली आहे. या परीक्षा सुरळीतपणे सुरू असून, परीक्षा 6 मे 2023 पर्यंत चालणार आहेत. दयानंद वाणिज्य महाविद्यालयात लातूर शहरातील महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, जयक्रांती महाविद्यालय, ब्रिलीयंट महिला महाविद्यालय, स्वामी विवेकानंद महाविद्यालय, श्री. त्रिपुरा महाविद्यालय आदी महाविद्यालयातील बी.कॉम. प्रथम, द्वितीय आणि तृतीय वर्गाचे विद्यार्थी परीक्षा देत आहेत. सदरील परीक्षा सुरळीत सुरू असून, परीक्षा सुरळीत आणि कॉपीमुक्त पार पाडण्यासाठी महाविद्यालयाने दक्षता पथकाची नियुक्ती केली आहे. सदरील परीक्षा प्रभारी प्राचार्य डॉ. राजाराम पवार यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. या परीक्षेत केंद्रप्रमुख म्हणून डॉ.कविता बियाणी, संयुक्त केंद्रप्रमुख म्हणून डॉ.धर्मराज तांदुळजेकर, सहायक केंद्रप्रमुख म्हणून प्रा. योगेश शर्मा हे काम पाहत आहेत. सदरील परीक्षा विभागात अतिरिक्त सहायक केंद्रप्रमुख म्हणून प्रा.अक्षय पवार आणि प्रा. अजय चव्हाण, तांत्रिक सहायक प्रा.प्रसाद पाटील, सहायक प्रा. अक्षय राजुरवार, लिपिक ऋषिकेश बिडवे, टायपिस्ट ज्योतिराम कांबळे, लिपिक सचिन शिंदे, सेवक बालाजी कनगुळे, वैशाली रोडे, नरसिंग काळे, ऋषिकेश कांबळे, राघवेंद्र पाठक आदी कार्यरत आहेत. यावेळी डॉ.साईनाथ उमाटे उपस्थित होते.

# रमजाननिमित्त 71 किराणा किटचे वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**परतूर :** तालुक्यातील आष्टी येथे दरवर्षी प्रमाणे यंदा ही ईदारा फलाहे इन्सानियात कमिटी तर्फे गरजुना 71 किराणा साहित्य किट चे वाटप करण्यात आले. सदर कमिटीतर्फे मागील सात वर्षा पासून हे उपक्रम रमजान महिन्यात राबविले जात असून यंदाही कमिटीतर्फे किराणा साहित्याची मदत जाऊन गरजवंतांपर्यन्त पोहचविण्यात आली. इतकेच नव्हे तर वर्ष भर कमिटी तर्फे कोणत्याही जाती पाती न बाळगता निस्वार्थ पणे सर्वच जातीतील गरजूना सर्वधर्म् सम्भावनेतून दवाखान्यातील अडचणी असो किंवा गरिब मुलीचे लग्न कार्य असो किंवा रक्तदान असो असली कुठली ही मदत भासल्यास ईदारे फलहे इन्सानियात कमिटी चे सर्व जन मदितीसाठी निस्वार्थ पणे पुढे येतात. कमिटचे सर्वत्र कौतूक होत आहे. यावेळी कमिटीचे अध्यक्ष मौलाना मुफ्ती अलीम मिल्ली रहमानी उपाध्यक्ष हाफिज आरिफ शेख, सचिव मौलाना अलीम बागवान आष्टी चे उपसरपंच हाफिज नसरुल्ला काकड़,मौलाना जमीर कुरेशी, मौलाना आदिल, अनीस सय्यद,अजीम शेख,मुद्दासिर पटेल,फय्याज कुरेशी, वासेद कुरेशी सहित इतरांनी परिश्रम घेतले.



# लेखिकेच्या वाट्याला आलेल्या संघर्षातून जन्मली बारबाला

आधुनिक केसरी

**साधारण दोन महिन्यांपूर्वी ज्या पुस्तकाची वाट मी गेली कित्येक दिवस बघत होतो,जे पुस्तक वाचण्याची इच्छा खूप दिवसांपासून होती. ते पुस्तक मला भेट म्हणून मिळाले. पुस्तक हातात पडले पण वाचनाचा योग काही जुळून येत नव्हता. कधी वेळ मिळत नव्हता तर कधी वेळ असूनही वाचण्याची इच्छा नसल्या कारणाने वाचन होत नव्हतं. काल शनिवार पूर्ण वाचनासाठी राखीव ठेवत लेखिका "वैशाली हळदणर" यांचे "बारबाला" आत्मकथनपर २३२ पृष्ठ संख्या असलेले पुस्तक वाचून संपवलं. या पुस्तकाला आजवर बऱ्याच वाचकवर्गाने वाचलं पण फक्त वाचलं आणि आपल्यापूर्तच त्या पुस्तकाला समजून घेतलं. या पुस्तकाबद्दल आजवर कुठेही फारसं लिहल्या गेलं नाही. की, कुणी त्या पुस्तकाच्या माध्यमातून लेखिकेला आपल्याला, समाजाला काय सांगायचं आहे. हे ही समजून घेतलं नाही.**

लेखिकच्या वाट्याला आलेला संघर्ष, तिच्या आयुष्यात आलेली विविध संकटे. वेळोवेळी या संकटांना तोंड देत फिनिक्स पक्ष्याप्रमाणे पुन्हा पुन्हा उंच आकाशात आपलं स्वतःचं अस्तित्व निर्माण करत सैर होणं.लेखिकेचा हा जीवनप्रवास खूप प्रेरणादायी व खूप काही देऊ करणारा आहे.
परंतु वाचकाने पुस्तक वाचले व बाजूला ठेऊन दिले इतकाच या पुस्तकाचा आजवर प्रवास वाचकांसोबत झाला.पुस्तकाआडून लेखिका आपल्याला काय सांगू बघत आहे, हे कुणाला समजून घ्यावं वाटलं नाही. की कोणी त्या पुस्तकांची दखल घेतली नाही. की, कुणी त्या लेखिकेची दखल घेतली.
नको ती चर्चा या पुस्तकांबद्दल मात्र होत राहिली. "बारबाला" एक वेश्येचं ( हे वाचकवर्गाने त्यांचं तयार केलेलं मत ) पुस्तक आहे. मग तिच्या विचारांचा, तिच्या लिखाणाचा काय विचार करायचा. म्हणून याबद्दल, पुस्तकांबद्दल कुठेही कोणी फारसे व्यक्त झालं नाही. अक्षरशः हे पुस्तक लिहणारी लेखिका कायमच मराठी वाचकांनी, साहित्यिकांनी दुर्लक्षित केली आहे. "वैशाली हळदणर" आणि मी स्वतः या विषयांना घेऊन अनेकदा चर्चा केली. एका लेखिकेला मराठी साहित्यात कसं वेगळं ठरवलं जातं, कसं दुर्लक्षित केलं जातं. त्यांच्या विचारांना कसं खोडलं जातं. हे नेहमीच त्यांच्या बोलण्यातून कळून येत गेलं. हे असं करण्याचं कारण एकच होतं की, त्यांचे विचार हे काळाच्या खूप पुढचे होते. त्यांच्या वाट्याला जे संघर्ष, दुःख आले ते इतरांच्या वाट्याला येऊ नये हेच त्यांचं सांगणं होतं. जे की त्यांनी पुस्तकाच्या माध्यमातून खूप स्पष्ट अन् निर्भिडपणे मांडले आहे. पण नाही मराठी साहित्यात त्यांना अन् त्यांच्या पुस्तकांना अक्षरशः डावलल्या गेलं जे की खूप वाईट्ट आहे. मी स्वतःला वेश्या समजत नव्हते. माझ्या मनाच्या कोपऱ्यात मी स्वतःची एक प्रतिमा हळुवार जपली होती. बाहेरून मला कोणीही ओरबाडलं, रक्तबंबाळ केलं तरी त्या प्रतिमेला मी प्राणपणाने जपणार होते. ती प्रतिमा एका कलाकाराची होती. मनस्वी कलाकाराची. पण मला हे जमणार होतं का ? पुरुषांना जणू माझा वास यायचा, की ही अशी बाई आहे, जिला आपण चिरडू शकतो, वापरू शकतो.
माझ्याबद्दल घडूनघडून काय घडणार होता ? काय घडायचं राहिलं होतं ? जे काय घडायचं ते घडो; पण मला दोन वेळच्या जेवणाची भ्रांत नको होती. मुलांच्या आयुष्याची नासाडी नको होती. अपेक्षा खूप मोठ्या नव्हत्या पण जे आयुष्य होतं तसंच सुरू राहिलं असतं तर मी किती काळ जिवंत राहू शकले असते ? कशा अवस्थेत जिवंत राहू शकले असते ? असा काही परिच्छेद पुस्तकाच्या मलपृष्ठावर लिहलेला आहे. जो वाचून अस्वस्थ व्हायला होतं आणि आपण लेखिकचं आत्मकथन पर पुस्तक वाचायला घेतो. प्रत्येक पानानंतर उलगडत जाते ती लेखिका, तिचा संघर्ष अन् तिच्या संघर्षाच्या अनेक कहान्या. खरतर या कहान्या थोडक्यात उलगडून सांगितल्या तर पुस्तक वाचण्याची गरज भासणार नाही. पण; त्या लेखिकेच्या रोजच्या आयुष्यातील घडणाऱ्या कहान्या आडून लेखिका आपल्याला काय सांगू बघते हे आपल्याला समजून घ्यावं लागेल अन् त्यासाठी मग आपल्याला हे पुस्तक वाचायला घ्यावं लागतं. लेखिका म्हणते कोणीतरी म्हंटलय 'वाह छपती है, आह छूपती है!' पण आज माझी 'आह' छापली जातेय. माझं उभं आयुष्य एक 'हाय' बनून गेलं होतं. आत्मचरित्र लिहितांना वाटायचं, काय ही आयुष्याची लक्तर झाली माझ्या ? प्रत्येक प्रसंगाची आठवण एक मरणप्राय यातना होती. त्या आठवणी लिहिणं त्याहूनही त्रासदायक होतं, पण सगळ्याच त्रासांना तिलांजली देण्याचा निर्णय माझ्या मनाने घेतला होता. अन् कैद केला गेला एक प्रवास एका बारबालेचा. जी जन्माने बारबाला नव्हती, कुठलीच बारबाला जन्मतः च बारबाला नसते परिस्थितीने हळूहळू तिला बारच्या दिशेनं ढकलेले. वयाच्या एकूण सतरा वर्ष लेखिकेने विविध दीडशे ठिकाणच्या बारमध्ये काम केलं. कारण इतकंच होतं तिचं, तिच्या मुलांचं पोट भरण्यासाठी, स्वतः चं घर घेण्यासाठी. पैसे कमविण्याचे सर्व मार्ग निष्फळ ठरल्यावर लेखिकेने बारचा मार्ग अवलंबला. त्या आदी तिने लोकांची घरची भांडी घासणे, लादी पुसणे, हॉस्पिटलमध्ये काम करणे, बालवाडीचा वर्ग चालवणे अशी असंख्य कामे केली. अन् यात गैर काही नव्हतं तिच्यासाठी, मुलांच्या पोटासाठी ती हे सर्व करत होती. हे सर्व करत असतांना रोजची होणारी पहाट तिच्यासमोर रोज नवी संकटे घेऊन उभी राहत होती. ती या संकटांना तोंड देत होती, ताट मानेनं तिचं आयुष्य जगत होती अन् आजही जगत आहे.
हे आयुष्य जगत असताना लेखिकेच्या आयुष्यात अनेक स्थित्यंतरं येत गेली. लहानपणापासून घरात तिने बघितले वाद, पुढे नवऱ्याशी संसार थाटून संसार वेलीवर दोन फुलं फुलले आणि त्याने केलेलं दुसरं लग्न, भावाने तिच्यापासून लपवून ठेवलेलं वडिलांचं तिला कायमचं सोडून जाणं, आईचं अपघाती मरण आणि या अवस्थेचा परिणाम आपल्या मुलावर होऊन तो आपल्यापासून दूर दूर होत जाणं. अशी कित्येक दुःख पचवत लेखिका जगते आहे, लिहते तिचा हा प्रवास खूप खडतर असा आहे. जो प्रत्येक सामान्य जीवन जगणाऱ्या माणसाने वाचायला हवा जेणेकरून लेखिकेसारख्या हजारो बारबाला आणि लाखो पिडित स्त्रियांकडे हे आत्मचरित्रपर पुस्तक वाचून आपला पाहण्याचा दृष्टिकोन बदलेला असेल. बारबालाच्या निमित्ताने या पुस्तकाबद्दल खूप काही लिहता येईल. पण; मला वाटतं आपण वाचायला हवं समजून घ्यायला हवं प्रत्येक बारबालेला,तिच्या जगण्याला या पुस्तकाच्या अडून.




**- भारत लक्ष्मण सोनवणे**

# सुदानमध्ये गृहयुद्ध; लष्कर- निमलष्करी दल आमने सामने



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

आधुनिक केसरी

**सुदान आफ्रिकेतील एक मागास राष्ट्र. अरब राष्ट्राच्या सीमेवरील अवघी चार कोटी लोकसंख्या असलेल्या या यादवी माजली आहे. यादवी नव्हे तर देशांतर्गत युद्धच या देशात सुरू आहे. गेल्या आठ दिवसांपासून सुदानमध्ये लष्कर आणि निमलष्कर दल यांच्यात युद्ध सुरू असून या युद्धात २०० हुन अधिक जणांचा बळी गेला आहे.**

यात एका भारतीय नागरिकाचाही बळी गेला आहे. अर्थात या युद्धामागचे खरे कारण हे सत्ता संघर्ष आहे हे नव्याने सांगायला नको. सत्तेसाठी सुदानचे लष्कर आणि निमलष्करी दल एकमेकांसमोर उभे ठाकले असून सत्तेसाठी नागरिक आणि सैनिकांचा बळी जात आहे. वास्तविक सुदानला यादवी नवी नाही. सत्ताधारी आणि लष्कर, लष्कर आणि नागरिक यांच्यात तिथे नेहमीच छोट्या मोठ्या चकमकी चालू असतात. सध्या जे युद्ध चालू आहे त्याची पार्श्वभूमी आधी समजून घेऊ. २०१९ साली सुदानमध्ये राज्यक्रांती झाली. ओमर अली बशीर याची जुलमी राजवट उलथवून टाकण्यासाठी जनता रस्त्यावर उतरली. जनतेचा रोष लक्षात घेऊन लष्कराने थेट ओमर अली बशीर याला आव्हान दिले आणि त्याची सत्ता उलथवून टाकली. ओमर अली बशीर याची सत्ता गेल्याने तिथे लोकशाही प्रस्थापित करण्याच्या दृष्टीने वाटचाल सुरू झाली. यावर्षी तिथे निवडणुकाही होणार होत्या. सुदानचे लष्करप्रमुख जनरल अब्दुल फतेह बुऱ्हाण आणि रॅपिड सपोर्ट ग्रुप ( आर एस एफ ) या निमलष्करी दलाचे प्रमुख जनरल मोहम्मद हमदान दगालो आणि हंगामी सरकार यांच्यात तसा करारही झाला होता मात्र ऑक्टोबर २०२१ मध्ये बुऱ्हाण आणि दगालो यांनी हंगामी सरकार उलथवून लावले आणि लष्करशाहीची स्थापना केली. बुऱ्हाण हे देशाचे सर्वोच्च तर दगालो हे दुसऱ्या क्रमांकाचे नेते बनले. सत्ता हस्तगत केल्यानंतर बुऱ्हाण यांनी निमलष्करी




दल लष्करात विलीन करण्याची प्रकिया सुरू केली आणि एका वर्षाच्या आत ही प्रक्रिया पूर्ण करण्याचे आदेश दिले. निमलष्करी दलाचे प्रमुख दगालो यांनी विलीनीकरणाला विरोध करत किमान दहा वर्ष तरी निमलष्करी दल लष्करात विलीन होणार नाही अशी भूमिका घेतली आणि तिथेच संघर्षाची ठिणगी पडली. बुऱ्हाण आपले ऐकत नाही हे लक्षात येताच दगालो यांनी राजधानी जवळील मेरावे शहरात आपले सैन्य घुसवले. हे शहर सुदान मधील प्रमुख शहर आहे या शहरात निमलष्करी दल घुसल्याने लष्करप्रमुख बुऱ्हाण यांनीही राजधानी कातूनमध्ये लष्कराची जमवाजमव केली. दोन्ही सैन्य समोरमसोर आले आणि शनिवारी त्यांच्यात पहिली चकमक झडली. दोन्हीही सैन्याने माघार घेण्यास नकार दिल्याने चकमक वाढत गेली. मागील आठ दिवसांपासून दोन्ही सैन्यात चकमकी घडत आहेत यात २०० हुन अधिक नागरिक मृत्यू पावले असून २ हजारांहून अधिक नागरिक जखमी झाले आहेत. या युद्धामुळे ५० लाख नागरिकांनी सुदान सोडले असून लाखो नागरिक देश सोडण्याच्या तयारीत आहे. नजीकच्या काळात हा रक्तरंजित सत्ता संघर्ष थांबण्याची चिन्ह दिसत नाही उलट वाढतच जाणार आहे असे एकूण चित्र आहे. त्यामुळे अनेक देशांनी दोन्ही गटांना युद्ध थांबवण्याची विनंती केली मात्र दोन्ही लष्कर प्रमुख आपल्या मतावर ठाम आहेत. त्यामुळे हे गृहयुद्ध आणखी काही दिवस तरी चालेल असेच सध्याचे चित्र आहे.

गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी). आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com
S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर